शाश्वत विकास केंद्र
गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था, पुणे

# मिशन सह्याद्री

## संवर्धनातून समृद्धी

### शेतकऱ्यांसाठी सुलभ मार्गदर्शिका


Mission Sahyadri | Prosperity through Conservation

Centre for Sustainable Development
GOKHALE INSTITUTE OF POLITICS AND ECONOMICS

Suhasta

Kirloskar
SLK Foundation











# मिशन सह्याद्री

सह्याद्री पर्वत रांगेत अशा अनेक वाडीवस्त्या आहेत जिथे आता युवक राहिलेच नाहीत. याचे मुख्य कारण म्हणजे डोंगर उताराच्या छोट्या शेत जमीनिवर शेती करून कुटुंबाचे पोट भरणे अवघड झाले आहे, आणि शहरात संधी उपलब्ध आहे.

पण आपल्या कुटुंबियांपासून दूर शहरात राहून मोल मंजूरी करून बचत तरी करता येते का? मनाला शांतता आणि शरीराला पोषक आहार मिळतो का? शहरात झगमगाट आहे, पण जीवन खरंच सुखी आहे का? आमच्या अभ्यासात याचे उत्तर 'नाही' असेच मिळाले. आणि म्हणून मिशन सह्याद्री उपक्रम....

सह्याद्रीत उत्पन्नाची कोणती साधने आहेत, त्याला मदत कोण करते, सरकारी योजना काय आहेत, असे प्रश्न घेऊन आम्ही अभ्यास केला, इथे काही यशस्वी जोड धंदे करणारे तरुण शेतकरी आहेत, त्यांना भेट दिली, सरकारी अधिकाऱ्यांशी चर्चा केल्या आणि आम्हाला असे दिसले की युवकांना इथे पुनःप्रस्थापित करायचे असेल तर त्यासाठी एक सोपी त्रीसूत्री आहे :

**संवर्धन - संघटन - मूल्यवर्धन**

- इथल्या निसर्गात अनेक उत्पन्नाची साधने आहेत, पण त्यासाठी संवर्धन अनिवार्य आहे.
- छोट्या शेतकऱ्याला कोणीच उभं करत नाही, त्यासाठी संघटन अनिवार्य आहे.
- फक्त शेतमालात नफा नाही, त्यासाठी त्याचे मूल्यवर्धन अनिवार्य आहे.

या पुस्तिकेत आपल्याला हा त्रिसूत्री मार्ग सोप्या पद्धतीने सुचविला आहे. पुस्तिकेचा वापर करून, यांच्याशी संपर्क साधून आपणही पुन्हा आपल्या गावात परत येऊन स्वाभिमानी उत्पन्न कमवू शकता!

**गुरुदास नूलकर,**
संचालक, शाश्वत विकास केंद्र
गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था, पुणे

# मिशन सह्याद्री
## संवर्धनातून समृद्धी

# MISSION SAHYADRI
## Prosperity Through Conservation

Centre for Sustainable Development

Education : An Ennobling Influence

Gopal Krishna Gokhale

Gokhale Institute of Politics and Economics
(Deemed to be University)
Pune – 411 004

※ प्रकाशकाचे नाव :

शाश्वत विकास केंद्र,

गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था

पुणे – ४११००४.

ऑक्टोबर – २०२४

※ अभ्यास, लेखन व संपादन

श्री. नरेंद्र खोत

डॉ. गुरुदास नुलकर

श्री. निखिल अटक

श्री. नितीन राऊत

※ मुद्रक :

धन्वंतरी एंटरप्रायजेस, पुणे.

मो. ९८८१३५११४५

ही पुस्तिका नि:शुल्क उपलब्ध आहे.

# अनुक्रमणिका


१. आपला सह्याद्री ५–६

- ऐतिहासिक पार्श्वभूमी
- भौगोलिक जडणघडण
- सह्याद्री पर्वतरांगांचे स्थान आणि विस्तार

२. सह्याद्रीचा शेती व पाण्यावरील प्रभाव ७

३. वनस्पती परिचय ८

४. डोंगराचे महत्व ९

५. औद्योगिक क्रांतीचा परिणाम १०

६. सह्याद्रीतील शेतीची दुरावस्था ११–१२

वणवा आणि वृक्ष तोडीचे शेतीवरील परिणाम

७. शेतकऱ्यांच्या भविष्यातील समस्या १३

८. पुढची पावलं– समृद्धीची त्रिसूत्री १४–१६

- संघटन
- संवर्धन
- मूल्यवर्धन

✻ संदर्भ सुची ✻

१. संघटित शेती: (शेतकरी सामूहिक व्यवसाय संघटनेचे प्रकार) १७–५१

१.१ शेतकऱ्यांचा संघर्ष: कारणे आणि आव्हाने

१.२ शेतकरी उद्योगांचे विविध पर्याय आणि पद्धती

१.३ शेतकरी गट

१.४ शेतकरी सहकारी संघ

१.५ शेतकरी उत्पादक कंपनी

१.६ शेतकरी सामुहिक सहकारी उद्योगांसाठी काही पर्याय

२. शेतकरी उद्योजकांचा माहितीकोष (जिल्हा सातारा व कोल्हापूर) ५२–६८

२.१ शासकीय विभाग आणि संबंधित अधिकारी

२.२ जिल्हा/तालुका कृषी विभाग

२.३ जिल्हा / तालुका वन विभाग

२.४ जिल्हा ATMA विभाग

२.५ शेतकरी गट, महिला गट, शेतकरी उत्पादक कंपनी आणि सहकारी उद्योग

**Mission Sahyadri Website**

**Mission Sahyadri Youtube Channel**

# प्रकरण १
## आपला सह्याद्री

आपल्या सर्वांना सह्याद्री पर्वतरांगा माहिती आहेत, पण महाराष्ट्राच्या समाजकारण, अर्थकारण आणि राजकारणावर सह्याद्रीचा प्रभाव किती थेट आणि खोलवर आहे हे बरेच वेळा माहिती नसतं. सह्याद्री अनेक राज्यांमधून पसरला असला तरी महाराष्ट्रात त्याचं स्थान विशेष महत्वपूर्ण आहे.

### ऐतिहासिक पार्श्वभूमी



खऱ्या अर्थाने सह्याद्रीचे असाधारण महत्व प्रथम जाणले ते छत्रपती शिवाजी महाराजांनी. महाराजांच्या वाटचालीत याच सह्याद्रीने आणि तिथल्या मावळ्यांनी त्यांना भक्कम साथ दिली. उत्तरेकडे मोगल साम्राज्य, दक्षिणेकडे आदिलशाही आणि निजामशाही राज्ये आणि कोकणात ठाण मांडून बसलेले सिद्दी, असा चहूबाजूंनी शत्रूंचा वेढा होता. शिवाय या चौघांच्या पदरी चाकरी करणारे बहुतेक स्थानिक मराठे सरदार कट्टर विरोधक होते. कसलेही आर्थिक पाठबळ नसताना, मोठ्या फौजा, हत्तीघोडे, तोफखाने नसताना, मुठभर मावळ्यांना हाताशी घेऊन स्वराज्य उभे करणे हे शक्य झाले ते सह्याद्रीमुळे. सपाट मैदानी प्रदेशात बलाढ्य सैन्यांसमोर टिकाव लागणं अशक्य आहे हे खूप लवकर उमगल्यामुळे महाराजांनी आपला संपूर्ण प्रवास सह्याद्रीवर स्वार होऊनच पुढे नेला. छत्रपती शिवरायांचा, मराठेशाहीचा अभिमान नाही असा माणूस महाराष्ट्रात एकही असणार नाही. पण ज्याच्यामुळे हे विलक्षण पर्व आपल्या इतिहासात घडलं त्या सह्याद्रीला आपण खरंच ओळखतो का?

### भौगोलिक जडणघडण–



१० कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीच्या खोल भूगर्भात प्रचंड उलथापालथ झाली आणि पृष्ठभागावरचा एक महाखंड दुभंगला, त्यापैकी मोठ्या भागाला आज आपण आफ्रिका म्हणून ओळखतो. त्यापासून फुटून वेगळा झालेला लहान भाग, म्हणजेच आजचा भारतीय उपखंड, सरकत जाऊन उत्तरेकडील (सध्या चीन व रशिया असलेल्या) युरेशिया खंडाला धडकला. युरेशिया खंडाकडे सरकताना त्या विस्थापित भागाच्या पश्चिमी तटावर समुद्रातील ज्वालामुखींचे वारंवार उद्रेक झाले आणि लाव्हा रसाचे थरावर थर चढून सह्याद्री पर्वत रांगांची भिंत आणि त्याच्या पूर्वेकडे दख्खनचे पठार तयार झाले. निवलेल्या लाव्हा रसाच्या पाषाणा पासून भारतीय द्वीपकल्प बनला आहे. या खडकाची (बेसॉल्ट) लक्षावधी वर्षे झीज होऊन तयार झालेली माती म्हणजे दख्खनच्या पठारावरची काळी (ब्लॅक कॉटन) माती.

सह्याद्रीच्या माथ्यावर आणि पश्चिमी उतारावर पडणाऱ्या प्रचंड पावसामुळे तिथल्या पाषाणाची निराळ्या प्रकारे झीज झाली. त्यातून विशिष्ट विद्राव्य घटक वाहून गेले आणि त्याचे रासायनिक स्वरूप बदलले. त्याचा रंग लाल झाला आणि त्यालाच आपण 'जांभा' (लॅटराईट) म्हणून ओळखतो. या जांभ्याची झीज होऊन सह्याद्री आणि कोकणातली लाल माती तयार झाली.

### सह्याद्री पर्वतरांगांचे स्थान आणि विस्तार–

- क्षेत्रफळ १६४,००० चौ.कि.मी. आहे.
- गुजरात सीमेपासून दक्षिणेला कन्याकुमारीपर्यंत समुद्र किनाऱ्याला समांतर १५०० कि.मी. लांब.

# सह्याद्रीची जैवविविधता



# प्रकरण २

## सह्याद्रीचा शेती व पाण्यावरील प्रभाव



सह्याद्री पर्वतरांगांमुळे दरवर्षी हिंदी महासागरातून येणारा नैऋत्य मान्सून अडतो आणि घाटमाथ्यावर प्रचंड पाऊस पडतो. **प्रमुख जलविभाजक मानला जातो.**



उत्तर व दक्षिण कोकण, मध्ये घाटमाथा, पूर्वेकडे दोन संक्रमण प्रदेश आणि पर्जन्यछायेचा प्रदेश असे महाराष्ट्राच्या ९ पैकी ६ कृषी हवामान विभाग सह्याद्री पर्वतामुळे बनतात.



महाराष्ट्रात होणारे पावसाचे वाटप, इथल्या मातीची सुपीकता,नद्यांचे प्रवाहीपण, विविध कृषी हवामान विभागांची जडणघडण हे सर्व थेट किंवा अप्रत्यक्षपणे सह्याद्री मुळेच घडले.

**सह्याद्री पासून मिळणाऱ्या पर्यावरणीय सेवा,नैसर्गिक संसाधने आणि मनुष्यबळ**


- शहरी आणि औद्योगिक वसाहती साठी पाणी व वीजनिर्मिती
- नद्यांच्या वाहून आलेल्या गाळा मुळे सुपीक खोरी
- खनिज संपत्ती(ॲल्युमिनियम ,लोह,पोलाद, खडी,वाळू इ)
- औषधी वनस्पती ,फळे,फुले,उत्तम लाकूड, कोळसा,सरपण
- शहरी आणि औद्योगिक वसाहती साठी मनुष्यबळ
- उद्योगा साठी लागणारा इतर कच्चा माल
- महाराष्ट्रातील मध्यम व मोठी १८०० धरणे.

# प्रकरण 3

## वनस्पती परिचय

पृथ्वीवरील हिरवाईचा आपल्या प्राचीन ग्रंथांमध्ये 'भूवस्त्र', म्हणजे भूमीचे वस्त्र, असा उल्लेख आहे. अंदाजे पंचेचाळीस कोटी वर्षांपूर्वी उत्पन्न झालेल्या पहिल्या सूक्ष्म वनस्पती पासून आजवर वनस्पतींमुळे इतर सजीव, पशु, पक्षी उत्क्रांत व्हायला पोषक वातावरण पृथ्वीवर तयार झालं.







# प्रकरण ४

## डोंगराचे महत्व

जलचक्रातील भूमिका:

डोंगरांची जलचक्रातील भूमिका अत्यंत महत्वाची आहे. डोंगर पाण्याच्या अजस्त्र टाक्यांचे काम करतात. जिथे डोंगर आणि त्यावर अरण्य अशी व्यवस्था कार्यरत असते, तिथे हमखास पाऊस पडतो, मुरतो, साठतो आणि पुढे वितरीत होतो. डोंगरांच्या पृष्ठभागावरील वनस्पतींच्या मुळांना धरून आत मुरलेले पावसाचे पाणी डोंगराच्या पोटातील भूजलधारक खडकांमध्ये (ॲक्विफर्स) साठते आणि मग लहान मोठे झरे, ओढे, नाले यांच्या रूपाने बाहेर वाहते. डोंगराच्या प्रत्येक जागेवर जमिनीचा चढ उतार, सूर्य प्रकाशाचा कालावधी व तीव्रता, वाऱ्याचा प्रभाव बदलत गेल्याने वेगवेगळ्या प्रकारचे सूक्ष्म वातावरण निर्माण होऊन वनस्पतींची विविधता निर्माण होते. यावर इतर सर्व पशु, पक्षी, सूक्ष्मजीव आणि कीटकांची विविधता, त्यांचे अधिवास, अन्नसाखळ्या, परस्परावलंबन आणि निरंतर उत्क्रांती असा पुढचा क्रम ठरलेला असतो. याने प्रचंड जीवविधता निर्माण होते. (जीविधता किंवा जैव विविधता म्हणजे – लक्षावधी वर्षांच्या उत्क्रांतीतून त्या त्या ठिकाणी स्थिरावलेल्या वनस्पती, सूक्ष्मजीव, कीटक, पक्षी, पशु अश्या सर्व सजीवांचे तिथे टिकून राहिलेलं आस्तित्व)



# प्रकरण ५

## औद्योगिक क्रांतीचा परिणाम

निसर्गातील घडामोडींना अनुसरून होणारे बदल वगळता इथल्या व्यवस्थेत तीन साडेतीनशे वर्षांपूर्वी पर्यंत फारसा फरक पडला नाही. निसर्ग नियमांप्रमाणे उत्क्रांती, नवनवीन प्रजातींची निर्मिती आणि काही जुन्या प्रजाती नामशेष होणे ही प्रक्रिया सुरु होती. मात्र गेल्या दोन अडीच शतकांमध्ये औद्योगिक क्रांती, इंग्रजांचा भारतावर कब्जा आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे लोकसंख्येची बेसुमार वाढ यांचा ताण आता प्रचंड प्रमाणात वाढल्याने सह्याद्रीचे स्वरूप झपाट्याने बदलू लागले आहे.

औद्योगिक अर्थव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून सह्याद्री पर्वतरांगा म्हणजे वेगवेगळ्या नैसर्गिक संसाधनांचा अजस्त्र खजिनाच आहे. पाणी, लोह आणि बॉक्साईट सारखे महत्वाचे धातू, असंख्य वनस्पतीजन्य उत्पादनं, उर्जा, मनुष्यबळ... या सगळ्यावर उद्योगाची दृष्टी पडली आणि त्याचे परिणाम आता सर्वत्र उघड दिसत आहेत.

# प्रकरण ६

## सह्याद्रीतील शेतीची दुरावस्था

ज्याच्याकडे पावसानंतर पाण्याची सोय नाही, त्यांच्या समोर प्रपंच चालवायचे मोठे आव्हान उभे राहते. पाऊस सरला, भातशेती झाली की उरलेले वर्ष पोट भरायला मग एकच पर्याय उरतो – ढोरं बाळगणे आणि दूध विकणे. केवळ रोजच्या दुध विक्रीवर कसाबसा उदरनिर्वाह उभा असल्यामुळे त्याला प्राधान्य दिलं जातं, आणि त्यामुळे काही निष्कर्ष आणि कृती आपोआप होतात.


सह्याद्रीमध्ये बहुतेक शेतकऱ्यांकडे भात खाचरां शिवाय डोंगर उतारावरची किंवा पठारावरची खाजगी राने आहेत. पण गवताला ऊन मिळायला हवं यासाठी उतारावर वाढलेले सगळे स्थानिक जंगली वृक्ष तोडून टाकले जातात. पाऊस पडला की हिरवा चारा कापून नेला जातो. साधारण शिमग्याच्या सुमारास डोंगरावरचे उरलेले गवत सुकून पिवळे झाले की वणवा पेटवण्यात येतो. संपूर्ण डोंगर करपून उजाड बोडका होतो. पण दुध उत्पादक समाधानी असतो, कारण वणव्याची राख पडल्यामुळे येत्या पावसात गवत जोमाने उगवणार.



# वृक्षतोड आणि वणव्यांचे दुष्परिणाम

डोंगर उतार जाळून उजाड करण्याचे अनेक उघड दुष्परिणाम आहेत, पण सर्वात महत्वाचा दुष्परिणाम म्हणजे शेतकऱ्याने आपल्या हाताने केलेला आपल्या भविष्याचा सर्वनाश. सह्याद्रीतल्या शेतीची आणि त्यावर अवलंबित शेतकऱ्याची ही दुरवस्था अगदी स्पष्ट शब्दात, कृषी विद्यापीठांतील तज्ञ आणि धोरणकर्ते राजकारणी यांनी केलेलं अक्षम्य दुर्लक्ष आणि कसलाही अभ्यास न करता सरसकट लागू केलेली धोरणं यांचा परिणाम आहे. सध्याची धोरणं आणि शेती पद्धती अशीच सुरु राहिली तर अजून काही वर्षानंतर म्हातारी होऊ लागलेली कर्ती पिढी आणि शेतीपासून पूर्ण तुटत चाललेली तरुण पिढी यांची परिस्थिती कशी असेल ?

इथल्या शेतीची अवस्था काय असेल ?



# प्रकरण ७

## शेतकऱ्याच्या भविष्यातील समस्या

- शेतीपासून अनेक वर्ष दूर राहिलेल्या आणि शेतीचे विज्ञान, अर्थशास्त्र या सगळ्याचा कसलाही अभ्यास नसलेल्या व्यक्तीला शेती करता येणार नाही.

- वृक्षसंपदा संपल्यामुळे जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण घटत जाऊन भूजल पातळी खोलवर जाईल.

  उजाड उतारांवरून धुपून वाहून आलेली माती धरणामध्ये साठून पुराचे धोके निर्माण होतील.

- झाडोरा नष्ट केल्यामुळे दरडी कोसळण्याचं, अचानक पूर येण्याचं प्रमाण वाढेल.


- वन्य पशुपक्षांचा आसरा नष्ट होऊन ते अजून संख्येने आपल्या शेतांवर हल्ला चढवतील. मांसाहारी प्राणी नाईलाजास्तव मानवी वस्त्यांमध्ये हल्ले करतील.

- शेतीतील अपुऱ्या उत्पन्नामूळे शेतकऱ्यांना आपल्या जमिनी सोडून मोलमजुरी आणि मिळेल त्या कामाच्या शोधत भटकावं लागेल.

- सगळ्याच शेतजमिनी विकल्या जाऊ शकत नाहीत. शहराजवळच्या, विकासाच्या कक्षेत येणाऱ्या जमिनी फक्त विकल्या जातील त्यामुळे जमीन विकून पैसे मिळतील असे नाही.

# प्रकरण ८

## पुढची पावलं- समृद्धीची त्रिसूत्री




गेल्या काही दशकांमध्ये जमिनीचे पिढीगणिक तुकडे पडू लागले आणि आज आपल्या देशात फार मोठ्या प्रमाणात अल्पभूधारक शेतकरी तयार झाले आहेत. जमिनीच्या छोट्या तुकड्यांवर, कोरडवाहू शेतीवर कुटुंबाच्या गरजा भागणे शक्य नाही. सर्वात महत्वाचा बदल घडला आहे तो बाजार व्यवस्थेत. जागतिक स्तरावर धंदा करणाऱ्या प्रचंड कंपन्या आणि व्यापाऱ्यांची बाजारावर मजबूत पकड आहे. आर्थिक भांडवल नसलेला, कर्जाखाली दबलेला एकटा-दुकटा शेतकरी अश्या बाजारात टिकणं फार अवघड आहे.

## उपाय



**संघटन- शेतकऱ्यांनी एकत्र येणे. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शेतकरी गट आणि उत्पादक कंपन्या उभारणे.** आज निरनिराळ्या कारणांमुळे गटा-गटात विखुरलेल्या शेतकऱ्यांना आपली जात, धर्म, राजकीय पक्ष, भावकी ई. सर्व कारणं बाजूला सारून निव्वळ शेतकरी म्हणून एकत्र यावं लागेल, त्याशिवाय इथून पुढे टिकाव लागणार नाही. सुदैवाने, शेतकऱ्यांनी एकत्र येण्यासाठी अनेक सोयीस्कर मार्ग शासनाने गेल्या काही वर्षात उपलब्ध केले आहेत. संघटीत होण्याचे अनेक फायदे आहेत.

१. गटाच्या / कंपनीच्या सदस्यांनी एकत्र येऊन, अभ्यास आणि नियोजन करून आपल्या जमिनी कसल्या तर उत्पादित मालाचे प्रमाण जास्त असेल, गुणवत्ता एकसारखी असेल आणि मोठ्या बाजारपेठेत घेऊन जायला आणि विक्री करायला सामुहिक व्यवस्था असल्यामुळे खर्च विभागला जाईल.

२ शेतीसाठी लागणाऱ्या निविष्ठा, यंत्र सामुग्री, औजारे ई. एकत्र चर्चा आणि नियोजन करून आणलं तर सर्वांना आपापसात वापरता येईल आणि भांडवली खर्च बराच कमी होऊ शकेल.

३. गटाच्या शेतमालाचा ब्रँड बनवणं, जाहिरात करून थेट ग्राहकांना विक्री करता येणं हे एकत्र आल्यावरच परवडू शकेल.

४. शेतकऱ्यांची शिकलेली मुलं याच कंपन्यांमध्ये आपापल्या शिक्षण, आवड आणि अनुभवाप्रमाणे पूर्णवेळ काम करू शकतात. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला स्थिरता येईल, आणि याचे सामाजिक परिणाम खोलवर होतील. तरुणांना गाव सोडून नोकरीच्या शोधात भटकाव लागणार नाही.

५. अशा स्थानिक प्रकल्पांचा अविभाज्य घटक असेल कौशल्याधारित शिक्षण आणि प्रशिक्षण. अशा प्रकल्पांमध्ये स्थानिक तरुण मुलंमुली काम करत प्रशिक्षण घेतील आणि मग तिथेच कामावर रुजू होतील.

६. स्थानिक पर्यावरणाचे संवर्धन होऊ लागले आणि स्थानिक युवकांना तिथेच रोजगार मिळू लागला तर 'मुलगा काय करतो' या प्रश्नाला 'आपल्या गावच्या कंपनीत कामाला आहे' असे अभिमानाने उत्तर मिळू शकते. तिथून पुढे समाजात शेतकऱ्याची पत हळूहळू पण निश्चितपणे वाढू शकेल, नियमित पगार मिळत असल्यामुळे स्थानिक युवकांच्या लग्नाचा प्रश्न सुटायला मदत होईल.

**संवर्धन:**



शेतकरी एकत्र येणं महत्वाचं आहेच, पण ते एकत्र येऊन नेमकं काय करतात हे जास्त महत्वाचं आहे. एकत्र आल्यावर सर्वांनी मिळून घेतलेला प्रत्येक निर्णय हा अभ्यास करूनच घेतलेला असावा. स्थानिक निसर्गाचा अभ्यास करून, काटेकोर नियोजन करून सुयोग्य पिकं निवडणे, जास्तीत जास्त बहुवार्षिक झाडं जोपासणे, शाश्वत शेती पद्धती स्वीकारणे, बाजारावरचे अवलंबन शक्य तितके कमी करत जाणं, हे सर्व करताना घरच्या अन्नाच्या गरजा शक्य तितक्या शेतीतून भागवणं, माती-पाणी संवर्धनाकडे बारीक लक्ष ठेवणे या सर्व बाबी अत्यंत महत्वाच्या आहेत. सह्याद्रीच्या डोंगराळ भागातील हवामान, माती, पर्जन्यमान या सर्वांशी व्यवस्थित जुळवून घेणाऱ्या स्थानिक वनस्पतींची लागवड करणे. डोंगर 'भूवस्त्राने' झाकला जाईल तशी माती, पाणी, पाऊस सगळच सुधारत जाईल. महत्वाचं म्हणजे हे वनीकरण काही धर्मादाय समाजसेवा नाही. अभ्यासपूर्ण आणि प्रामाणिक प्रयत्न केल्यास यातून उत्तम फायदा होणार हे नक्की.

**मूल्यवर्धन:**



शेतमाल नाशवंत असतो हे बाजार व्यवस्थेला फार पूर्वी उमगलेलं आहे. म्हणूनच व्यापारी कधीही गरिबीला कंटाळून आत्महत्या करत नाही. आज एकविसाव्या शतकात सुद्धा काहीच बदललेलं नाही. आज देखील भाव मिळत नाही म्हणून शेतकरी आपली पिकं वारंवार बाजारात फेकून देतात, दूध ओतून टाकतात, शेतात पिकावर ट्रॅक्टर घालतात. पण याचं एक मुख्य कारण म्हणजे शेतकरी कच्चा शेतमाल विकायला जातात, जो अतिशय नाशवंत असतो. या सापळ्यातून सुटायचा एक मार्ग आहे, तो म्हणजे मूल्यवर्धन. शेतमालावर किमान प्राथमिक आणि पुढे शक्य तितकं मूल्यवर्धन शेतकऱ्यानेच, म्हणजे शेतकरी गटाने अथवा कंपनीने केले तर खात्रीने शेतीत फायदा दिसेल.

शाश्वत विकासाचे मूलमंत्र

# १. संघटित शेती

## (शेतकरी सामूहिक व्यवसाय संघटनेचे प्रकार)

भारताची अर्थव्यवस्था ही कृषीकेंद्रित आहे. आजही ५०% हून अधिक लोक त्यांच्या उपजीविकेसाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या शेती उपक्रमांवर अवलंबून आहेत, पण आपला देश शेतीप्रधान असूनही दीर्घकाळापासून शेतकऱ्यांचा संघर्ष आजही सुरूच आहे. मुल्यसाखळीत शेतकऱ्यांचा समावेश नसल्याने, आहे त्या किमतीचा फायदा सामान्य शेतकरी घेऊ शकलेला नाही. शेतकऱ्यांच्या हातात असलेल्या शेतमालाची किंमत आणि अंतिम ग्राहकांच्या हातात असलेल्या मालाची किंमत यात देखील मोठी तफावत आहे.

### १. शेतकऱ्यांचा संघर्षः कारणे आणि आव्हाने

#### १.१ कमी उत्पन्न आणि वाढता खर्च

शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांसाठी योग्य किंमत मिळत नाही, त्यामुळे त्यांचे उत्पन्न कमी होते. दुसरीकडे, बियाणे, खते, कीटकनाशके आणि मजुरी यासारख्या खर्चांमध्ये सतत वाढ होत आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते.

#### १.२ अस्थिर बाजारपेठ

भारतीय बाजारपेठेतील किमतींचा अस्थिरपणा आणि बाजारपेठांतील स्पर्धा हे शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान आहे. बाजारपेठांबद्दल योग्य माहिती नसल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांसाठी चांगली किंमत मिळत नाही.

#### १.३ साठवण आणि वितरण सुविधांची कमतरता

योग्य साठवण आणि वितरण सुविधांची कमतरता ही आणखी एक समस्या आहे. या सुविधांच्या अभावामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन खराब होते, आणि त्यांना मोठे नुकसान सहन करावे लागते.

#### १.४ क्रेडिट आणि कर्जाचा अभाव

बँकिंग सुविधांच्या अभावामुळे आणि कर्जाच्या अटी कठीण असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज मिळत नाही. यामुळे ते सावकारांच्या कर्जात अडकतात आणि कर्जबाजारी होतात. अशाप्रकारे सर्व बाजूंनी शेतकरी अडचणीत आहे. आणि अडचणीतून स्वतः शिवाय त्याला कोणीही बाहेर काढू शकत नाही. या अडचणीतून बाहेर पडण्यासाठी शेतकाऱ्यांना अशी पावले उचलावी लागतील.

- शेतीला उद्योग व्यवसायाची जोड देणे.
- शेतमालावर स्वतः प्रक्रिया करून विकणे.
- शेतमाल अंतिम ग्राहकापर्यंत पोहचवणे
- शेतमालाला योग्य बाजारभाव मिळेपर्यंत गोदाम व कोल्ड स्टोरेज मध्ये साठवून ठेवणे.

परंतु शेती सांभाळून शेतकऱ्याला हे सर्व करणे शक्य होत नाही. एकट्या शेतकऱ्यामध्ये तेवढी क्षमता देखील नाही. या सर्व अडचणींमधून बाहेर येण्यासाठी शेतकरी गट किंवा शेतकरी उत्पादक कंपनीच्या रूपाने एक संधी चालून आलेली आहे. शेतकरी संघटीत झाल्यास आणि एकत्रित येवून उद्योग व्यवसाय सुरु केला तरच परिवर्तन शक्य आहे. केंद्र सरकार आणि राज्य शासनाचे देखील हेच धोरण आहे त्यामुळेच शेतकरी गट किंवा शेतकरी उत्पादक कंपनीना सरकारने विविध योजना आणि सवलती उपलब्ध करून दिलेल्या आहेत. शेतकरी बंधूंनी संघटित होऊन उद्योजकतेकडे वाटचाल करावी. हाच या पुस्तिकेचा मूळ उद्देश आहे. शेतकरी बंधूंनी संघटित होऊन त्याचे रूपांतर फार्मर प्रोड्युसर कंपनी किंवा शेतकरी गटाच्या माध्यमातून शक्य तितक्या लवकर उद्योग किंवा व्यवसाय सुरु करणे अपेक्षित आहे, आणि त्यांनी उद्योग किंवा व्यवसाय सुरु केले तरच त्यांना शासकीय योजनांद्वारे अनुदान किंवा इतर लाभ मिळू शकतात.

## २. शेतकरी उद्योगांचे विविध पर्याय आणि पद्धती

शेतकरी एकत्र यायला तयार झाले की नेमकं कुठून सुरुवात करायची आणि कोणत्या दिशेने पुढे जायचं हे सर्वांना विचार विनिमय आणि अभ्यास करून ठरवावे लागणार आहे. सह्याद्री मध्ये भविष्यात शाश्वत चालतील असे व्यवसाय किवा उत्पादने कोणती ते सतत शोधावे लागेल. मुख्य म्हणजे आपल्या उद्योगाचे स्वरूप, कायदेशीर मर्यादा, नियम ई. हे अगदी स्पष्ट समजले पाहिजे.

या उद्योगांची प्रमुख वैशिष्ट्ये अशी असतील.

- पर्यावरणीय दृष्ट्या शाश्वत
- आर्थिक दृष्ट्या फायदेशीर
- एकाच व्यक्ती किवा परिवाराचा फायदा हा हेतू नसून सर्व सभासदांची समृद्धी हे ध्येय स्पष्ट असावं
- फार मोठ्या भांडवलाची गरज नसावी
- शक्य तो सुयोग्य तंत्रज्ञानाचा वापर
- कमीत कमीत देखभालीचे श्रम आणि खर्च
- कायमस्वरूपी, सामाजिक प्रतिष्ठा असलेले, बारमाही ग्रामीण रोजगार तयार करतील असे उद्योग

### २.१ महिला सामूहिक स्वयंसहाय्यता /बचत गट

भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या काळात महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी विविध योजना सुरु करण्यात आल्या आहेत. पूर्वीच्या काळातील चालीरीती, परंपरा आणि रूढींमुळे महिलांना अनेक आर्थिक, सामाजिक, आणि आरोग्य संबंधी समस्यांना तोंड द्यावे लागले आहे. पण मागील काही वर्षांपासून महिला सक्षमीकरणावर अधिक भर देण्यात आला आहे, ज्यामुळे महिलांचे स्वयंसहाय्यता बचत गट ही चळवळ देशभर जोर धरत आहे. महिलांनी आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनण्यासाठी एकत्र येणे आवश्यक आहे. यामुळे महिलांना स्वतःच्या कुटुंब आणि समाजासाठी योगदान देऊन त्यांची क्षमता सिद्ध करता येईल. महिला सक्षमीकरण आणि आर्थिक सक्षमीकरणाची चळवळ स्वयंसहाय्यता बचत गटांमुळे अधिक यशस्वी होत आहे.

#### २.१.१ स्वयंसहाय्यता बचत गट म्हणजे काय?

स्वयंसहाय्यता म्हणजे स्वतःची मदत स्वतः करणे, इतर कोणावर अवलंबून न राहता आपली समस्या स्वतः सोडवणे. स्वयंसहाय्यता बचत गटांमध्ये सामान्यतः १५ ते २० महिला एकत्र येऊन, समान आर्थिक गरज असलेल्या महिलांची टीम तयार होते. हा गट एकत्र येऊन, ठरावीक कालावधीत समान रक्कम जमा करतो, ज्याचा वापर सदस्यांच्या आर्थिक गरजांसाठी किंवा व्यवसाय उभारणीसाठी कर्ज देण्यासाठी होतो. अशा प्रकारे तयार झालेल्या गटाला ''स्वयंसहाय्यता बचत गट'' म्हणतात.

#### २.१.२ महिला बचत गटाची उद्दिष्टे:

- गरीब आणि दारिद्र्य रेषेखालील महिलांची पिळवणूक थांबवून, त्यांना समाजात आदराने जगता येईल हे सुनिश्चित करणे.
- सावकारांच्या कर्जाच्या जाळ्यात अडकण्याचे टाळणे आणि महिलांना नियमित बचत करण्यास प्रोत्साहन देणे.
- महिलांना त्यांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी लहान कर्ज उपलब्ध करून देणे.

#### २.१.3 यशस्वी महिला बचत गटाच्या जबाबदाऱ्या

- गटाचे योग्य नियोजन आणि स्पष्ट नियमावली तयार करणे.

- गटप्रमुख दरवर्षी बदलणे.
- पासबुकमध्ये खाडाखोड न करणे आणि योग्य पद्धतीने लेखा नोंदी करणे.
- गटातील सर्व सदस्यांची बचत समान असणे.
- बँकेत बचत गटाच्या नावाने खाते उघडणे आणि मासिक जमा–खर्चाचे तपशील तपासणे.
- गटाच्या सुरुवातीच्या ६ महिन्यात कोणतेही कर्ज न देणे.
- नियमित मासिक मिटिंग घेणे आणि निर्णयांची नोंद करणे.

### २.१.४ महिला बचत गट (SHG) नोंदणी प्रक्रिया:

- महिला बचत गट (SHG) नोंदणी करण्याची प्रक्रिया आणि लागणारी कागदपत्रे विविध राज्यांमध्ये थोडक्यात भिन्न असू शकतात, परंतु सामान्यतः या प्रक्रियेत पुढील गोष्टींचा समावेश असतो:

### नोंदणी प्रक्रिया:

- गटाची स्थापना: गटाच्या सदस्यांनी एकत्र येऊन गटाची स्थापना करावी. यामध्ये सदस्यांची संख्या, उद्दिष्टे, कार्यप्रणाली इत्यादी ठरवाव्या लागतात.
- गटाची माहिती तयार करणे: गटाची नाव, उद्दिष्टे, सदस्यांची माहिती, समितीचे सदस्य यांची माहिती तयार करावी लागते.
- नोंदणी फॉर्म भरणे: संबंधित कार्यालयात नोंदणीसाठी आवश्यक फॉर्म भरावे लागतात.
  हे फॉर्म स्थानिक सरकारी कार्यालयांमध्ये किंवा संबंधित बँक शाखांमध्ये मिळू शकतात.

### लागणारी कागदपत्रे:

- सदस्यांची ओळखपत्रे: प्रत्येक सदस्याचे ओळखपत्र (उदा. आधार कार्ड, पॅन कार्ड).
- पत्याचा पुरावा: पत्याचा पुरावा (उदा. रेशन कार्ड, वीज बील).
- गटाच्या स्थापनेचा कागदपत्र: गटाच्या सदस्यांची यादी, उद्दिष्टे, कार्यप्रणाली यांचा समावेश असलेला कागदपत्र.
- बँक खात्याचे तपशील: गटाचे बँक खात्याचे तपशील.

### संपर्क साधण्याचे ठिकाण:

- महिला आर्थिक विकास निगम (MAVIM): MAVIM  कार्यालयामार्फत गट नोंदणीसाठी मार्गदर्शन मिळू शकते. MAVIM चे कार्यालय जिल्हा स्तरावर उपलब्ध असते.
- जिल्हा सामाजिक कल्याण कार्यालय: महिलांच्या बचत गटाच्या नोंदणीसाठी जिल्हा सामाजिक कल्याण कार्यालय किंवा संबंधित विभागाकडून माहिती मिळू शकते.
- स्थानिक बँक शाखा: बँक शाखांच्या माध्यमातून गटाच्या नोंदणीसाठी आणि निधी प्राप्तीच्या प्रक्रियेविषयी माहिती मिळू शकते.

### २.१.५ महिला बचत गटा करिता मिळणारे वेगवेगळ्या विभागातून अनुदान:

शेती विभाग

- अनुदान टक्केवारी: ४०% पर्यंत
- उद्योग/काम: शेती उपकरणे, पाणी व्यवस्थापन, सेंद्रिय खते, बियाणे वितरण, शेत तळे बांधणे, शेतातील सुधारणा.

- संपर्क: तालुका शेती अधिकारी किंवा जिल्हा शेती अधिकारी.
- कागदपत्रे: अर्ज, महिला बचत गट नोंदणी प्रमाणपत्र, बँक खाते तपशील, शेत जमिनीची माहिती, प्रकल्प योजना

### ग्रामविकास विभाग

- अनुदान टक्केवारी: ५०% पर्यंत
- उद्योग/काम: स्वच्छता प्रकल्प, सांडपाणी व्यवस्थापन, ग्रामीण पायाभूत सुविधा, सामुदायिक शौचालये, वाचनालये.
- संपर्क: ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय किंवा जिल्हा ग्रामविकास अधिकारी.

### कागदपत्रे:

- अर्ज
- महिला बचत गट नोंदणी प्रमाणपत्र
- प्रकल्प आराखडा
- बँक खाते तपशील

### जिल्हा परिषद

- अनुदान टक्केवारी: ४०% पर्यंत
- उद्योग/काम: शिक्षण,आरोग्य, महिला व बालकल्याण, जलसंवर्धन प्रकल्प, ग्रामीण रस्ते आणि पायाभूत सुविधा
- संपर्क: जिल्हा परिषद कार्यालयातील संबंधित अधिकारी.

### कागदपत्रे:

- अर्ज
- महिला बचत गट नोंदणी प्रमाणपत्र
- प्रकल्प आराखडा
- बँक खाते तपशील

### दूग्धविकास विभाग

- अनुदान टक्केवारी: ५०% पर्यंत
- उद्योग/काम: दूग्धशाळा उभारणी, दूध प्रक्रिया यंत्रसामग्री, पशुधन व्यवस्थापन, चारा व्यवस्थापन.
- संपर्क: जिल्हा दूग्धविकास अधिकारी.

### कागदपत्रे:

- अर्ज
- महिला बचत गट नोंदणी प्रमाणपत्र
- दूग्धविकास प्रकल्प योजना
- बँक खाते तपशील

### कौशल्यवर्धन विभाग

- अनुदान टक्केवारी: ६०% पर्यंत

हे माहितीचे तपशील स्थानिक कार्यालयाशी संपर्क करून अद्ययावत करून घेणे उपयुक्त ठरेल, कारण योजनांचे नियम आणि अटी वेळोवेळी बदलू शकतात.

### २.१.६ महिला बचत गटांसाठी कर्ज देणाऱ्या काही प्रमुख संस्थां:

महिला बचत गटांसाठी कर्ज देणाऱ्या काही प्रमुख संस्थांची माहिती आणि त्यासाठी आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे:

महाराष्ट्र महिला आर्थिक विकास महामंडळ (MAVIM):

कर्ज: MAVIM महिला बचत गटांना व्यवसाय सुरू करण्यासाठी आणि उत्पादन वाढवण्यासाठी कर्ज देतो.

कर्जाची रक्कम गटाच्या गरजेवर आणि प्रकल्पाच्या प्रकारावर अवलंबून असते,

सामान्यतः ₹५०,००० ते ₹५,००,००० पर्यंत.

पत्ता: महाराष्ट्र महिला आर्थिक विकास महामंडळ (MAVIM), प्रादेशिक कार्यालय, मुंबई.

फोन: संबंधित जिल्हा कार्यालयात संपर्क साधा.

वेबसाइट: https://mavimindia.org

**कागदपत्रे:**

- अर्ज
- महिला बचत गट नोंदणी प्रमाणपत्र
- बँक खाते तपशील
- ओळखपत्र (आधार कार्ड, पॅन कार्ड)
- व्यवसाय योजना किंवा प्रकल्प आराखडा
- प्रधानमंत्री रोजगार योजना (PMEGP):

कर्ज: पीएमईजीपी अंतर्गत महिला बचत गटांना व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज प्रदान केले जाते.

कर्जाची रक्कम ₹१,००,००० ते ₹२५,००,००० पर्यंत असू शकते.

पत्ता: जिल्हा उद्योग केंद्र (DIC)

फोन: संबंधित जिल्हा उद्योग केंद्र

वेबसाइट: https://www.kvic.gov.in

**कागदपत्रे:**

- अर्ज
- महिला बचत गट नोंदणी प्रमाणपत्र
- बँक खाते तपशील
- ओळखपत्र (आधार कार्ड, पॅन कार्ड)
- व्यवसाय योजना

NAFIN (National Bank for Agriculture and Rural Development - NABARD)

कर्ज: NAFIN महिला बचत गटांसाठी विविध प्रकारची कर्ज सुविधा उपलब्ध करून देते. हे कर्ज सामान्यतः गटाच्या आर्थिक वाढीसाठी, व्यापार सुरू करण्यासाठी किंवा सामाजिक योजनांसाठी वापरले जाते.

संपर्क: गटाच्या सदस्यांनी त्यांच्या संबंधित NAFIN कार्यालयात किंवा NABARD कार्यालयात संपर्क साधून कर्जासाठी अर्ज करावा लागतो.

- उद्योग/काम: कौशल्यवर्धन प्रशिक्षण, व्यवसाय प्रारंभ, उपकरणे खरेदी, स्वयंपूर्णतेसाठी आवश्यक सामग्री.
- संपर्क: कौशल्यवर्धन अधिकारी किंवा संबंधित प्रशिक्षण केंद्र.

**कागदपत्रे:**

- अर्ज
- महिला बचत गट नोंदणी प्रमाणपत्र
- प्रशिक्षण योजना
- बँक खाते तपशील

### महसूल विभाग

- अनुदान टक्केवारी: ४०% पर्यंत
- उद्योग/काम: जमीन पुनर्वसन, जलसंधारण कार्य, भूमि सुधारणा.
- संपर्क: तहसीलदार किंवा संबंधित महसूल अधिकारी.

**कागदपत्रे:**

- अर्ज
- महिला बचत गट नोंदणी प्रमाणपत्र
- जमीन मालकी कागदपत्रे
- आपत्ती प्रमाणपत्र (जसे की पूर, दुष्काळ)
- बँक खाते तपशील

### लघु उद्योग विभाग

- अनुदान टक्केवारी: ३५% पर्यंत
- उद्योग/काम: सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) स्थापनेसाठी, अन्नप्रक्रिया, हस्तकला, ग्रामोद्योग.
- संपर्क: जिल्हा उद्योग केंद्र (DIC) किंवा लघु उद्योग विकास अधिकारी.

**कागदपत्रे:**

- अर्ज
- महिला बचत गट नोंदणी प्रमाणपत्र
- उद्योग योजना
- वित्तीय माहिती
- बँक खाते तपशील

**सामान्य प्रक्रिया:**

- अर्ज भरणे: संबंधित विभागाच्या कार्यालयात अर्ज सादर करावा.
- प्रकल्पाचा आराखडा: प्रकल्पाची योजना तयार करून सादर करावी.
- कागदपत्रे संकलन: आवश्यक कागदपत्रे तयार करून संलग्न करावी.
- संपर्क: संबंधित विभागाच्या अधिकाऱ्याशी संपर्क साधा.
- अनुदान प्राप्ती: अर्ज मंजूर झाल्यावर अनुदानाची रक्कम संबंधित खात्यात जमा केली जाते.

पत्ता: NABARD मुख्यालय, मुंबई

फोन: संबंधित क्षेत्रीय कार्यालय

वेबसाइट:: https://www.nabard.org/

**कागदपत्रे:**

- अर्ज
- महिला बचत गट नोंदणी प्रमाणपत्र
- बँक खाते तपशील
- प्रकल्प आराखडा
- ओळखपत्र (आधार कार्ड, पॅन कार्ड)

**संचारी कर्ज योजना (Self-Employment Schemes):**

कर्ज: या योजनांमध्ये विविध सरकारी बँका आणि वित्तीय संस्थांद्वारे महिला गटांना कर्ज दिले जाते. कर्जाची रक्कम प्रकल्पाच्या प्रकारा नुसार बदलते.

पत्ता: संबंधित बँक शाखा

फोन: बँक शाखेचे संपर्क क्रमांक

**कागदपत्रे:**

- अर्ज
- महिला बचत गट नोंदणी प्रमाणपत्र
- बँक खाते तपशील
- व्यवसाय योजना
- ओळखपत्र (आधार कार्ड, पॅन कार्ड)

सर्व कर्ज योजनांसाठी अर्ज सादर करताना आपल्याला संबंधित प्रकल्पाची योजना, गटाची माहिती, आणि आर्थिक स्थितीची माहिती आवश्यक असते. स्थानिक कार्यालयाशी संपर्क साधून अधिक तपशीलवार माहिती मिळविणे उपयुक्त ठरेल.

### २.१.७ महिला बचत गट प्रशिक्षण संस्था व संपर्क:

- **राष्ट्रीय महिला आयोग** (NWC)
  प्रशिक्षण: महिला विकास, स्वावलंबन प्रशिक्षण, कौशल्य विकास.
  वेबसाइट: ncwnic.in
  फोन: +९१-११-२३३४ २७०७

- **नाबार्ड** (NABARD)
  प्रशिक्षण: शेतकरी गटांसाठी, महिला बचत गटांसाठी प्रशिक्षण.
  वेबसाइट: http://nabard.org
  फोन: +९१-२२-२६५३ ५११६

- **महिला आणि बालविकास मंत्रालय** (MWCD)
  प्रशिक्षण: महिला सक्षमीकरण, स्वयंसेवी गटांसाठी प्रशिक्षण.
  वेबसाइट: wcdnic.in
  फोन: +९१-११-२३३८ ४०६६

- **पारंपरिक वाणिज्य व हस्तकला प्रशिक्षण केंद्र**
  प्रशिक्षण: हस्तकला, स्वयंपाक, तंतू कलेसंबंधी प्रशिक्षण.
  संपर्क: स्थानिक विकास केंद्र किंवा उद्योजकता केंद्र.

- **महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनाविषयक संस्था** (MSRLM)
  प्रशिक्षण: महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, कौशल्य विकास.
  वेबसाइट: https://www.umed.in/
  फोन: +९१-२२-२६५७ ०७०७
  ई-मेल: msrlm@maharashtra.gov.in

- **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय** (MSME)
  प्रशिक्षण: व्यावसायिक कौशल्य, उद्योग उभारणी प्रशिक्षण.
  वेबसाइट: msdenic.in
  फोन: +९१-११-२३३८ ५७१८

- **महिला आर्थिक विकास महामंडळ मर्यादित (मविम)**

प्रशिक्षण व कार्य:

प्रशिक्षण: MAVIM महिलांना स्वयंसहाय्यता गट, व्यवसायिक कौशल्ये, आणि आर्थिक व्यवस्थापनासंबंधी प्रशिक्षण देते.

कार्य: महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी विविध योजनांचा कार्यान्वयन, व्यवसाय उभारणीसाठी मदत, व स्वयंसेवी गटांना आर्थिक सहाय्य.

फोन: +९१-२२-२६५५ ५२५१ / +९१-२२-२६५५ ४०४२

पत्ता: MAVIM Head Office, 4th Floor, Vasantdada Patil Bhavan, 79, Bhawani Peth, Pune, Maharashtra - 411042

### महिला उद्योजकांसाठी महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना –

## ३. शेतकरी गट

शेतकरी गट म्हणजे एकत्र आलेले शेतकरी, जे स्वतःच्या शेती आणि आर्थिक गरजांसाठी सहकार्य करतात. हे गट विशिष्ट पिकांवर किंवा शेती संबंधित समस्यांवर एकत्र काम करतात आणि त्यांच्या गरजांनुसार उपाय शोधतात. गटाची यशस्विता त्यांच्या एकसमान गरजा, समस्यांमध्ये साम्य, आणि सामूहिक प्रयत्नांवर आधारित असते. गटाने एकत्रितपणे आर्थिक आणि तांत्रिक साहाय्य मिळवण्यासाठी सरकारी योजनांशी आणि वित्तीय संस्थांशी संपर्क साधावा लागतो.

शेतकऱ्यांच्या संघटनांना शेतकऱ्यांच्या सामूहिक स्वसहायता कृतीसाठी एक उपयुक्त संघटन यंत्रणा म्हणून पाहिले जाते, ज्याचा उद्देश त्यांच्या स्वतःच्या आर्थिक आणि सामाजिक स्थिती तसेच त्यांच्या समुदायांची स्थिती सुधारण्यावर आहे. अशा संघटनांना त्यांच्या सदस्यांकडून संसाधने निर्माण करण्याची क्षमता आहे असे मानले जाते. या संघटना स्थानिक स्तरापासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत विविध स्तरांवर कार्य करू शकतात.

### ३.१ शेतकरी गट स्थापन करत असताना

सदस्य निवडीसाठी योग्य सदस्य निवडणे हा पहिला आणि अत्यंत महत्त्वाचा निकष आहे. शेतकऱ्यांनी त्याच गावातील, सामान्य समस्यांची, विशिष्ट पिकासाठी असलेली आवड असलेल्या सदस्यांची निवड करावी.

स्वयंचलितपणे किंवा स्वतःच्या प्रयत्नांद्वारे एकत्र आलेले शेतकरी, त्यांच्या स्वतःच्या आवश्यकतांसाठी उत्तरे शोधण्यासाठी, अशा गटांपेक्षा अधिक प्रभावी असतात ज्यांना बाह्य संस्थांच्या गरजांसाठी एकत्र आणले जाते.

### ३.१.१ गट जडणघडण प्रक्रिया:

गटाच्या जडणघडण प्रक्रिया मध्ये प्रत्येक गट या टप्प्या मधून जातो

- **गटनिर्मिती** (Forming):
  जेव्हा गटाचे सदस्य स्वतःची नोंदणी करतात आणि १-२ प्रारंभिक बैठकांचे आयोजन करतात.
- **वैचारिक चर्चा** (Storming):
  जेव्हा गटाचे सदस्य विविध मुद्दे/संघर्षांवर चर्चा करायला आणि प्रतिक्रिया द्यायला सुरुवात करतात.
- **नियम निर्मिती** (Norming):

जेव्हा गट यशस्वीपणे चालविण्यासाठी नियम बनवायला सुरुवात करतो.

- **विकसनशीलता** (Developing):
  जेव्हा गट सदस्यांना विविध क्षेत्रांमध्ये क्षमता निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण दिले जाते.
- **कार्यप्रदर्शन** (Performing):
  जेव्हा गट विकसनशील कार्यक्रमांमध्ये वस्तूंचे नियोजन, इनपुट आणि आउटपुटचे व्यवस्थापन, मूल्यवर्धन, पॅकेजिंग, ग्रेडिंग, वाहतूक, विपणन इत्यादीमध्ये सहभागी होऊन कार्य करायला सुरुवात करतो.

### ३.१.२ शेतकरी गटाची वैशिष्ट्ये:

- शेतकरी गटमध्ये सदस्यांची संख्या १५ ते २० असते.
- वय – १८ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त
- गावातील शेती करणारा शेतकरी

### ३.१.३ शेतकरी गट तयार करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे:

- गटासाठी निकष:
- समान गरजा
- समान समस्या
- समान पीक
- उत्पादनातील समानता
- सामाजिक-आर्थिक स्थितीतील समरूपता

### ३.१.४. शेतकरी गट शेतकरी गटाद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सेवा:

- व्यापार
- विमा
- क्रेडिट लिंकेजेस
- साठवण / गोदाम सुविधा
- आयसीटी- बाजार माहिती, किंमत माहिती, तंत्रज्ञान प्रक्रिया
- इनपुट लिंकेजेस – खते, शेणखत, सिंचन, उपकरणे आणि कीटकनाशके
- जलसंधारण क्रियाकलाप, पाण्याचे बजेटिंग आणि पाणी ऑडिट
- क्षमता निर्माण
- बियाणे प्रक्रिया आणि बियाणे
- बँक
- तांत्रिक समर्थन
- निधी उभारणी
- शासकीय लिंकेजेस
- अल्प, मध्यम आणि दीर्घकालीन कर्जे
- बियाणे बँकिंग आणि प्रक्रिया
- विपणन, निर्यात इत्यादी

### ३.१.५ गटांची नोंदणी प्रक्रिया:

तालुका कृषी कार्यालयामध्ये आत्मा संस्थेच्या अधिकाऱ्यामार्फत गटाची नोंदणी करणे.

शेतकरी गट नोंदणी कागदपत्रे खालील प्रमाणे :

शेतकरी गटाची प्रस्तावित नोंदणी अर्ज: गटाचे नाव, सदस्यांची माहिती, उद्दिष्टे इत्यादी माहिती असलेला अर्ज

सदस्यांची यादी: गटातील सर्व सदस्यांची नावे, पत्ते, आणि ओळख क्रमांक (जसे आधार कार्ड, मतदान ओळखपत्र) इत्यादी.

संविधान आणि नियमावली: गटाच्या संविधानाचा मसुदा, ज्यामध्ये गटाच्या उद्दिष्टांची तपशीलवार माहिती, कार्यप्रणाली, सभासदांच्या अधिकार आणि कर्तव्यांची माहिती असेल.

सर्वसाधारण सभेचा ठराव: गटाच्या स्थापनासंबंधी सर्व सदस्यांच्या हस्ताक्षरांसह सर्वसाधारण सभेचा ठराव.

सदराचे प्रमाणपत्र: संबंधित सरकारी किंवा अधिकृत प्राधिकरणाकडून गटाच्या स्थापनाबाबत मिळालेले प्रमाणपत्र.

बँक खाते: गटाच्या नावावर असलेले बँक खाते आणि त्याचे तपशील.

पॅन कार्ड: गटाच्या नावावर असलेले पॅन कार्ड.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची यादी: गटाच्या संचालक मंडळाची यादी, त्यांच्या जबाबदाऱ्यांसह.

गटाची वित्तीय स्थिती: गटाच्या आर्थिक स्थितीची माहिती, जसे की प्राथमिक भांडवल, जमा रक्कम, इ.

शपथपत्र: गटाचे सर्व सदस्य आणि संचालक मंडळाने शपथपत्राद्वारे दिलेली नोंदणीसाठी सहमती.

**या कागद पत्राचा सर्व नमुना कृषी सहाय्यक यांच्याकडे मिळेल.**

योजनेंतर्गत लाभ मिळवण्यासाठी शेतकरी गटांच्या सर्व सदस्यांचे आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न असणे अनिवार्य राहील.

## ४ शेतकरी गटांसाठी विविध विभागांकडून दिल्या जाणाऱ्या अनुदानांच्या योजनेची माहिती खालीलप्रमाणे आहे:

शेतकरी गटांसाठी विविध विभागांकडून दिले जाणारे अनुदान, त्या अनुदानाचे टक्केवारी, कोणत्या कामासाठी ते दिले जाते, आणि संबंधित संपर्क व्यक्ती व कागदपत्रांची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे:

### ४.१.१ शेतीविभाग

अनुदान टक्केवारी: ४०% पर्यंत

उद्योग/काम: शेती यंत्र सामग्री, सिंचन प्रकल्प, बियाणे, सेंद्रिय शेती, खत वितरण, शेततळे बांधकाम, संरक्षित शेती (पॉली हाऊस, शेडनेट) इत्यादी.

संपर्क : तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा कृषी अधिकारी.

**कागदपत्रे:**

- अर्ज
- शेत जमिनीची माहिती
- ओळखपत्र (आधार कार्ड, पॅन कार्ड)
- शेतकरी गट नोंदणी प्रमाणपत्र
- बँक खाते तपशील

### ४.१.२. ग्रामविकास विभाग

अनुदान टक्केवारी: ५०% पर्यंत

उद्योग/काम: शेतकरी गटांना शाश्वत शेतीसाठी आवश्यक पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी.

उदाहरण: सामूहिक गोदाम बांधणे, शेती आधारित छोटे उद्योग, सेंद्रिय शेतीसाठी प्रकल्प इत्यादी.
संपर्क : ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, किंवा जिल्हा ग्रामविकास अधिकारी.

**कागदपत्रे:**

- अर्ज
- शेतकरी गट नोंदणी प्रमाणपत्र
- गाव विकास आराखडा
- बँक खाते तपशील

### ४.१.3 जिल्हा परिषद

अनुदान टक्केवारी: ४०% पर्यंत

काम: शेत तळे बांधणे, जलसंवर्धन प्रकल्प, बंधारे उभारणे, नालाबांध इत्यादी

जल व्यवस्थापनाच्या कामांसाठी तसेच शेती विस्तार, सेंद्रिय शेती, नवीन तंत्रज्ञानाचे प्रसारण, शेती शिक्षण, शेतकरी प्रशिक्षण केंद्रे.
अनुदान: साधारणतः ५०% ते ७०% पर्यंत.
संपर्क : जिल्हा परिषद कार्यालयातील संबंधित अधिकारी.

**कागदपत्रे:**

- अर्ज
- शेतकरी गट नोंदणी प्रमाणपत्र
- प्रकल्प आराखडा
- बँक खाते तपशील

### ४.१.४ दूग्धविकास विभाग

अनुदान टक्केवारी: ५०% ते ७५% पर्यंत

उद्योग/काम: दूध प्रक्रिया यंत्र सामग्री, डेअरी उभारणी, पशुखाद्य व्यवस्थापन, दूधशाळा स्थापनेसाठी.

संपर्क: जिल्हा दूग्धविकास अधिकारी.

**कागदपत्रे:** अर्ज– शेतकरी गट नोंदणी प्रमाणपत्र, पशुधन व दूग्धविकास आराखडा, बँक खाते तपशील.

### ४.१.५ कौशल्यवर्धन विभाग

अनुदान टक्केवारी: ६०% ते ८०% पर्यंत

उद्योग/काम: कौशल्यवर्धन प्रशिक्षण, स्वयंपूर्णतेसाठी उपकरणे, नवीन तंत्रज्ञानाचे शिक्षण इत्यादी.

संपर्क : कौशल्यवर्धन अधिकारी किंवा संबंधित प्रशिक्षण केंद्र.

**कागदपत्रे:** अर्ज– शेतकरी गट नोंदणी प्रमाणपत्र, प्रशिक्षणासाठी निवडलेल्या सदस्यांची माहिती, बँक खाते तपशील

### ४.१.६ महसूल विभाग

अनुदान टक्केवारी: ४०% ते ६०% पर्यंत

उद्योग/काम: जमिन पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन, जमिन मोजणी प्रकल्प.

संपर्क : तहसीलदार कार्यालय किंवा संबंधित महसूल अधिकारी.

**कागदपत्रे:**

अर्ज – शेतकरी गट नोंदणी प्रमाणपत्र, जमिन मालकीचे कागदपत्रे, आपत्तीचे प्रमाणपत्र (जर लागू असेल तर), बँक खाते तपशील

### ४.१.७ लघु उद्योग विभाग

अनुदान टक्केवारी: ३५% पर्यंत

उद्योग/काम: सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) स्थापनेसाठी, विशेषतः

अन्नप्रक्रिया, हस्तकला, ग्रामोद्योग इत्यादी.

संपर्क : जिल्हा उद्योग केंद्र (DIC) किंवा लघु उद्योग विकास अधिकारी.

**कागदपत्रे:**

- अर्ज– शेतकरी गट नोंदणी प्रमाणपत्र, उद्योगाची योजना, वित्तीय माहिती, बँक खाते तपशील

**सामान्य प्रक्रिया:**

अर्ज भरणे: संबंधित विभागाच्या कार्यालयात अर्ज भरून सादर करावा.

प्रकल्पाचा आराखडा: प्रकल्पाची योजना तयार करून त्याची विस्तृत माहिती द्यावी.

**कागदपत्रे संकलन:** आवश्यक कागदपत्रे तयार करून संलग्न करावी.

संपर्क: संबंधित विभागाच्या अधिकारी किंवा कार्यालयाशी नियमित संपर्क ठेवा.

अनुदान प्राप्ती: अर्ज मंजूर झाल्यानंतर अनुदानाची रक्कम थेट शेतकरी गटाच्या बँक खात्यात जमा होते.

**वरील माहिती सरकारच्या विविध योजनांनुसार बदलू शकते. अद्ययावत माहिती आणि अचूक प्रक्रियेची माहिती संबंधित विभागाकडून घेणे आवश्यक आहे.**

## ४.२ शेतकरी गटांसाठी कर्ज देणाऱ्या विविध संस्था:

शेतकरी गटांसाठी कर्ज देणाऱ्या विविध संस्था आहेत, ज्या शेतकऱ्यांना त्यांच्या शेती संबंधित प्रकल्पांसाठी आर्थिक मदत देतात.

या संस्थांची माहिती खालीलप्रमाणे आहे:

NAFIN (National Agriculture and Food Innovation Fund)

- कर्ज प्रकार: शेतकरी गटांसाठी आणि शेती प्रकल्पांसाठी कर्ज.
- कर्ज उद्दिष्ट: शेती विकास, सिंचन प्रकल्प, शेती उपकरणे खरेदी, पिकांशी संबंधित योजना.
- संपर्क: नाबार्डच्या जिल्हा कार्यालयात संपर्क साधा.

**भारतीय स्टेट बँक** (SBI)

- कर्ज प्रकार: शेती कर्जे, किसान क्रेडिट कार्ड (KCC).
- कर्ज उद्दिष्ट: बी–बियाणे खरेदी, खत, पाणीपुरवठा, शेती यंत्र सामग्री खरेदी.
- संपर्क: जवळच्या SBI शाखेत संपर्क करा.

**राष्ट्रीयीकृत बँका** (PNB, Bank of Baroda, Union Bank, **आदि)**

- कर्ज प्रकार: शेती कर्जे, किसान क्रेडिट कार्ड (KCC), शेती उत्पादक गटांसाठी विशेष कर्ज योजना.
- कर्ज उद्दिष्ट: शेतीशी संबंधित विविध प्रकल्प, शेती यंत्र सामग्री खरेदी, सिंचन सुविधा, पशुपालन.

**संपर्क: तालुका विकास अधिकारी** (TDO):

तालुक्याच्या विकासासंबंधित सर्व योजनांसाठी जबाबदार असतात. शेतकरी गटांसाठी आर्थिक मदत आणि कर्ज योजनांच्या प्रक्रियेबाबत मदत मिळवण्यासाठी TDO कार्यालयाशी संपर्क साधू शकता.

**सहकारी बँका** (Cooperative Banks)

- कर्ज प्रकार: शेतकरी गटांसाठी विविध शेती कर्ज योजना.
- कर्ज उद्दिष्ट: शेती उत्पादन, पाणी व्यवस्थापन, सामुदायिक शेती प्रकल्प.
- संपर्क: जिल्हा सहकारी बँक किंवा तालुका सहकारी बँक.

**आय.सी.आय.सी.आय. बँक** (ICICI Bank)

- कर्ज प्रकार: शेती कर्जे, किसान क्रेडिट कार्ड (KCC).
- कर्ज उद्दिष्ट: शेतीसाठी आवश्यक खते, बियाणे, उपकरणे खरेदी.
- संपर्क: जवळच्या ICICI शाखेत संपर्क करा.

**एच.डी.एफ.सी. बँक** (HDFC Bank)

- कर्ज प्रकार: शेती कर्जे, किसान क्रेडिट कार्ड (KCC).
- कर्ज उद्दिष्ट: शेती उपकरणे, शेत तळे, सिंचन योजना.
- संपर्क: जवळच्या HDFC शाखेत संपर्क करा.

**ग्रामीण बँका** (Regional Rural Banks - RRBs)

- कर्ज प्रकार: शेती कर्जे, शेतकरी उत्पादक गटांसाठी (FPOs) विशेष योजना.
- कर्ज उद्दिष्ट: शेतकरी समूहासाठी पिक कर्ज, सिंचन योजना, शेतीव्यवसाय प्रकल्प.
- संपर्क: जवळच्या ग्रामीण बँकेच्या शाखेत संपर्क साधा.

**मायक्रो फायनान्स संस्था** (Micro finance Institutions)

- कर्ज प्रकार: लघु कर्जे, महिलांसाठी विशेष कर्ज योजना.
- कर्ज उद्दिष्ट: छोटे शेती प्रकल्प, पशुपालन, कुक्कुटपालन, हस्तकला.
- संपर्क: स्थानिक मायक्रो फायनान्स संस्थेत संपर्क करा.

**कागदपत्रे:** शेतकरी गट नोंदणी प्रमाणपत्र, अर्ज, शेत जमिनीची माहिती, ओळखपत्र (आधार कार्ड, पॅन कार्ड), प्रकल्पाचा आराखडा (जर लागू असेल तर), बँक खाते तपशील.

संपर्क व प्रक्रिया: प्रत्येक संस्थेचे स्वतःचे कर्ज प्रक्रिया नियम आहेत. त्यामुळे संबंधित बँकेच्या किंवा संस्थेच्या शाखेत भेट देऊन कर्ज प्रक्रिया, व्याजदर, परतफेड योजना, आवश्यक कागदपत्रे इत्यादींची माहिती घेणे आवश्यक आहे.

## ४.३ शेतकरी गटांसाठी प्रशिक्षण देणाऱ्या विविध संस्थां

शेतकरी गटांसाठी प्रशिक्षण देणाऱ्या विविध संस्थांचा समावेश शेती विस्तार, कौशल्यवर्धन, आणि उद्यमशीलतेच्या क्षेत्रात आहे. या संस्थांकडून शेतकऱ्यांना तंत्रज्ञान, व्यवस्थापन, आणि उत्पादन सुधारणा याबद्दल प्रशिक्षण दिले जाते. खालील संस्थांच्या संपर्काची माहिती दिली आहे:

### ४.३.१ कृषि विज्ञान केंद्रे (KVKs)

- उद्दिष्ट: शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, पिक व्यवस्थापन, आणि सेंद्रिय शेती याबद्दल प्रशिक्षण.
- संपर्क : प्रत्येक जिल्ह्यात एक किंवा अधिक KVKs कृषी विज्ञान केंद्रे असतात. संबंधित जिल्हा शेती अधिकारी कार्यालयाकडे संपर्क साधून स्थानिक KVK ची माहिती मिळवा.
- उदाहरण: महाराष्ट्रातील काही KVKs म्हणजे पुणे KVK, नाशिक KVK, इ.

### ४.३.२ राष्ट्रीय शेतीआणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड)

- उद्दिष्ट: शेती विकास आणि ग्रामीण उपक्रमांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, आणि सेमिनार्स.
- संपर्क : नाबार्डच्या जिल्हा कार्यालयात संपर्क साधा.
- वेबसाइट: https://www.nabard.org

### ४.३.३ राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि शेतीसंघटना (NAFPO)

- उद्दिष्ट: शेती उत्पादक गटांना, शेती उद्योगांसाठी प्रशिक्षण, तंत्रज्ञान हस्तांतरण.
- **संपर्क : NAFPO कार्यालयाशी संपर्क साधा.**
- वेबसाइट: http://www.nafpo.org

### ४.३.४ शेती महाविद्यालये आणि विद्यापीठे

- उद्दिष्ट: शेती क्षेत्रातील विविध तांत्रिक आणि व्यवस्थापन विषयांवर प्रशिक्षण.
- उदाहरण: पुणे शेती महाविद्यालय, नागपूर शेती महाविद्यालय, अहमदनगर शेती महाविद्यालय.
- संपर्क : संबंधित महाविद्यालयाच्या प्रशासनाशी संपर्क साधा.

### ४.३.५ ग्रामीण कौशल्यवर्धन प्रशिक्षण केंद्रे

- उद्दिष्ट: विविध कौशल्यांवर प्रशिक्षण, ज्यात शेतकऱ्यांना व्यवसाय, वित्तीय व्यवस्थापन, आणि उत्पादन तंत्रज्ञान याबद्दल माहिती.
- उदाहरण: जिल्हा कौशल्यवर्धन कार्यालये, ग्रामीण विकास संस्थांमार्फत.

### ४.३.६ स्थानीय शेती सहकारी संस्था आणि संघटन

- उद्दिष्ट: स्थानिक स्तरावर प्रशिक्षण कार्यशाळा, शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम.
- संपर्क : स्थानिक शेती सहकारी संस्था, ग्रामपंचायत किंवा तालुका शेती अधिकारी.

### ४.३.७ शेती विभागाचे प्रशिक्षण कार्यक्रम

- उद्दिष्ट: विविध शेती योजनेच्या अंतर्गत प्रशिक्षण, शेतकरी गटांसाठी कार्यशाळा.
- **संपर्क : जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय.**

**कसे संपर्क साधावे:**

- कार्यालय भेट: स्थानिक शेती कार्यालय, KVK, किंवा संबंधित प्रशिक्षण संस्था येथे प्रत्यक्ष भेट द्या.
- फोन संपर्क: संबंधित कार्यालयाचा फोन नंबर मिळवून संपर्क साधा.
- ई–मेल: संबंधित संस्थांच्या वेबसाइटवरून ई–मेल आयडी मिळवून ई–मेल द्वारे संपर्क साधा.
- या संस्थांकडून मिळणारे प्रशिक्षण शेतकऱ्यांच्या उत्पादन क्षमतेला सुधारण्यात आणि नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात मदत करतात.

## ५. शेतकरी सहकारी संघ

शेतकरी सहकारी संघ म्हणजेच शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी कार्य करणारी संस्था आहे. हे सहकारी संघ शेतकऱ्यांना विविध सेवांमध्ये मदत करतात, ज्यामध्ये शेतीसाठी लागणारे साहित्य, खते, बी–बियाणे, आणि इतर संसाधनांचा समावेश होतो. संघाच्या कार्यवाहीसाठी विशिष्ट कायदे आणि नियम तयार केले जातात, जे संस्थेच्या सदस्यांना मार्गदर्शन करतात.

### ५.१ शेतकरी सहकारी संस्था कोठे नोंदवावी:

शेतकरी सहकारी संस्था नोंदणीसाठी राज्य सहकारी निबंधक कार्यालय (Registar of Cooperative Societies) किंवा संबंधित जिल्हा सहकारी निबंधक कार्यालय येथे जावे लागते. महाराष्ट्र राज्यात, यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम, १९६० (Maharashtra State Cooperative Societies Act, 1960) अंतर्गत नोंदणी केली जाते.

### ५.१.१ नोंदणीसाठी लागणारी कागदपत्रे:

१. अर्ज (Form A):

- शेतकरी सहकारी संस्थेच्या नोंदणीसाठी अर्ज आवश्यक आहे. हा अर्ज संबंधित राज्याच्या सहकारी निबंधक कार्यालयातून किंवा त्यांच्या वेबसाइट वरून मिळवता येतो.

**२. संस्थेच्या सदस्यांची यादी:**

- संस्थेच्या स्थापनेच्या वेळी किमान १० सदस्यांची आवश्यकता असते. सदस्यांची संपूर्ण माहिती, जसे की नाव, पत्ता, व्यवसाय इत्यादी या यादीत समाविष्ट असतात.

**३. संस्थेचे प्रस्तावित उपनियम** (Bye-laws):

- संस्था कशा प्रकारे चालवली जाईल, तिचे उद्दिष्टे, नियम व अटी, सदस्यांचे अधिकार व कर्तव्ये इत्यादींचा समावेश असलेले प्रस्तावित उपनियम सादर करावे लागतात.

**४. संस्थेचे पत्ता प्रमाणपत्र:**

- संस्थेचा कार्यालयाचा पत्ता सिद्ध करणारे प्रमाणपत्र आवश्यक असते. यात कार्यालयाचा भाडे करार (Rent Agreement) किंवा मालकी हक्काचे दस्तऐवज समाविष्ट होतात.

**५. सदस्यांचा सभासदत्व अर्ज:**

- प्रत्येक सदस्याचा सभासदत्व स्वीकारण्याचा अर्ज (Membership Application) सादर करणे आवश्यक आहे.

**६. संस्थेच्या स्थापनेचा ठराव** (Resolution):

- सदस्यांच्या सभेत घेण्यात आलेला संस्थेच्या स्थापनेचा ठराव आवश्यक आहे, ज्यात संस्थेची स्थापना करण्याचा निर्णय घेतला जातो.

**७. संस्थेचे प्रारंभिक भांडवल** (Initial Capital):

- संस्थेच्या स्थापनेच्या वेळी जमा केलेले प्रारंभिक भांडवलाचे प्रमाणपत्र आवश्यक असते. हे प्रमाणपत्र संबंधित बँकेतून मिळवता येते.

**८. संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीची निवड** (Management Committee):

- संस्थेची स्थापना झाल्यावर निवडण्यात आलेल्या व्यवस्थापकीय समितीची यादी व त्यांच्याबद्दलची संपूर्ण माहिती सादर करावी लागते.

**९. ओळखपत्र आणि पत्ता पुरावा** (Identity and Address Proof):

- सर्व संस्थापक सदस्यांचे ओळखपत्र (जसे की आधार कार्ड, PAN कार्ड) आणि पत्ता पुरावा (जसे की मतदान ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स) आवश्यक असतात.

**१०. अन्य आवश्यक दस्तऐवज:**

- काही राज्यांमध्ये अन्य दस्तऐवजांची ही आवश्यकता असू शकते, जसे की नॉन–ज्युडिशियल स्टॅम्प पेपरवर नोंदवलेला दस्तऐवज, आणि शपथपत्र.

### ५.१.२ नोंदणी प्रक्रिया:

- आवश्यक कागदपत्रे तयार करून, सर्व सदस्यांनी सहकारी निबंधक कार्यालयात अर्ज करावा.

सहकारी निबंधक कार्यालयाशी संपर्क साधण्यासाठी तुम्ही खालील माहितीचा उपयोग करू शकता. सहकारी निबंधक कार्यालये राज्यस्तरीय पातळीवर कार्यरत असतात, त्यामुळे तुम्हाला राज्याच्या संपर्क माहिती मिळवावी लागेल.

**महाराष्ट्र राज्य सहकारी निबंधक कार्यालय (मुख्य कार्यालय):**

पत्ता: सहकार भवन, चौथा माळा, २७३, बी–२, दत्ताराम लाड मार्ग, सरकारी वसाहत, पुणे– ४११००१, महाराष्ट्र, भारत. मुख्य कार्यालय (पुणे): +९१–२०–२५५३ १२३४

सहकार विभाग, महाराष्ट्र: clpune@cooperation.maharashtra.gov.in

- Maharashtra Cooperative Department
- सहकारी निबंधक अर्जाची छाननी करतो आणि सर्व कागदपत्रे तपासतो.
- तपासणी पूर्ण झाल्यावर, संस्थेच्या नोंदणीसाठी मंजुरी दिली जाते.

**५.१.३ नोंदणी प्रमाणपत्र (Registration Certificate) मिळाल्यानंतर संस्था अधिकृतरित्या कार्यरत होऊ शकते.**

**शेतकरी सहकारी संस्था मध्ये करता येणारे व्यवसाय:**

## ५.२ शेती उत्पादन आणि विक्री:

- साधन सामुग्री वितरण: बी–बियाणे, खते, कीटकनाशके, शेतीची यंत्र सामग्री इत्यादींचे वितरण.
- शेतीउत्पादन खरेदी–विक्री: शेतकऱ्यांच्या उत्पादित पिकांचे बाजारात विक्री करणे.
- शेती आधारित उत्पादन प्रक्रिया:धान्य साठवण,फळे,भाज्या व तृणधान्यांचे पॅकेजिंग,प्रक्रिया आणि विक्री.

**दूग्धव्यवसाय:**

- दूग्ध उत्पादन: दुधाची संग्रहीत करून त्याचे प्रक्रिया करणे, जसे की दही, लोणी, पनीर, इत्यादी.
- दूध वितरण: दूधाचे संकलन आणि वितरण नेटवर्क तयार करणे.

**मत्स्यव्यवसाय:**

- मत्स्य पालन: तलावात माशांचे पालन आणि त्यांची विक्री.
- मत्स्य प्रक्रिया: मत्स्य उत्पादनाचे साठवण आणि बाजारात विक्रीसाठी तयार करणे.

**रेशीम उत्पादन:**

- रेशीम उद्योग: रेशीम कीटक पालन, कोषाची प्रक्रिया, आणि रेशीम धाग्याचे उत्पादन व विक्री.

**खाद्यपदार्थ निर्मिती:**

- शेती आधारित उत्पादने: जसे की आंबा पल्प, फळांचे ज्यूस, मसाले, इत्यादींची निर्मिती व विक्री.
- प्रसंस्कृत खाद्यपदार्थ: जसे की सेंद्रिय उत्पादने, पॅकेज्ड फूड्स इत्यादी.

**शेती विषयक सेवा:**

- शेती सल्ला: शेतकऱ्यांना शेती विषयक तंत्रज्ञान, पिकांची निवड, कीड नियंत्रण, इत्यादींसाठी सल्ला देणे.
- यंत्र सामग्री भाड्याने देणे: शेतकऱ्यांना शेतीची यंत्र सामग्री भाड्याने उपलब्ध करून देणे.

# महाराष्ट्र सहकारी संस्था नियमांनुसार सहकारी संस्थेसाठीची माहिती:

| विभाग | नियम |
|---|---|
| सहकारी संस्थेचे नाव | सहकारी संस्थेच्या नावात ''सहकारी संस्था'' हा शब्द असावा. नाव हे अनोखे असावे आणि कोणत्याही विद्यमान सहकारी संस्थेसारखे नसावे. |
| संचालकांची संख्या | संचालक मंडळामध्ये किमान ५ आणि जास्तीत जास्त २१ सदस्य असावेत. संस्थेच्या आकार आणि स्वरूपानुसार ही संख्या ठरवली जाते. |
| संचालकांची निवड | संचालकांची निवड सहकारी संस्थेच्या सदस्यांद्वारे केली जाते. निवडणुका पूर्वीच्या संचालक मंडळाच्या कालावधीच्या समाप्तीनंतर ९० दिवसांच्या आत होणे आवश्यक आहे. |
| अतिरिक्त संचालक आणि तज्ञ संचालक | अतिरिक्त संचालक किंवा तज्ञ संचालकांची निवड बोर्डाच्या संमतीने केली जाऊ शकते, परंतु त्यांची संख्या निवडलेल्या संचालकांच्या एक-पाचव्या भागापेक्षा जास्त नसावी. |
| शेअर भांडवल आणि शेअर्सचे हस्तांतरण | सहकारी संस्थांमध्ये फक्त इक्विटी शेअर्स असतात. शेअर्स फक्त संस्थेच्या विद्यमान सदस्यांना हस्तांतरित करता येतात आणि त्यासाठी बोर्डाची मंजुरी आवश्यक आहे. नियुक्त व्यक्तीला सदस्याच्या मृत्यूवर सर्व लाभ मिळतील. |
| नियमावलीत बदल | सहकारी संस्थेच्या नियमावलीत बदल करण्यासाठी दोन तृतीयांश बहुमताने एक विशेष ठराव संमत करावा लागतो. बदल प्रस्तावित झाल्यानंतर ३०दिवसांच्या आत नोंदणीकर्त्याकडे सादर करावे लागतात. |
| वार्षिक सर्वसाधारण सभा (AGM) | पहिली AGM नोंदणीच्या तारखेपासून १८ महिन्यांच्या आत आयोजित केली जाईल, आणि त्यानंतरच्या AGM प्रत्येक आर्थिक वर्षाच्या समाप्तीनंतर सहा महिन्यांच्या आत होणे आवश्यक आहे. |
| संचालक मंडळाच्या बैठका आणि कोरम | संचालक मंडळाने प्रत्येक तिमाहीत किमान एक बैठक घेणे आवश्यक आहे,आणि दरवर्षी किमान चार बैठका आयोजित केल्या जातील. कोरम: संचालकांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांश भागाचे, आणि किमान तीन संचालकांचे कोरम आवश्यक आहे. |
| मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) | प्रत्येक सहकारी संस्थेला एक पूर्णवेळ उएज असणे आवश्यक आहे, जो संचालक मंडळाद्वारे नियुक्त केला जातो आणि जो सदस्यांपैकी किंवा बाहेरील व्यावसायिकांमधून नियुक्त केला जातो. |
| सचिव | मोठ्या उलाढालीच्या किंवा जटिल कार्यप्रणालीच्या सहकारी संस्थांनी एक पूर्णवेळ सचिव नियुक्त करणे आवश्यक आहे, जो सर्व वैधानिक आणि नियामक आवश्यकतांचे पालन करेल. |
| ऑडिट आणि खाते | प्रत्येक सहकारी संस्थेचे खाते दरवर्षी प्रमाणित ऑडिटरद्वारे ऑडिट केले पाहिजे, ज्याची नियुक्ती सर्वसाधारण सभेने केली आहे. ऑडिट केलेले वित्तीय अहवाल AGM मध्ये मंजूर करून नोंदणीकर्त्याकडे सादर करणे आवश्यक आहे. |
| उधार घेण्याची क्षमता | सहकारी संस्था आपल्या नियमावलीत निर्दिष्ट मर्यादेपर्यंतच उधार घेऊ शकते आणि हे सर्वसाधारण सभेने मंजूर करणे आवश्यक आहे. सर्व उधार सुरक्षित असले पाहिजेत आणि फक्त संस्थेच्या उद्देशांसाठी वापरले जाऊ शकतात. |
| विवाद निवारण | सदस्यांमध्ये किंवा सदस्य आणि सहकारी संस्था यांच्यातील विवाद सहकारी न्यायाधिकरण किंवा मध्यस्थी मार्फत सोडवले जातील, महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्याच्या नियमांनुसार |
| विंडिंग अप आणि लिक्विडेशन | सहकारी संस्थेचे विंडिंग अप एक विशेष ठराव संमत करून किंवा नोंदणीकर्त्याच्या आदेशाने सुरू केले जाऊ शकते, जर संस्थेचे कार्य उद्दिष्टांनुसार चालत नसेल. |
| नियमांची पालनशीलता | सहकारी संस्थांनी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा आणि नियमांच्या सर्व तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे. पालन न केल्यास दंड, अधिकाऱ्यांचे अपात्रत्व, किंवा इतर कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते. |

## ५.३ शासकीय योजना आणि अनुदान

शेतकरी सहकारी संघांना शासकीय स्तरावर विविध योजनांचा लाभ मिळतो. या योजनांमुळे संघाच्या कार्यक्षमतेत वाढ होते आणि शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळतो. शेतकरी सहकारी संघांना अनुदान देणाऱ्या काही प्रमुख संस्थांची माहिती खालीलप्रमाणे आहे:

**राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बँक** (NABARD):

- अनुदान: NABARD शेती व ग्रामीण विकासासाठी विविध प्रकारची मदत आणि अनुदान उपलब्ध करतो, ज्यामध्ये शेतकरी सहकारी संघांचे विकासकार्य देखील समाविष्ट आहे.
- टक्केवारी: अनुदानाचे प्रमाण प्रकल्पाच्या प्रकारानुसार बदलू शकते,सामान्यतः २५% ते ५०% पर्यंत असू शकते.
- पत्ता: Plot No. C-24, "G' Block, Bandra-Kurla Complex, Bandra (E), Mumbai - 400051
- फोन: +९१-२२-२६५३ १४१४
- नोंदणी प्रक्रिया आणि कागदपत्रे: प्रकल्प प्रस्ताव, गटाची माहिती, वित्तीय तपशील, आणि सादर केलेल्या योजनांची माहिती आवश्यक असते.

**शेती व सहकार विभाग** (Agriculture and Cooperation Department):

- अनुदान: स्थानिक सरकारांच्या शेती व सहकारी विभागांकडून विविध अनुदान योजनांची अंमलबजावणी केली जाते.
- टक्केवारी: अनुदानाचे प्रमाण विविध योजनांनुसार बदलते, सामान्यतः २५% ते ७५% पर्यंत असू शकते.
- स्थानिक शेती व सहकार विभागाचे कार्यालय.

**शेती आणि ग्रामीण विकास मंत्रालय** (Ministry of Agriculture and Rural Development):

- अनुदान: केंद्र सरकारच्या शेती आणि ग्रामीण विकास मंत्रालयांतर्गत विविध योजनांद्वारे अनुदान मिळवता येते.
- टक्केवारी: योजनांच्या प्रकारानुसार अनुदानाचे प्रमाण बदलते.
- पत्ता: Krishi Bhawan, Dr. Rajendra Prasad Road, New Delhi - 110001
- फोन: +९१-११-२३३८ ४४९९

**राष्ट्रकृती उद्योग व सहकार बँक** (RCB )/**सहकारी बँका:**

- अनुदान: सहकारी बँकांद्वारे सहकारी संघांना कर्ज व अनुदान उपलब्ध करून दिले जाते.
- टक्केवारी: बँकांद्वारे दिलेले अनुदान प्रकल्पाच्या गरजेवर आधारित असते.
- स्थानिक सहकारी बँकांची शाखा.

**नोंदणी प्रक्रिया व लागणारी कागदपत्रे:**

- प्रस्ताव: प्रकल्प प्रस्ताव, योजना, गटाची माहिती.
- आर्थिक कागदपत्रे: बँक खाते, बजेट, वित्तीय योजना.
- सदस्यांची माहिती: सदस्यांची यादी, ओळखपत्रे.
- अनुशासनात्मक माहिती: गटाचे रजिस्ट्रेशन, शासन आदेश.

हे दस्तऐवज व प्रक्रिया वाचन, सादरीकरण आणि संबंधित कार्यालयाच्या मार्गदर्शनानुसार पार पाडावी लागतात. अधिक माहिती आणि सुसंगत कागदपत्रांसाठी संबंधित कार्यालयाशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

शासकीय योजनांद्वारे शेतकरी सहकारी संघांना बी-बियाणे, खते, औषधं, आणि शेतीसाठी लागणारे यंत्र सामग्री यासाठी अनुदान दिले जाते. यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होतो आणि त्यांची आर्थिक स्थिती मजबूत होते.

### ५.४ कर्ज सुविधा:

शेतकरी सहकारी संघांना विविध बँका आणि वित्तीय संस्थांकडून कमी व्याजदरावर कर्ज सुविधा दिली जाते. नाबार्ड (राष्ट्रीय शेतीआणि ग्रामीण विकास बँक) आणि राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (NCDC) अशा प्रमुख वित्तीय संस्थांकडून सहकारी संघांना शेतकरी आधारित उपक्रमांसाठी कर्ज दिले जाते. शेतकरी सहकारी संघांना कर्ज सुविधा देणाऱ्या प्रमुख संस्थांचा आणि त्यांची कार्ये यांचा तपशील खालीलप्रमाणे:

**राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बँक** (NABARD)

- उद्दीष्ट: NABARD शेती व ग्रामीण विकासासाठी कर्ज सुविधा उपलब्ध करून देते. शेतकरी सहकारी संघांमध्ये कर्ज, उत्पादन, साठवण, इत्यादी क्षेत्रात मदत करते.
- पत्ता: National Bank fo Agriculture and Rural Development, Plot No.
  C-24, "G' Block, Bandra-Kurla Complex, Bandra (E), Mumbai - 400051
- फोन: +९१-२२-२६५३ १४१४

- **नोंदणी प्रक्रिया:**
  - कर्जासाठी अर्ज करण्यासाठी NABARD च्या स्थानिक शाखेला संपर्क साधा.
  - अर्जासह आवश्यक कागदपत्रे सादर करा.
  - NABARD कार्यालयाने अर्जाची समीक्षा करून कर्ज मंजूर केल्यावर कर्ज वितरण करण्यात येते.
- **लागणारी कागदपत्रे:**
  - शेतकरी सहकारी संघाची नोंदणी प्रमाणपत्र
  - बँक खात्याचे तपशील
  - प्रकल्पाची माहिती
  - कार्यक्षमतेचा पुरावा

**भारतीय स्टेट बँक** (SBI) **आणि इतर सार्वजनिक क्षेत्रातील बँका:**

- उद्दीष्ट: SBI व इतर सार्वजनिक बँका शेतकरी सहकारी संघांना विविध प्रकारच्या कर्ज सुविधा देतात, जसे की उत्पादन कर्ज, स्थिर भांडवल कर्ज, इत्यादी.
- संपर्क : स्थानिक SBI शाखा किंवा संबंधित बँक शाखा

- **नोंदणी प्रक्रिया:**
  - संबंधित बँक शाखेत कर्ज अर्ज सादर करा.
  - कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे सादर करा.
  - बँकेच्या प्रक्रिया पूर्ण झाल्यावर कर्ज मंजूर केले जाते.
- **लागणारी कागदपत्रे:**
  - शेतकरी सहकारी संघाची नोंदणी प्रमाणपत्र
  - बँक खात्याचे तपशील
  - प्रकल्पाची माहिती
  - कार्यक्षमतेचा पुरावा

**सहकारी बँका:**

- उद्दीष्ट: सहकारी बँका शेतकरी सहकारी संघांना विविध प्रकारच्या कर्ज सुविधा देतात. या बँकांच्या माध्यमातून शेतकरी संघांना उत्पादन, मार्केटिंग आणि इतर गरजांसाठी कर्ज मिळू शकते.
- संपर्क : स्थानिक सहकारी बँक शाखा

- **नोंदणी प्रक्रिया:**
  - संबंधित सहकारी बँक शाखेत कर्ज अर्ज सादर करा.
  - आवश्यक कागदपत्रे सादर करा.
  - बँकेच्या प्रक्रियेची पूर्तता करून कर्ज मंजूर केले जाते.
- **लागणारी कागदपत्रे:**
  - शेतकरी सहकारी संघाची नोंदणी प्रमाणपत्र
  - बँक खात्याचे तपशील
  - प्रकल्पाची माहिती
  - कार्यक्षमतेचा पुरावा

**राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (NCDC)**

उद्दीष्ट: NCDC शेतकरी सहकारी संघांसाठी विविध प्रकारच्या कर्ज सुविधा प्रदान करते. हे कर्ज सहकारी संस्थांच्या माध्यमातून कृषी, ग्रामीण विकास, विपणन, वाणिज्य, इत्यादी क्षेत्रात वापरले जाते.

- पत्ता: National Cooperative Development Corporation, 4, Siri Institutional Area, Hauz Khas, New Delhi - 110016
- फोन: +९१-११-२६५६ ३६३६ / २६५६ ३७३७
- ई-मेल: ncdc@rediffmail.com

**नोंदणी प्रक्रिया:**

- NCDC कडून कर्ज प्राप्त करण्यासाठी संबंधित कर्जाच्या योजना व अटींची माहिती प्राप्त करा.
- कर्ज अर्ज आणि आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी NCDC च्या स्थानिक शाखेत संपर्क साधा.
- अर्ज सादर केल्यावर NCDC कडून आवश्यक तपासण्या आणि प्रक्रिया पूर्ण केल्यावर कर्ज मंजूर केले जाते.

- **लागणारी कागदपत्रे:**
  - शेतकरी सहकारी संघाची नोंदणी प्रमाणपत्र
  - बँक खात्याचे तपशील
  - प्रकल्पाची माहिती व त्याचे कार्यप्रणाली
  - वित्तीय विवरणपत्रे (उदा., बॅलन्स शीट, पॅनल)

## ५.५ सहकारी संस्थांच्या व्यवसाय करताना लागू होणारे काही महत्त्वाचे सरकारी नियम:

### ५.५.१ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (Maharashtra Cooperative Societies Act, 1960):

- **उद्दिष्ट:** सहकारी संस्थांच्या नोंदणी, कार्यप्रणाली, व्यवस्थापन, आणि त्यांच्या अधिकारांचा विस्तार करणे.

- **महत्त्वपूर्ण प्रावधान:**
- नोंदणी: सहकारी संस्थेची नोंदणी आवश्यक आहे. नोंदणीसाठी संस्थेच्या उपनियमांसह अर्ज करावा लागतो.
- सभासदत्व: सभासदांच्या अधिकार, कर्तव्ये आणि सभासदत्वाच्या निकषांचे निर्धारण.
- आर्थिक व्यवस्थापन: सहकारी संस्थांच्या आर्थिक व्यवहारांचे नियम, जसे की लेखा तपासणी, वार्षिक अहवाल, आणि निधीची वापर प्रक्रिया.

### ५.५.२. सहकारी बँका आणि सहकारी क्रेडिट संस्थांसाठी लागू असणारे नियम:

- उद्दिष्ट: सहकारी बँकांची स्थापना, कार्यप्रणाली, आणि त्यांच्या आर्थिक व्यवहारांचे नियंत्रण.
- महत्त्वपूर्ण प्रावधान:
- रेग्युलेटरी फ्रेमवर्क: भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (RBI) मार्गदर्शक तत्त्वांचे पालन आवश्यक आहे.
- कर्ज वितरण: सहकारी बँका आणि क्रेडिट संस्थांनी कर्ज वितरणासाठी ठराविक निकषांची पूर्तता करावी लागते.
- बचत आणि ठेवी: संस्थेच्या सभासदांकरिता बचत आणि ठेवी योजना उपलब्ध करून देणे आणि त्यांचे सुरक्षा व्यवस्थापन.

### ५.५.३. शेतीउत्पन्न बाजार समिती अधिनियम, १९६३ (Agricultural Produce Market Committee Act, 1963):

- उद्दिष्ट: शेतीउत्पन्नांच्या खरेदी–विक्रीला बाजार समित्यांद्वारे नियंत्रणात ठेवणे.
- महत्त्वपूर्ण प्रावधान:
- शेतीउत्पन्न बाजार व्यवस्थापन: शेतकरी सहकारी संस्थांना बाजार समित्यांद्वारे त्यांच्या उत्पादनांची विक्री करणे अनिवार्य आहे.
- किंमत निर्धारण: बाजारात शेती उत्पादनांची उचित किंमत मिळविण्यासाठी नियामक व्यवस्था.
- लायसेनिंग: शेती उत्पादनांच्या खरेदी–विक्रीसाठी बाजार समितीचे परवाना घेणे आवश्यक आहे.

### ५.५.४. मनी लाँड्रिंग प्रतिबंध कायदा (Prevention of Money Laundering Act, 2002):

- उद्दिष्ट: मनी लाँड्रिंग आणि आर्थिक फसवणुकीला आळा घालण्यासाठी सहकारी संस्थांवर काही मर्यादा लागू करणे.
- आर्थिक व्यवहारांची पारदर्शकता: सहकारी संस्थांनी त्यांच्या आर्थिक व्यवहारांची नोंद पद्धतशीरपणे ठेवणे आवश्यक आहे.
- आयकर रिटर्न आणि लेखा तपासणी: सर्व आर्थिक व्यवहारांचे वार्षिक रिटर्न भरणे आणि नियामक संस्थेकडून लेखा तपासणी करुन घेणे आवश्यक आहे.

**ग्राहक संरक्षण कायदे** (Consumer Protection Act, 2019):

- उद्दिष्ट: ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांना न्याय देणे.
- गुणवत्तेचे प्रमाणपत्र: सहकारी संस्थांनी विक्रीसाठी उत्पादित वस्तूंची गुणवत्ता सुनिश्चित करणे.
- वास्तव माहिती देणे: ग्राहकांना उत्पादनांबाबत योग्य आणि स्पष्ट माहिती देणे अनिवार्य आहे.
- विक्री पश्चात सेवा: विक्री पश्चात सेवा किंवा उत्पादनाच्या अडचणींवर तोडगा काढणे.

### ५.५.५. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ (MGNREGA):

- उद्दिष्ट: ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

- **महत्त्वपूर्ण प्रावधान:**
  - रोजगार: सहकारी संस्थांना ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.
  - प्रकल्प: ग्रामीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांमध्ये सहकारी संस्थांचा सहभाग.

### ५.५.६. अन्य संबंधित कायदे:

- GST (वस्तू आणि सेवा कर) कायदा: सहकारी संस्थांनी त्यांच्या उत्पादन आणि सेवांवर लागू होणाऱ्या GST कायद्यांचे पालन करणे आवश्यक आहे.
- भारतीय कॉन्ट्रॅक्ट अधिनियम, १८७२: सहकारी संस्थांच्या व्यावसायिक करारांचे नियमन.
- औद्योगिक कल्याण कायदे: सहकारी संस्थांनी कामगारांच्या हक्कांचे पालन करणे, जसे की वेतन, कामाच्या तासांचे नियमन, कामगार संरक्षण कायदे इ.

## ५.६ शेतकरी सहकारी संघाचे प्रशिक्षण करणाऱ्या संस्था

शेतकरी सहकारी संघाच्या व्यवस्थापनास आणि सदस्यांना प्रशिक्षण देणाऱ्या अनेक शासकीय आणि खाजगी संस्था आहेत. या संस्थांचा उद्देश शेतकऱ्यांना सहकारी संघाच्या कार्यप्रणालीची माहिती देणे, तसेच त्यांना संघाचे संचालन कसे करायचे याचे मार्गदर्शन करणे हा असतो.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, भारतीय राष्ट्रीय शेती सहकारी महासंघ (NAFED), आणि राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (NCDC) या प्रमुख संस्थांपैकी काही आहेत, ज्या शेतकऱ्यांना संघाचे व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, आणि शेतीचे नवीन तंत्रज्ञान यावर प्रशिक्षण देतात. या प्रशिक्षणामुळे शेतकरी सहकारी संघ अधिक परिणामकारकपणे कार्य करू शकतात.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ (MPKV), भारतीय राष्ट्रीय शेती सहकारी महासंघ (NAFED), आणि राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (NCDC) या संस्थांचे संपर्क तपशील खालीलप्रमाणे आहेत:

### ५.६.१. महात्मा फुले कृषी विद्यापीठ (MPKV)

- पत्ता: महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर, महाराष्ट्र – ४१३७२२
- फोन: +९१–२४२६–२४३२१३ / वेबसाइट: www.mpkv.ac.in

### ५.६.२. भारतीय राष्ट्रीय शेती सहकारी महासंघ (NAFED)

- पत्ता: नाफेड हाऊस, सिद्धार्थ एन्क्लेव्ह, आश्रम चौक, रिंग रोड, नवी दिल्ली –११००१४
- फोन: +९१–११–२६३४००१९, +९१–११–२६३४१८२९
- वेबसाइट: www.nafed-india.com

### ५.६.3. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (NCDC)

- पत्ता: हौसखास, ऑगस्ट क्रांती मार्ग, नवी दिल्ली–११००१६
- फोन: +९१–११–२६५१६०५२, +९१–११–२६५१६०३८
- वेबसाइट: www.ncdc.in

## ६. शेतकरी उत्पादक कंपनी :

पार्श्वभूमी

शेतकरी उत्पादक कंपनी (FPCs) म्हणजे शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेली संघटना, जी त्यांच्या उत्पादनांची विक्री, विपणन, आणि वितरण प्रक्रिया सुधारण्यासाठी कार्य करते. FPCs शेतकऱ्यांना एकत्र करून त्यांच्या सामूहिक हितासाठी काम करते, जसे की उत्पादन व्यवस्थापन, उच्च दर्जाच्या उत्पादनांची विक्री, आणि किफायतशीर दरावर उत्पादनांची खरेदी व विक्री.

FPCs च्या मुख्य उद्दिष्टांमध्ये शेतकऱ्यांचे आर्थिक फायदे वाढवणे, त्यांच्या उत्पादनांचे मूल्य वाढवणे, आणि बाजारपेठेत त्यांच्या स्थानाची सुधारणा करणे समाविष्ट आहे. FPCs शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण, आणि संसाधने प्रदान करून त्यांची उत्पादनक्षमता वाढवतात.

FPCs हे सहकार्य, सामूहिक सामर्थ्य, आणि व्यावसायिक व्यवस्थापनाच्या तत्त्वांवर आधारित असतात. यामुळे शेतकऱ्यांना अधिक चांगले शेत मालाला भाव मिळतात, किंमतीवर नियंत्रण ठेवता येते, आणि तांत्रिक व व्यवस्थापनाच्या समस्यांवर सामोरे जाऊ शकतात.

या संघटनांच्या माध्यमातून, शेतकऱ्यांना बाजारपेठेतील बदलत्या ट्रेंड्ससाठी तयार केले जाते आणि त्यांच्या उत्पादनांना योग्य बाजारपेठेतील स्थान मिळवून दिले जाते. FPCs च्या यशस्वी कार्यप्रणालीमुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारते आणि त्यांच्या जीवनमानात वाढ होते.

### ६.१ FPCs चे प्रमुख वैशिष्ट्य

सामूहिक मालकी, विपणनन क्षमता वाढते, व्यावसायिक व्यवस्थापन, मूल्यवर्धन, विभिन्न बाजारांमध्ये प्रवेश, जोखमीचे व्यवस्थापन, समुदाय विकास.

### ६.२ शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणी

शेतकरी उत्पादक कंपनी (एफपीसी)ची नोंदणी प्रक्रिया कंपनी कायदा १९५६ व २०१३ अंतर्गत सेक्शन ५८१ ए ते ५८१ झेड एल अंतर्गत केली जाते. एफपीसीच्या नोंदणीसाठी Ministry of Corporate Affairs च्या www.mca.gov.in या वेबपोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावा लागतो.

- एफपीसीची नोंदणी प्रक्रिया टप्याटप्याने समजून घेऊया.
- एफपीसी नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे:
- एफपीसीच्या १० प्रवर्तकांसाठी:
- पॅन कार्ड
- आधार कार्ड
- मतदान कार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स किंवा पासपोर्ट.
- बँक पासबुकाचे पहिले पेज आणि अद्ययावत आर्थिक व्यवहार असलेले पेज किंवा बँक स्टेटमेंट (यावर खातेदाराचे नाव व पत्ता तसेच मागील एका महिन्याचे व्यवहार असावे लागतात)/लाईट बिल/मोबाईल बिल.
- ७/१२ उतारा (तलाठीच्या सही आणि शिक्कासह) किंवा डिजिटल ७/१२ (क्यूआर कोड असलेला)
- जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तहसील कार्यालय किंवा तालुका कृषी अधिकारी यांच्या लेटरपॅडवरून शेतकरी प्रमाणपत्र.

- २ फोटो
- इमेल आयडी(प्रवर्तकांचा इमेल आयडी नसल्यास, आपल्याला अॅफेसरच्या टीमकडून सहाय्य मिळू शकते.)
- मोबाईल नंबर.
- पॅन कार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड / ड्रायव्हिंग लायसन्स, बँक स्टेटमेंट आणि ७/१२ उताऱ्यावर समान नावे असणे आवश्यक आहे.

**इतर कागदपत्रे:**

- एक साक्षीदाराचे पॅन कार्ड, आधार कार्ड.
- कंपनीच्या नोंदणीकृत पत्त्याचे लाईट बिल.

एफपीसीचे नाव निवडताना काळजीपूर्वक निवडा. कारण नाव आधीच नोंदणी केलेले असेल किंवा ट्रेडमार्क नोंदणी केलेले असेल, तर ते नाव उपलब्ध होणार नाही. कंपनीसाठी किमान ३ ते ४ संभाव्य नावे तयार करून ठेवा, ज्यामुळे एफपीसीसाठी नाव मिळवणे सोपे जाईल.

### ६.3 संचालक मंडळ निवडताना घ्यावयाची काळजी :

- संचालक मंडळात किमान एक महिला संचालक असावी.
- संचालकांचे कर्ज थकीत नसावे.
- संचालक किमान लिहता वाचता आणि प्राथमिक शिक्षण झालेला असावा.
- संचालक मध्ये नेतृत्व गुण असणे आवश्यक आहे.
- प्रत्येक विभागातील शेतकऱ्यांच्या मधील त्यांना प्रतिनिधित्व एक तरी संचालक असावा.
- संचालक इतर कंपन्या मध्ये संचालक झाला किंवा असेल तर लगेचच कंपनी ला कळवावे.
- संचालकांचा कंपनीशी निगडित किंवा कंपनीला स्पर्धा करेल असा खाजगी व्यवसाय नसावा.

# ६.४ शेतकरी उत्पादक कंपनी तयार करताना कायदेशीर बाबी

| सेक्शन | व्यवस्था |
|---|---|
| १. कंपनीचे नाव | उत्पादक कंपनीचे कायदेशीर नाव निर्दिष्ट करते, ज्यामध्ये ''उत्पादक कंपनी'' किंवा ''उत्पादक कंपनी लिमिटेड'' असावे. |
| २. संचालकांची संख्या | संचालक मंडळामध्ये नियुक्त केलेल्या संचालकांची किमान आणि कमाल संख्या निर्दिष्ट करते. सामान्यतः, ही संख्या ५ ते १५ दरम्यान असते. |
| ३. संचालकांची निवड | संचालकांची निवड उत्पादक कंपनीच्या नोंदणीच्या तासापासून नव्वद दिवसांच्या आत पार पडली पाहिजे.''आंतरराज्य सहकारी संस्था''जी उत्पादक कंपनी म्हणून समाविष्ट करण्यात आली आहे, तिला इतर कंपन्यांसाठी ९० दिवसांच्या ऐवजी ३६५ दिवसांची सुविधा उपलब्ध होईल. |
| ४. अतिरिक्त संचालक आणि तज्ञ संचालक | तज्ञ संचालक किंवा अतिरिक्त संचालकांची सहमतेने निवड केली जाऊ शकते, पण त्यांच्या संख्येचा एक–पाचवा भागापेक्षा जास्त नसावा. अशा तज्ञ संचालकांना अध्यक्षाच्या निवडीत मतदान करण्याचा अधिकार नसला तरी अध्यक्ष म्हणून निवडण्यासाठी पात्र आहेत. |
| ५. शेअर भांडवल आणि शेअर्सचे हस्तांतरण | उत्पादक कंपनीमध्ये फक्त इक्विटी शेअर्स असावेत. सक्रिय सदस्यांना लेखांमध्ये प्रदान केलेल्या विशेष अधिकारांची प्राप्ती होऊ शकते. शेअर्स हस्तांतरणीय असू नयेत. विशेष अधिकार असलेल्या शेअर्स बोर्डाच्या मंजुरीने दुसऱ्या सक्रिय सदस्याला हस्तांतरित केले जाऊ शकतात. प्रत्येक सदस्याने कंपनीचा सदस्य बनल्यानंतर तीन महिन्यांच्या आत एक व्यक्ती नियुक्त केली पाहिजे. सदस्याच्या मृत्यूवर नियुक्त व्यक्तीला सर्व लाभ मिळतील. जर नियुक्त व्यक्ती उत्पादक नसल्यास, बोर्ड नियुक्त व्यक्तीला शेअर्स परत करण्याचे निर्देश देईल. |
| ६.सान्धि घोषणापत्र आणि लेखाच्या नियमांची बदल | कंपनीच्या सान्धि घोषणापत्र (MoA) किंवा लेखाच्या नियमांत (AoA) बदल करण्यासाठी विशेष ठराव पारित करावा लागतो, परंतु MoA किंवा AoA चा बदल सेक्शन 581B शी विसंगत नसावा. लेखाच्या नियमांत बदल केल्यास, हे बदल निवडलेल्या संचालकांच्या किमान २/३ हिस्स्याद्वारे किंवा सदस्यांच्या किमान १/३ हिस्स्याद्वारे प्रस्तावित केले पाहिजेत आणि विशेष ठरावाद्वारे स्वीकारले पाहिजेत. बदललेल्या MoA किंवा AoA च्या प्रतीसह विशेष ठरावाची प्रत ३० दिवसांच्या आत नोंदणी अधिकाऱ्यांकडे सादर करावी लागते. |
| ७. वार्षिक सर्वसाधारण सभा | पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा (AGM) संस्थेच्या नोंदणीच्या तारखेस ९० दिवसांच्या आत आयोजित केली जाईल. नोंदणीकर्ता वार्षिक सर्वसाधारण सभा (पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा नसलेली) आयोजित करण्यासाठी ३ महिन्यांचा विस्तार देऊ शकतो.<br>उत्पादक कंपनी प्रत्येक वर्षी एक वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करेल आणि एका वार्षिक सर्वसाधारण सभेपासून दुसऱ्या सभेपर्यंत १५ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी न जाऊ देईल. AGM किमान १४ दिवसांची नोटीस देऊन आयोजित केली जाईल. प्रत्येक AGM च्या कार्यवाहीसह संचालकांचा अहवाल, ऑडिट केलेले बॅलन्स शीट आणि नफा नुकसान खाते नोंदणीकर्त्याकडे AGM च्या ६० दिवसांच्या आत सादर केले जावे.<br>कोरम: एकूण सदस्यांच्या १/४ भाग. |
| ८. मंडळाच्या बैठका आणि कोरम | बोर्ड दर तीन महिन्यांनी किमान एकदा बैठक घेईल आणि प्रत्येक वर्षी किमान चार अशा बैठका आयोजित केल्या जातील. मुख्य कार्यकारी अधिकारी बोर्ड बैठकीसाठी किमान ७ दिवस आधी नोटीस देईल. बैठक कमी नोटीससह आयोजित केली जाऊ शकते, पण त्याचे कारण बोर्डाने नोंदवले पाहिजे. कोरम: संचालकांची एकूण ताकद याचा १/३ भाग, किमान ३ संचालक. शासन: मुख्य कार्यकारी अधिकारी नोटीस पाठवण्याच्या नियमांचे पालन करत नाही, तर त्याला जास्तीत जास्त १,००० रुपये दंड देण्यात येईल. |

| सेक्शन | व्यवस्था |
|---|---|
| ९. मुख्य कार्यकारी अधिकारी | प्रत्येक उत्पादक कंपनीला पूर्ण वेळ मुख्य कार्यकारी अधिकारी असावा लागेल, जो बोर्ड द्वारा सदस्यांशिवाय इतर व्यक्तींपैकी नियुक्त केला जाईल. |
| १०. कंपनी सचिव | प्रत्येक उत्पादक कंपनीला, ज्याची सरासरी वार्षिक उलाढाल प्रत्येक तीन सलग आर्थिक वर्षांत ५.०० कोटी रुपये किंवा त्यापेक्षा जास्त आहे, एक पूर्ण वेळ कंपनी सचिव असावा लागेल.<br>नियुक्ती न केल्यास दंड: कंपनी आणि दोषी असलेला प्रत्येक अधिकारी, दोष सुरू राहिलेल्या प्रत्येक दिवशी जास्तीत जास्त ५०० रुपये दंड भरावा लागेल. |

**व्यवस्थापन**

प्रत्येक उत्पादक कंपनीमध्ये किमान पाच आणि जास्तीत जास्त १५ संचालक असणे आवश्यक आहे. बोर्डाने एक पूर्णवेळ मुख्य कार्यकारी अधिकारी नेमावा, ज्याला व्यवस्थापनाचे महत्वपूर्ण अधिकार दिले जातील, जे बोर्डाने ठरवले असतील.

## ६.५ शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) मध्ये संचालकांची जबाबदारी:

**१. नीती निर्मिती:**
- कंपनीच्या धोरणांची आणि उद्दिष्टांची आखणी करणे.
- कंपनीच्या दृष्टीकोनाचा आणि मिशनचा निर्धारण करणे.

**२. आर्थिक व्यवस्थापन:**
- कंपनीच्या आर्थिक स्थितीचे निरीक्षण करणे.
- बजेट तयार करणे आणि आर्थिक अहवालांचे पुनरावलोकन करणे.
- निधी आणि संसाधनांचे योग्य व्यवस्थापन करणे.

**३. व्यावसायिक संचालन:**
- कंपनीच्या रोजच्या कामकाजावर लक्ष ठेवणे.
- व्यवस्थापक आणि कर्मचार्यांना मार्गदर्शन करणे.

**४. विकास व विस्तार:**
- नवीन व्यवसाय संधी शोधणे आणि कंपनीच्या विस्ताराचे योजना तयार करणे.
- उत्पादन, सेवा आणि बाजार विस्ताराच्या दृष्टीने निर्णय घेणे.

**५. जोखमीचे व्यवस्थापन:**
- संभाव्य जोखमींचे विश्लेषण करणे आणि त्यावर उपाय योजना करणे.
- कायदेशीर आणि नियमांच्या पालनाचे सुनिश्चित करणे.

**६. सामाजिक आणि समुदायाच्या जबाबदाऱ्या:**
- कंपनीच्या सामाजिक जबाबदाऱ्या आणि समुदायाशी संबंधित उपक्रमांवर लक्ष देणे.
- शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करणे आणि त्यांच्या गरजा समजून घेणे.

**७. संचालनात्मक अंमलबजावणी:**
- कंपनीच्या निर्णयांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे.
- कंपनीच्या प्रक्रियांचे पालन करणे आणि सुधारणा सुचवणे.

**८. पारदर्शकता आणि अहवाल:**

- कंपनीच्या कामकाजाची पारदर्शकता सुनिश्चित करणे.
- संचालक मंडळाच्या बैठकीचे आणि निर्णयांचे प्रलेखन करणे.

**९. संबंध व्यवस्थापन:**

- सदस्य, भागीदार, आणि इतर स्टेकहोल्डर्ससह प्रभावी संवाद साधणे.
- त्यांच्या अडचणी आणि सूचनांचे योग्य समाधान करणे.
- संचालकांनी या जबाबदाऱ्या पार पाडताना कंपनीच्या ध्येय आणि उद्दिष्टांचे पालन करणे आवश्यक आहे.

## ६.६ शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) मध्ये CEO (मुख्य कार्यकारी अधिकारी) ची जबाबदारी खालीलप्रमाणे असू शकते:

**१. दृष्टीकोन आणि धोरण:**

- कंपनीच्या दृष्टीकोनाचे आणि धोरणाचे विकास व अंमलबजावणी करणे.
- दीर्घकालीन उद्दिष्टे आणि ध्येयांचे निर्धारण करणे.

**२. प्रशासन आणि व्यवस्थापन:**

- कंपनीच्या कार्यक्षमतेची देखरेख करणे.
- व्यवस्थापकांची नियुक्ती, प्रशिक्षण आणि व्यवस्थापन करणे.
- दररोजच्या कार्यसंचालनाचे समन्वय आणि निरीक्षण करणे.

**३. वित्तीय व्यवस्थापन:**

- बजेट तयार करणे आणि आर्थिक आढावा घेणे.
- निधी मिळवण्यासाठी योजनांचे विकास व अंमलबजावणी करणे.
- आर्थिक अहवाल तयार करणे आणि त्यांचा आढावा घेणे.

**४. संपर्क आणि संवाद:**

- विविध संबंधित भागीदारांशी संवाद साधणे.
- शेतकऱ्यांच्या गरजा आणि अपेक्षा समजून घेणे आणि त्यानुसार योजना तयार करणे.

**५. विपणन आणि व्यवसाय विकास:**

- उत्पादनांच्या विपणनाच्या धोरणांची अंमलबजावणी करणे.
- व्यवसाय वाढवण्यासाठी नवीन संधींचा शोध घेणे.

**६. धोरणात्मक निर्णय:**

- महत्वाच्या धोरणात्मक निर्णयांवर सल्ला देणे आणि निर्णय घेणे.
- व्यवस्थापनाच्या समितीशी समन्वय साधणे.

**७. जोखमीचे व्यवस्थापन:**

- संभाव्य जोखमींचे विश्लेषण करणे आणि त्या कमी करण्यासाठी उपाय योजना तयार करणे.
- कायदेशीर आणि नियामक अनुपालन सुनिश्चित करणे.

**८. समुदाय विकास आणि सामाजिक जबाबदारी:**

- शेतकरी समुदायाच्या विकासासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करणे.
- सामाजिक जबाबदारीची पूर्तता करणे.

**९. प्रस्तावना आणि रिपोर्टिंग:**

- व्यवस्थापन समितीस नियमित रिपोर्ट तयार करणे.
- व्यवस्थापनाचे आणि फायनान्सचे साप्ताहिक, मासिक, वार्षिक अहवाल तयार करणे.

**१०. संकल्पना आणि नवकल्पना**

- कंपनीच्या कामकाजात नवीन तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचा समावेश करणे.
- उत्पादन आणि प्रक्रिया सुधारण्यासाठी नव्या कल्पनांचा वापर करणे.

या जबाबदाऱ्या CEO च्या यशस्वी कार्यासाठी महत्त्वाच्या आहेत आणि कंपनीच्या सर्वसमावेशक कार्यप्रणालीत महत्त्वाची भूमिका बजावतात.

शेतकरी उत्पादक कंपनी (FPO) द्वारे कमी भांडवलात सुरवात करता येणारे आणि शाश्वत चालणारे व्यवसाय निवडताना, आर्थिक फायदा आणि कमी गुंतवणुकीचे विचार लक्षात घेतले पाहिजेत. खालील काही व्यवसाय आहेत जे कमी भांडवलात सुरू करता येतील आणि शाश्वत पद्धतीने चालवता येतील:

## ६.७ शेतीसेवा केंद्र:

- उत्पादन: बी-बियाणे, खते, कीटकनाशके, शेत तळे, शेतीसाठी आवश्यक उपकरणे.
- फायदा: शेतकऱ्यांना जवळपासच आवश्यक सेवा पुरवल्यामुळे फायदा वाढतो.

## ६.८ शेतीप्रक्रिया केंद्र:

- उत्पादन: धान्य, फळे, भाज्या इत्यादींची प्रक्रिया करून मूल्यवृद्धी करणे, जसे की पॅकेजिंग, सुकवणे, जाम-चटणी बनवणे.
- फायदा: मूल्यवर्धित उत्पादनांच्या विक्रीतून अधिक नफा.
- बियाणे उत्पादन आणि वितरण:
- उत्पादन: प्रमाणित बियाणे उत्पादन आणि विक्री.
- फायदा: शेतकऱ्यांना उच्च प्रतीच्या बियाण्यांचा वापर करून अधिक उत्पादन मिळवता येते.
- शेतमाल खरेदी-विक्री व्यवसाय:
- उत्पादन: शेतमालाचे खरेदी व विक्री (धान्य, भाजीपाला, फळे, इ.)
- गुंतवणूक: कमी, कारण शेतमालाची खरेदी थेट शेतकऱ्यांकडून करता येते, जे वाहतूक आणि साठवणुकीवर खर्च कमी करेल.
- फायदा: FPO मार्फत शेतकऱ्यांना चांगली किंमत मिळू शकते, आणि विक्री मार्फत स्थिर नफा मिळवता येतो. व्यापाऱ्यांना थेट विक्री करून बाजारातील दलालांचा हस्तक्षेप कमी करता येतो.

## ६.९ शेतमाल गोदाम व्यवस्थापन:

शेतीत उत्पादनाचे प्रमाण मोठे असले तरी शेतमालाच्या बाजारातील अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांना योग्य किंमत मिळवण्यात अडचणी येतात. या समस्येवर उपाय म्हणून शेतमालाचे योग्य साठवण करण्यासाठी गोदामे उभारणे एक शाश्वत आणि फायद्याचा व्यवसाय ठरू शकतो.

## ६.१० व्यवसायाचे फायदे:

- साठवण क्षमता: शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचे योग्य साठवण मिळवता येते, ज्यामुळे ते बाजारातील योग्य किंमतीची वाट पाहू शकतात.
- गुंतवणूक: सुरुवातीला काही प्रमाणात गुंतवणूक आवश्यक असते, परंतु शासकीय अनुदान आणि सहाय्य मिळवून कमी खर्चात सुरू करता येते.

- फायदा: शेतकऱ्यांना शेतमालाच्या चढउतारांवर आधारित निर्णय घेण्याची संधी मिळते, ज्यामुळे त्यांना अधिक नफा मिळतो.
- सुरक्षा: साठवणुकीसाठी आवश्यक तंत्रज्ञान वापरल्यामुळे शेतमालाची गुणवत्ता राखून ठेवता येते, ज्यामुळे बाजारातील मागणी नुसार विक्री होऊ शकते.

### ६.११ कडधान्य मार्केट जोखीम व्यवस्थापन (NCDEX) शेतकरी उत्पादक कंपनीद्वारे:

कडधान्यांचे बाजारातील भाव चढउतार आणि बाजारातील जोखमीचा सामना करण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपनी (FPO) NCDEX (National Commodity & Derivatives Exchange) च्या माध्यमातून जोखीम व्यवस्थापन व्यवसाय सुरू करू शकते.

### ६.१२ व्यवसायाचे फायदे:

- जोखीम व्यवस्थापन: NCDEX तर्फे उपलब्ध असलेल्या फ्यूचर्स आणि ऑप्शन्स करारांचा वापर करून शेतकऱ्यांना कडधान्यांच्या बाजारभावांवर जोखीम व्यवस्थापन करण्यास मदत होते.
- आर्थिक संरक्षण: बाजारातील भाव कमी झाल्यास FPO तर्फे फ्यूचर्स करारांमुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान होण्यापासून संरक्षण मिळते.
- भविष्यातील विक्रीची योजना: FPO NCDEX तर्फे कडधान्यांचे फ्यूचर्स करार करून भविष्यातील विक्रीचे नियोजन करू शकते, ज्यामुळे शेतकऱ्यांना विक्रीची निश्चिती मिळते.

### ६.१३ अंमलबजावणी:

- NCDEX मध्ये नोंदणी: FPO ला NCDEX मध्ये नोंदणी करून तिथे ट्रेडिंग सुरू करण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रे आणि परवाने मिळवणे.
- मार्केट विश्लेषण: FPO तर्फे कडधान्यांच्या बाजारातील स्थिती आणि भावांचा अभ्यास करून योग्य वेळेस करार करणे.
- शेतकऱ्यांना माहिती आणि प्रशिक्षण: शेतकऱ्यांना NCDEX आणि फ्यूचर्स ट्रेडिंगच्या प्रक्रिया, फायदे, आणि धोके याबद्दल माहिती देणे आणि प्रशिक्षण आयोजित करणे.

### ६.१४ फायदे:

- भावांची स्थिरता: कडधान्याच्या बाजारात स्थिरता येईल आणि शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचे योग्य मूल्य मिळू शकेल.
- जोखीम कमी: बाजाराच्या चढ उतारांपासून संरक्षण मिळवण्यासाठी NCDEX च्या साधनांचा वापर करून जोखीम कमी करता येईल.
- आर्थिक नियोजन: शेतकऱ्यांना भविष्यातील विक्रीचे योग्य नियोजन करता येईल.

NCDEX च्या माध्यमातून FPO कडधान्यांच्या बाजार जोखमींचे व्यवस्थापन करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात स्थिरता आणू शकते, ज्यामुळे त्यांचा आर्थिक फायदा वाढू शकतो.

## ७ एफपीसीसाठी लागू होणारे कायदे, आवश्यक परवाने व परवानग्या:

१. आयकर कायदा

- एफपीसीला कंपनीची वार्षिक उलाढाल कितीही असली तरी इन्कम टॅक्स रिटर्न दाखल करणे आवश्यक आहे.

- उलाढाल रु. १ कोटीपेक्षा जास्त असल्यास इन्कम टॅक्स ऑडीट करणे गरजेचे आहे.
- टी.डी.एस. आणि टी.सी.एस. कपात करून त्याचे चलन व रिटर्न्स वेळेत भरावे लागतात.
- आयकर कायद्याच्या विविध तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे.

**२. वस्तू व सेवा कर** (GST)

- करपात्र सेवा देत असल्यास रु. २० लाखापेक्षा जास्त उलाढाल किंवा करपात्र वस्तूंची उत्पादन, खरेदी-विक्री करत असल्यास रु. ४० लाखच्या मर्यादेपेक्षा जास्त उलाढाल झाल्यास जीएसटी नोंदणी घेणे बंधनकारक आहे.
- एफ.पी.सी.ने गरजेनुसार रेग्युलर किंवा कंपोझिशन प्रकारात जीएसटी नोंदणी घ्यावी.
- जी.एस.टी. नोंदणी केल्यानंतर दरमहा, तिमाही, आणि वार्षिक रिटर्न दाखल करणे आवश्यक आहे.
- वेळेवर रिटर्न्स दाखल न केल्यास दंड व शिक्षेच्या तरतुदी जीएसटी कायद्यात आहेत.

**३. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास कायदा, २००६:**

- एफ.पी.सी.ने 'उद्यम रजिस्ट्रेशन' घेणे आवश्यक आहे.
- उद्यम रजिस्ट्रेशन बँकेत कर्ज मागणी करतांना आणि विविध शासकीय योजनांचे लाभ घेतांना आवश्यक दस्तऐवज आहे.

**४. व्यवसायकर कायदा**

- एफ.पी.सी.ची नोंदणी झाल्यावर PTRC आणि PTEC रजिस्ट्रेशन मिळवणे आवश्यक आहे.
- PTEC साठी दरवर्षी रु. २,५००/- चा शुल्क भरावे लागते.
- एफ.पी.सी.च्या कर्मचाऱ्यांच्या पगारातून व्यवसायकराची कपात करून PTEC अंतर्गत कराचा भरणा करावा लागतो आणि रिटर्न्स दाखल करावे लागतात.

## ७.२ भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरण (FSSAI)

- खाद्यपदार्थांचे उत्पादन, रिपॅकिंग, रिसेलिंग किंवा विक्री करणे असल्यास फूड लायसन्स घेणे आवश्यक आहे.
- फूड लायसन्स चे बेसिक, स्टेट आणि सेंटरल असे तीन प्रकार आहेत.
- उद्योगाच्या क्षमता, उलाढाल, आणि कार्यक्षेत्रानुसार आवश्यक फूड लायसन्स प्राप्त करणे आवश्यक आहे.
- फूड लायसन्स १ ते ५ वर्षांच्या कालावधीसाठी दिले जाते आणि मुदत संपण्याच्या १८० दिवस आधी नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

## ७.३ एफपीसीसाठी आवश्यक कायदेशीर अर्जांची वेबसाईट्स:

A. आयकर कायदा (Income Tax Act)

- **वेबसाईट:** https://incometaxindia.gov.in

B. वस्तू व सेवा कर (GST):

- **वेबसाईट:** https://www.gst.gov.in

C. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास कायदा, २००६:

- **वेबसाईट:** https://udyamregistration.gov.in

D. व्यवसायकर कायदा (Professional Tax):

- **वेबसाईट :**https://www.tgct.gov.in

E. भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरण (FSSAI):

- **वेबसाईट:** https://www.fssai.gov.in

A B C D E

## ८ शेतकरी उत्पादक कंपनीसाठी शासकीय योजना:

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उपक्रम (PMFME)::

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उपक्रम (PMFME) ही योजना भारत सरकारच्या अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या (Ministry of Food Processing Industries - MoFPI) अंतर्गत राबवली जाते.

**योजनेचे उद्दिष्ट सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना सक्षमीकरण आणि आर्थिक सहाय्य पुरवणे आहे.**

प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग योजना – खाद्यान्न प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी या योजनेंतर्गत प्रकल्प किमतीच्या ३५% किंवा १० लाख यापैकी जे कमी असेल इतके अनुदान मिळते. तसेच सामान्य पायाभूत सुविधा उभारण्यासाठी प्रकल्प किमतीच्या ३५% अनुदान मिळते

अर्ज प्रक्रिया: ऑनलाइन अर्ज:

- PMFME योजनेचा ऑनलाइन अर्ज PMFME पोर्टल द्वारे भरा.
- पोर्टलवर लॉगिन करून अर्ज प्रक्रिया सुरू करा आणि आवश्यक माहिती भरा.
- वेबसाइट: mofpi.nic.in

## ८.१ मॅग्नेट प्रकल्प

शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योग उभारणीसाठी या योजनेत व्यवहार्यता अंतर निधीनुसार जास्तीत जास्त ६०% पर्यंत अनुदान मिळते. फळ प्रक्रिया उद्योगांसाठी जास्तीत जास्त ३ कोटी पर्यंत व इतर उद्योगांसाठी २ कोटीपर्यंत अनुदानाची मर्यादा आहे.

**अर्ज प्रक्रिया:**

- प्रकल्प प्रस्ताव तयार करणे: प्रकल्पाच्या उद्दिष्टे, योजना, आणि अपेक्षित परिणाम यांचे तपशील असलेला प्रस्ताव तयार करणे.
- स्थानिक कार्यालयाशी संपर्क: प्रकल्पाच्या स्थानिक व्यवस्थापन यंत्रणेशी संपर्क साधणे आणि त्यांच्या मार्गदर्शनानुसार अर्ज प्रक्रिया पूर्ण करणे.
- आवश्यक कागदपत्रे: प्रकल्पासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे संकलित करणे आणि सादर करणे.
- अर्ज सादर करणे: संबंधित विभागाच्या वेबसाइटवर किंवा कार्यालयात अर्ज सादर करणे.
- पुनरावलोकन आणि मान्यता: अर्जाच्या तपासणी नंतर प्रकल्पास मान्यता मिळवणे आणि निधीची वितरण प्रक्रिया पूर्ण करणे.
- विभागीय कार्यालय संपर्क

**महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ**

प्लॉट नं.आर–७, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे – ४११ ०३७.

०२० २४५२८१००, ०२० २४५२८२००, ०२० २४५२८२९९

## ८.२ स्मार्ट प्रकल्प

शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योग उभारणीसाठी या योजनेत व्यवहार्यता अंतर निधीनुसार जास्तीत जास्त ६०% पर्यंत अनुदान मिळते. फळ प्रक्रिया उद्योगांसाठी जास्तीत जास्त ३ कोटी पर्यंत व इतर उद्योगांसाठी २ कोटीपर्यंत अनुदानाची मर्यादा आहे.

प्रस्ताव तयार करणे: प्रकल्प प्रस्ताव, उद्दिष्टे, आणि खर्चाचे अंदाज तयार करणे.

स्थानिक कार्यालयाशी संपर्क:

संबंधित जिल्ह्याच्या शेती किंवा ग्रामीण विकास विभागाशी संपर्क साधा.

आवश्यक कागदपत्रे: अर्जाच्या सोबत आवश्यक कागदपत्रे संकलित करून सादर करणे

National Agri Infra Fund– एफ.पी.सीं.ना उद्योग व इन्फ्रास्ट्रक्चर उभे करण्यासाठी बँकेकडून या योजनेंतर्गत कर्ज घेतल्यास ३% ते ४% व्याजाचा परतावा मिळतो. तसेच कर्ज घेतांना क्रेडीट गॅरंटी उपलब्ध करून देण्यासाठी मदत होते.

**अर्ज प्रक्रिया:**

या योजना सदर नॅशनल व प्रायव्हेट बँका मध्ये सुद्धा उपलब्ध आहेत त्यासाठी शेतकरी उत्पादक कंपनी चे कमीत कमी २५० सभासद व ३ वर्ष ऑडिट असणे आवश्यक आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांना फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योगासाठी या योजनेत व्यवहार्यता अंतर निधीनुसार जास्तीत जास्त ६०% पर्यंत अनुदान मिळते.

## ८.३ नाबार्ड सहाय्य योजना:

- उद्दिष्ट: शेती आणि ग्रामीण विकासासाठी वित्तीय सहाय्य.
- सहाय्य: FPCs साठी दीर्घकालीन कर्जे आणि अनुदान.
- प्रक्रिया: नाबार्डच्या प्रादेशिक कार्यालयाशी संपर्क साधावा.
- वेबसाइट: nabard.org

## ८.४ एफ.पी.सी.चे प्रशिक्षण संस्था

**महाराष्ट्र को ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड** (MCDC)

सह्याद्री सहकारी भवन,

मालमत्ता क्र. ७०७, रूम क्र. १०४,

पेरिननारिमन स्ट्रीट, फोर्ट,

मुंबई ४००००१, महाराष्ट्र, भारत

टेलीफोन: +९१२२२२०२३१६८,

२२०२३१६९, २२०२४१९१

**MILIND AKARE**

Managing Director, MCDC

Mobile Number :९७६७०७५८५५

**UMED - Maharashtra State Rural Livelihoods Mission**

पत्ता: ५ वा मजला, सिडको भवन,

एसबीआय सिडको भवन, सेक्टर १०,

सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, महाराष्ट्र ४००६१४

फोन: ०२२ २७५६ २५५२

**राष्ट्रीय शेती आणि ग्रामीण विकास बँक** (NABARD):

वेबसाइट: NABARD

संपर्क: +९१-२२-२६५३९२१७

महा.एफ.पी. फेडरेशन

पत्ता: १८, रेंज हिल रोड, यशवंत नगर,

पुणे, महाराष्ट्र - ४११०५३

फोन: ०८९५६४ ३२४८१

# ७.४ शेतकरी सहकारी संस्था आणि शेतकरी उत्पादक कंपनी यांच्यातील फरक खालीलप्रमाणे आहे:

| विभाग | शेतकरी सहकारी संस्था | शेतकरी उत्पादक कंपनी |
|---|---|---|
| कायदेशीर संरचना | सहकार कायद्याखाली नोंदणीकृत असते. | कंपन्यांच्या कायद्याखाली नोंदणीकृत असते. |
| नियंत्रण व व्यवस्थापन | सर्वसाधारण सभेच्या माध्यमातून चालवले जाते. | संचालक मंडळाद्वारे चालवले जाते. |
| शेअर भांडवल | शेअर्स हस्तांतरणीय नसतात, आणि प्रत्येक सदस्याचे एक मत असते. | शेअर्स हस्तांतरणीय असू शकतात,पण फक्त सदस्यांमध्येच. |
| लाभांचे वितरण | सहकार संस्था आपल्या नफ्याचा काही हिस्सा रिझर्व फंडात ठेवून उर्वरित हिस्सा सदस्यांमध्ये वितरित करते. | उत्पादक कंपनी नफ्याचा लाभांश शेअर्सच्या प्रमाणात सदस्यांना वितरित करते. |
| उद्दिष्ट | सहकारी तत्त्वांवर आधारित, सामूहिक निर्णय आणि सामूहिक जबाबदारीवर केंद्रित. | शेतकऱ्यांच्या आर्थिक हितासाठी व्यावसायिक तत्त्वांवर चालवली जाते. |
| सदस्यत्व | सहकार संस्थेचे सदस्य सामान्यतः एकाच क्षेत्रातील किंवा व्यवसायातील असतात. | उत्पादक कंपनीचे सदस्य सामान्यतः शेतकरी किंवा शेती उत्पादनाशी संबंधित व्यक्ती असतात. |
| अर्थसहाय्य | संस्थेच्या निधीची उभारणी सदस्यांच्या योग-दानातून आणि सरकारी अनुदानातून होते. | उत्पादक कंपनी भांडवलाच्या उभारणीसाठी शेअर होल्डर्स कडून निधी उभा करते, तसेच बाह्य स्रोतांकडून कर्ज घेऊ शकते. |
| उत्पादकांची जबाबदारी | सहकारी संस्थेमध्ये सदस्यांनी निश्चित केलेल्या नियमांप्रमाणे कार्य करणे आवश्यक असते. | उत्पादक कंपनीमध्ये, सदस्यांनी उच्च गुणवत्तेच्या उत्पादनाची हमी द्यावी लागते, अन्यथा त्यांच्यावर आर्थिक दंड आकारला जाऊ शकतो. |
| संचालक मंडळ | सहकार संस्थेचे संचालक मंडळ सदस्यांद्वारे निवडले जाते आणि सहकारी तत्त्वांवर चालवले जाते. | उत्पादक कंपनीचे संचालक मंडळ निवडले जाते आणि व्यावसायिक निर्णय घेण्यासाठी स्वतंत्र असते. |
| ऑडिट व अनुपालन | सहकार संस्था दरवर्षी आपले खाते सरकार-नियुक्त ऑडिटरद्वारे ऑडिट करवते. | उत्पादक कंपनीला वार्षिक ऑडिट करणे बंधनकारक आहे, परंतु ती कोणत्याही प्रमाणित ऑडिटर कडून करु शकते. |
| अध्यक्षाची निवड | सहकार संस्थेचा अध्यक्ष सदस्यांद्वारे निवडला जातो आणि तो व्यवस्थापनात महत्त्वाची भूमिका बजावतो. | उत्पादक कंपनीचा अध्यक्ष संचालक मंडळाद्वारे निवडला जातो आणि तो केवळ एका संचालकासारखा काम करतो. |
| सरकारशी संबंधित नियम | सहकार संस्था शासकीय अनुदान, सवलती आणि योजनांचा लाभ घेऊ शकते. | उत्पादक कंपनीला शासकीय योजनांचा लाभ मिळू शकतो, पण तिला अधिक स्वातंत्र्य आहे. |
| सभासदांचे मताधिकार | प्रत्येक सदस्याला एकच मत असते, जे संस्थेच्या सर्वसाधारण सभेत वापरले जाते. | शेअर्सच्या आधारे मताधिकार दिले जातात. |
| व्यवसायाच्या प्रकार | सहकार संस्था शेतमाल विक्री, खते व बियाणे वितरण, शेतीसेवा यासारख्या विविध सहकारी व्यवसायांमध्ये सहभागी होऊ शकते. | उत्पादक कंपनी उत्पादन, प्रक्रियाकरण, विपणन, वितरण इत्यादी व्यवसायांत सहभागी होऊ शकते. |

## ८.५ शेतीविज्ञान केंद्र

- **शेती विज्ञान केंद्र, बोरगाव, जि. सातारा (सातारा)**
  संपर्क : ०२१६२–२९५६२५
  इमेल– kvkborgaon_satara@yahoo.com
- **शेती विज्ञान केंद्र, तळसांडे, जि. कोल्हापूर (कोल्हापूर)**
  संपर्क : ०२३०–२४७९०९९
  इमेल : kvkkolhapur@gmail.com
- **शेती विज्ञान केंद्र, मालेगाव जि. नाशिक (नाशिक)**
  संपर्क : ०२५३–२५७७६६६, ८७८८१३३७०२
  kvkmalegaongmail.com
  इतर केव्हीके संपर्क व माहिती साठी येथे स्कॅन करा.
- **ईटीसी सस्टेनेबल डेव्हलपमेंट फाऊंडेशन,**
  वसंत तारा अपार्टमेंट, आपटे रोड, संतोष बेकरीजवळ, डेक्कन जिमखाना – पुणे ४११००४.
  ईमेल: infoetcfoundation@gmail.com,
  संपर्क: ९४४८२९६७०८

## ९. शेतकरी सामुहिक सहकारी उद्योगांसाठी काही पर्याय

शेतकरी बंधू भगिनीनी एकत्र यायचा निश्चय करण्यापूर्वी किंवा केल्यानंतर मोठा प्रश्न असतो तो म्हणजे 'उद्योग कोणता निवडावा'. अनेक अभ्यासू शेतकऱ्यांनी आणि महिलांनी स्वतःच्या हिमतीवर आणि गरजेप्रमाणे थोडीफार बाहेरील मदत घेऊन याची उत्तम उदाहरणे उभी केली आहेत. अश्या अनेक उद्योगांची माहिती आपल्या वेबसाईट वर उपलब्ध आहेच, शिवाय इथे पण थोडक्यात देत आहोत.

- **औषधी वनस्पती** – आपल्या सह्याद्रीच्या जंगलामध्ये असंख्य प्रकारच्या वनस्पती आहेत, आणि त्यापैकी हजारो वनस्पतींचे औषधी उपयोग आयुर्वेदात सांगितले आहेत. या वनस्पतीना बाजारात औषध कारखान्यांकडून कायम मागणी असते. विशेष म्हणजे औषधी वनस्पती जंगली अवस्थेत वाढतात (शेतीसारखी लागवड नव्हे), तेव्हाच त्यांचे खरे गुणधर्म त्यांच्या अंगी येतात. केवळ आपली जंगले सांभाळली आणि वाढवली तर त्यातून हिरडा, बेहडा, आवळा, जांभूळ, बाभळ, बिबा आणि असंख्य अश्या वनस्पती मिळू शकतात.
- **टसर रेशीम** – ज्याप्रमाणे तुती च्या झुडूपांवर रेशीम किड्याची पैदास करून रेशीम उत्पादन केले जाते त्याचप्रमाणे ऐनाच्या झाडांवर सुद्धा रेशीम किड्यांना जोपासून रेशीम उत्पादन केले जाऊ शकते. ऐनाचे वृक्ष सह्याद्रीत निसर्गतः भरपूर आणि सहज उगवतात.
- **जंगली किंवा लागवड केलेल्या फळांवर प्रक्रिया उद्योग** – आंबा, करवंद, फणस, जांभूळ, कोकम ई. फळांपासून तयार केलेले मुरंबे, चटणी, सरबत, लोणची आणि इतर उत्पादन अतिशय लोकप्रिय आहेत आणि त्यांना बाजारातून कायम मागणी असते.

- **सौर उर्जा वापरून शेतमाल सुकवणे –** केवळ शेतमाल नाशिवंत असल्यामुळे शेतकऱ्याचे शकडो वर्षांपासून शोषण होत आहे. बाजारभाव पाडून माल विकणे हेच शेतकऱ्याच्या अवस्थेचे मूळ कारण आहे. यावर सोलर ड्रायर हे एक उत्तर असू शकते. ताजा शेतमाल सौर उर्जा वापरून सुकवला तर त्याचा टिकाऊपणा खूप वाढतो. देश विदेशच्या बाजारपेठांतून प्रक्रिया उद्योगांमधून अशा मालाला भरपूर मागणी असते.
- **जंगली मध उद्योग –** जंगलातून मध गोळा करून विकणे हा पूर्वापार केला जाणारा उद्योग आहे. हाच उद्योग जर व्यवस्थित प्रशिक्षण घेऊन केला तर मध माश्यांना इजा न करता मधाचे उत्पादन घेतले जाऊ शकते. शुध्द जंगली मधाला कायम भरपूर मागणी आणि चांगला भाव असतो.
- **बांबू –** बांबूचे एक हजारपेक्षा जास्त उपयोग सापडले आहेत. अनेक शेतकरी आता बांबू लागवडीचा पर्याय निवडू लागले आहेत. चांगला अभ्यास करून हा पर्याय निवडला तर यातून आयुष्यभर चांगलं उत्पन्न मिळू शकते. तुलनेने कमी श्रम, कीड रोगाचा त्रास नाही असे हे पीक आहे.
- **लाकूड –** उत्तम प्रतीचे सागवान, ऐन, हेदी, जांभूळ, फणस, अश्या अनेक प्रजातींपासून मिळणाऱ्या लाकडाला कायम मागणी असते, शिवाय भाव पण वाढत आहेत. लांब पल्ल्याची गुंतवणूक म्हणून प्रत्येक शेतकऱ्याने थोडी तरी अशी झाडं सांभाळली पाहिजेत.
- **भरड धान्य (उत्पादन आणि प्रक्रिया) –** जास्त पावसाच्या डोंगराळ प्रदेशात नाचणी, वरी, कोदो, सावा, कांगणी अशा अनेक भरड धान्याची लागवड हजारो वर्षांपासून होत आली आहे. ही सर्व धान्य प्रकृती साठी अतिशय चांगली आहेत हे आता सिध्द झालं आहे. सुदैवाने, शहरी लोकांकडून आता या सर्व धान्यांना मोठी मागणी येत आहे. शिवाय यावर प्रक्रिया करून बनवलेले पदार्थ सुद्धा झपाट्याने लोकप्रिय होत आहेत.
- **कंद पिके –** सह्याद्री परिसरात अनेक प्रकारचे कंद निसर्गतः उगवतात आणि हजारो वर्षांपासून इथल्या शेतकऱ्यांना आणि आदिवासींना हा एक उत्तम अन्नाचा स्त्रोत माहिती होता. आज पुन्हा या पिकांबद्दल जनजागृती होते आहे आणि मागणी वाढत आहे.
- **मसाल्याची पिके –** सह्याद्री भागात मसाल्याची पिकं उत्तम होतात पण महाराष्ट्रात या कडे दुर्लक्ष झालं आहे. मसाल्याचे जिन्नस महाग असतात आणि त्यांना देशविदेशातून कायम मागणी असते. उताराच्या जमिनींवर यापैकी बरीच बहुवार्षिक पिके होत असतात.
- **जंगली वृक्षांची रोपवाटिका –** सह्याद्री भागातल्या वृक्ष आधारित पर्यायी उद्योगांबद्दल माहितीचा प्रसार जसजसा होत जाईल, तशी या सर्व वृक्षांच्या रोपांची मागणी वाढू लागेल. अशा काळात रोपवाटिकेचा व्यवसाय एक चांगला पर्याय असेल.
- **कृषी पर्यटन –** प्रयत्नाचे इतर प्रकार – गडकिल्ले, वन पर्यटन, साहसी पर्यटन ई. – शहरी भागात राहणाऱ्या नोकरदार माणसांना निसर्गाची ओढ लागते आणि सुट्टी मिळाली की त्यांना कुठतरी गावात, डोंगरात सहलीला जायची इच्छा होते. अशा लोकांसाठी कृषी पर्यटन आणि इतर प्रयत्नाचे प्रकार हा चांगला व्यवसाय ठरू शकतो.

## १० शेतकरी उद्योजकांचा माहितीकोष (सातारा व कोल्हापुर)

१०.१ शासकीय विभाग आणि संबंधित अधिकारी.(गाव,तालुका,जिल्हा स्तरीय)

१०.२ जिल्हा/तालुका कृषी विभाग

१०.३ जिल्हा/तालुका वन विभाग

१०.४ जिल्हा ATMA विभाग


१०.५ शेतकरी गट, महिला गट, शेतकरी उत्पादक कंपनी आणि सहकारी उद्योगांची संपर्क माहिती.

### १०.१ शासकीय विभाग आणि संबंधित अधिकारी.

- राज्य आणि स्थानिक पातळीवर प्रशासनाचे कामकाज सुरळीत पणे चालण्यासाठी प्रशासनाने विविध विभागांची स्थापना केली आहे.
- यामध्ये कार्यकरणी नुसार विभांगाची विभागणी राज्य, जिल्हा, तालुका आणि गावपातळी वर केली आहे.
- खाली नमूद केलेल्या प्रशासकीय विभागांतर्गत प्रत्येक स्तरावरील कामकाज पहिले जाते. याची माहिती पाहुयात.

**आपण यामध्ये आपल्याला नेहमी गरज भासणाऱ्या विभागांची आणि संबंधित अधिकारी कोण ? याची माहिती अभ्यासू.**

**कोणत्या विभागात आपण नेहमी ये-जा करत असतो ?**



## तालुका कृषी विभाग- महाराष्ट्र शासन कृषी विभाग यूट्यूब वाहिनी

### सातारा जिल्हा कृषी यांचे कार्यालये.

- **उपविभागीय कृषी कार्यालय, कराड.**
  गाला क्रमांक ३, कॉमर्स पॉइंट,
  पहिला मजला, न. तहसीलदार कचेरी,
  समोर. बँक ऑफ बडोदा, श्री दत्त गृहनिर्माण संस्था,
  कराड, महाराष्ट्र ४१५४१०.
- **तालुका कृषी अधिकारी खंडाळा**
  ७०४,७०३, तालुका कृषी कार्यालय
  खंडाळा, शिवाजी चौक, लोणंद रोड,
  खंडाळा, सातारा, सातारा–४१२८०२,
  महाराष्ट्र, भारत.
- **तालुका कृषी अधिकारी फलटण.**
  सिटी कोर्ट बिल्डिंग, लक्ष्मीनगर,
  फलटण, महाराष्ट्र ४१५५२३
- **तालुका कृषी अधिकारी कार्यालय वाई.**
  प्लॉट ७, मंगलमूर्ती बंगलो,
  बावधन, वाई, महाराष्ट्र ४१२८०३.
- **तालुका कृषी अधिकारी कोरेगाव.**
  ७०, लक्ष्मी नगर, कोंढवा, कोरेगाव,
  महाराष्ट्र ४१५५०.
- **तालुका कृषी कार्यालय, खटाव (वडूज).**
  पुसेगाव वडूज रोड, शिवाजी नगर,
  वडूज, महाराष्ट्र ४१५५०६.
- **तालुका कृषी कार्यालय, महाबळेश्वर.**
  सातारा रोड, महाबळेश्वर, महाराष्ट्र ४१२८०६.
  महाबळेश्वर तालुका तहशील
- **तालुका कृषी कार्यालय, माण.**
  दहिवडी, महाराष्ट्र ४१५५०८.
- **तालुका कृषी कार्यालय, पाटण.**
  NH 166E, कलोली, महाराष्ट्र ४१५२०६.
- **जिल्हा वन विभाग सातारा**
  श्री एम एन मोहिते
  विभागीय वन अधिकारी
  उप वनसंरक्षक (प्रादेशिक) सातारा
  यांचे कार्यालय
  पोवई नाका, जुनी ट्रेझरी कंपाउंड
  सातारा ४१५ ००१

## कोल्हापूर जिल्ह्यातील कृषी कार्यालये.

- **तालुका कृषी कार्यालय आजरा.**
  जिजामाता कॉलनी, आजरा,
  महाराष्ट्र ४१६५०५.
- **विभागीय सहसंचालक कृषी कार्यालय कोल्हापूर.**
  पोलीस मुख्यालय, कोल्हापूर,
  महाराष्ट्र ४१६००६.
- **जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, कोल्हापूर.**
  कसबा बावडा मेन रोड, श्री कॉलनी,
  लाईन बाजार,कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६००६.
- **कृषी विभाग, जिल्हा परिषद**
  ३रा मजला, नागाळा पार्क,
  कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६००३
- **कृषी तालुका अधिकारी, राधानगरी**
  तालुका कृषी कार्यालय, राधानगरी.
  राधानगरी, पाडळी, महाराष्ट्र ४१६२१२.
- **तालुका कृषी कार्यालय, चंदगड,**
  बस स्टॉपजवळ, चंदगड, महाराष्ट्र ४१६५०९.

**• जिल्हा वन विभाग कोल्हापूर**

श्री. काळे आर.आर.
विभागीय वन अधिकारी
उप वनसंरक्षक कार्यालय (प्रादेशिक)
कोल्हापूर
वनवर्धन बिल्डींग समोर, प्रधान
पोस्ट ऑफिस, आंबेडकर चौक,
ताराबाई चौक, कोल्हापूर - ४१६ ००
श्री. रामानुजम आर.एम.
मुख्य वनसंरक्षक
मुख्य वनसंरक्षक कार्यालय
(प्रादेशिक) कोल्हापूर
वनवर्धन बिल्डींग, प्रिन्सिपल पोस्ट
ऑफिस समोर, आंबेडकर चौक,
ताराबाई चौक, कोल्हापूर -४१६ ००३
०२३१२६५३६३२.

## १०.४ जिल्हा आत्मा विभाग

**कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा -आत्मा**
Agriculture Technology Management Agency (ATMA)

शेतकरी यांना विस्तार विषयक सेवा पुरविण्यासाठी आत्मा ही जिल्हास्तरावरील एक नोंदणीकृत स्वायत्त संस्था आहे. सर्वसाधारण धोरणात्मक निर्देश देण्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील आत्मा नियामक मंडळ ही आत्मा ची जिल्हा स्तरावरील सर्वोच्च समिती आहे.

यायोजनेची जिल्हा स्तरावर दैनंदिन अंमलबजावणी करण्यासाठी आत्मा कार्यकारी समिती असते. या योजनेचे नियोजन व अंमलबजावणी याबाबत शेतकरी यांची मते जाणुन घेण्यासाठी जिल्ह्यातील शेतकरी सदस्य असलेली जिल्हास्तरीय शेतकरी सल्लागार समिती असते. जिल्ह्याचा धोरणात्मक संशोधन व विस्तार आराखडा केला जातो. तालुका स्तरावर तालुका तंत्रज्ञान चमू (Block Technology Team- BTT) ज्यामध्ये कृषी व संलग्न विभागाचे तालुका स्तरीय अधिकारी असतात तसेच तालुका शेतकरी सल्लागार समिती (Block Farmer's Advisory Committee- BFAC) ज्यामध्ये तालुक्यातील निवडक शेतकरी सदस्य असतात.

या दोन्ही समिती तालुक्याचा तालुका कृती आराखडा (Block Action Plan- BAP) तयार करतात तसेच तालुक्यातील शेतकरी यांना विस्तार विषयक सेवा पुरवतात. गाव स्तरावर दोन गावां साठी एक शेतकरी मित्र नेमण्यात येतो. हा शेतकरी मित्र म्हणजे विस्तार यंत्रणा व शेतकरी यांचेमधील एक दुवा असतो. आत्मा अंतर्गत खालील बाबी राबविण्यात येतात.

## १०.५ जिल्हा स्तरावरील बाबी

**• शेतकरी यांचेसाठीचे घटक.**

**धोरणात्मक संशोधन व विस्तार आराखडा तयार करणे/दुरुस्ती करणे-**

प्रति जिल्हा यासाठी रु.२.५० लाख इतकी तरतूद असते.हा ५ वर्षात एकदा केला जातो.

**शेतकरी प्रशिक्षण-**

a. आंतर राज्य शेतकरी प्रशिक्षण- यासाठी प्रति शेतकरी प्रति दिन रु.१२५०/- इतके अर्थ सहाय्य शेतकरी यांना देण्यात येते.

b. राज्यांतर्गत शेतकरी प्रशिक्षण- यासाठी प्रति शेतकरी प्रति दिन रु.१०००/- इतके अर्थ सहाय्य शेतकरी यांना देण्यात येते.

c. जिल्हांतर्गत शेतकरी प्रशिक्षण– निवासी शेतकरी प्रशिक्षण यासाठी प्रति शेतकरी प्रति दिन रु.४००/– इतके अर्थ सहाय्य शेतकरी यांना देण्यात येते.

अनिवासी शेतकरी प्रशिक्षण यासाठी प्रति शेतकरी प्रति दिन रु.२५०/– इतके अर्थ सहाय्य शेतकरी यांना देण्यात येते.

● प्रात्यक्षिके आयोजित करणे

a. **कृषी विषयक प्रात्यक्षिके–** ०.४० हे क्षेत्रावरील प्रात्यक्षिकासाठी रु.४०००/– इतके अर्थसहाय्य देण्यात येते.

b. **कृषी संलग्न क्षेत्राची प्रात्यक्षिके–** साठी ही रु.४०००/– इतके अर्थ साह्य शेतकरी यांना देण्यात येते.

● शेतकरी अभ्यास दौरे

● आंतरराज्य अभ्यास दौरे.

शेतकरी यांना राज्याबाहेर सुरु असणारे कृषी विषयक नवनविन तंत्रज्ञान, संशोधन याबाबतची माहिती मिळावी व शेतकरी यांनी आपल्या शेतात या संशोधनाचा, तंत्रज्ञानाचा अवलंब करावा,शेतकरी सक्षम बनावेत आणि तंत्रज्ञान प्रसारामध्ये त्यांचा सहभाग वाढावा या उद्देशाने राज्याबाहेर शेतकरी अभ्यास दौरे आयोजित करुन प्रशिक्षण संस्था/ संशोधन संस्था/प्रगतशील शेतकरी यांची शेती, प्रक्रिया उद्योग इ . ठिकाणी भेटी आयोजित करण्यात येते.

प्रति शेतकरी प्रति दिन रु.१०००/– इतके अर्थ सहाय्य शेतकरी यांना देण्यात येते. यामध्ये प्रवास खर्च (बस किंवा द्वितीय श्रेणी स्लीपर रेल्वे), जेवण, नाश्ता, राहण्याचा खर्च इ .चा समावेश आहे.

आत्मा कार्यालयाची परवानगीने शेतकरी स्वत: किंवा शेतकरी गट या अभ्यास दौरा करु शकतात. हा अभ्यास दौरा कालावधी कमाल ७ दिवसांचा असतो (प्रवासाचा कालावधी वगळून).

शेतकरी अभ्यास दौरा आटोपून परत आल्यानंतर त्यांना प्रतीदिन कमाल रु.१००० इतके अर्थ सहाय्य जिल्हा स्तरावरुन पी.एफ.एम.एस. प्रणालीद्वारे त्यांचे थेट बँक खात्यात जमा करण्यात येते.

● **राज्यांतर्गत अभ्यास दौरे**

शेतकरी यांना राज्यात सुरु असणारे कृषी विषयक नवनविन तंत्रज्ञान, संशोधन या बाबतची माहिती मिळावी व शेतकरी यांनी आपल्या शेतात या संशोधनाचा, तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, शेतकरी सक्षम बनावेत आणि तंत्रज्ञान प्रसारामध्ये त्यांचा सहभाग वाढावा या उद्देशाने राज्यात शेतकरी अभ्यास दौरे आयोजित करुन प्रशिक्षण संस्था/ संशोधन संस्था/प्रगतशील शेतकरी यांची शेती, प्रक्रिया उद्योग इ. ठिकाणी भेटी आयोजित करण्यात येते.

प्रति शेतकरी प्रति दिन रु.५००/– इतके अर्थ सहाय्य शेतकरी यांना देण्यात येते. यामध्ये प्रवास खर्च (बस किंवा द्वितीय श्रेणी स्लीपर रेल्वे), जेवण, नाश्ता, राहण्याचा खर्च इ .चा समावेश आहे. आत्मा कार्यालयाची परवानगीने शेतकरी स्वत: किंवा शेतकरी गट या अभ्यास दौरा करु शकतात. हा अभ्यास दौरा कालावधी कमाल ५ दिवसांचा असतो (प्रवासाचा कालावधी वगळून). शेतकरी अभ्यास दौरा आटोपून परत आल्यानंतर त्यांना प्रतिदिन कमाल रु. ५०० इतके अर्थसहाय्य जिल्हा स्तरावरुन पी.एफ. एम.एस. प्रणालीद्वारे त्यांचे थेट बँक खात्यात जमा करण्यात येते.

- **जिल्हयांतर्गत अभ्यास दौरे**

शेतकरी यांना जिल्ह्यात सुरु असणारे कृषी विषयक नवनविन तंत्रज्ञान, संशोधन याबाबतची माहिती मिळावी व शेतकरी यांनी आपल्या शेतात या संशोधनाचा, तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, शेतकरी सक्षम बनावेत आणि तंत्रज्ञान प्रसारामध्ये त्यांचा सहभाग वाढावा या उद्देशाने जिल्ह्यात शेतकरी अभ्यास दौरे आयोजित करु प्रशिक्षण संस्था/संशोधन संस्था/प्रगतशील शेतकरी यांची शेती, प्रक्रिया उद्योग इ. ठिकाणी भेटी आयोजित करण्यात येते.

प्रति शेतकरी प्रति दिन रु.३००/– इतके अर्थ सहाय्य शेतकरी यांना देण्यात येते. यामध्ये प्रवास खर्च (बस किंवा द्वितीय श्रेणी स्लीपर रेल्वे), जेवण, नाश्ता, राहण्याचा खर्च इ .चा समावेश आहे. आत्मा कार्यालयाची परवानगीने शेतकरी स्वत: किंवा शेतकरी गट या अभ्यास दौरा करु शकतात. हा अभ्यास दौरा कालावधी कमाल ३ दिवसांचा असतो (प्रवासाचा कालावधी वगळून). शेतकरी अभ्यास दौरा आटोपून परत आल्यानंतर त्यांना प्रति दिन कमाल रु. ३०० इतके अर्थ सहाय्य जिल्हा स्तरावरुन पी.एफ.एम.एस. प्रणालीद्वारे त्यांचे थेट बँक खात्यात जमा करण्यात येते.

- **गट निर्मिती**

आत्मा अंतर्गत विविध वस्तू/पिकांचे गट तयार करण्यात येतात एका गटामध्ये २० ते २५ सदस्य असावेत. तालुक्यातील त्या त्या पिकांचे गट तालुका स्तरावर एकत्र येणे अपेक्षीत आहे. तसेच तालुका स्तरावर एकत्र येऊन जिल्हा स्तरावर या सर्व गटांची मिळून शेतकरी उत्पादक कंपनी बनवणे अपेक्षीत आहे. गटांनी सर्व अभिलेखे व रेकॉर्ड ठेवणे आवश्यक आहे. उदा. बैठकांचे इतिवृत्त, बँक पासबूक रकमांचा हिशेब इ .

  - या गटांना क्षमता वृद्धी, कौशल्य विकास यासाठी रु.५००० प्रति गट या प्रमाणे सहाय्य करण्यात येते.
  - तसेच सक्षम गटास बीज भांडवल/फिरता निधी यासाठी रु.१०००० प्रति गट याप्रमाणे सहाय्य करण्यात येते.
  - या व्यतिरिक्त महिलांचे अन्न सुरक्षा गट तयार करण्यात येतात. या गटांना परसबाग, कुक्कुट पालन,शेळी पालन, अळिंबी ऊत्पादन, पशू संवर्धन इ . व्यवसाय सुरु करणेसाठी प्रशिक्षण, प्रकाशने व निविष्ठा खरेदी यासाठी रु.१०००० इतके बीज भांडवल देण्यात येते.
  - उत्कृष्ट रित्या संघटीत असणारा व कार्य करणारे शेतकरी गटास रु.२०००० इतके पारितोषीक देण्यात येते.
  - उत्कृष्ट शेती करणारे प्रगतशील शेतकरी यांना रु.१०००० इतके पारितोषिक देण्यात येते.

- **शेती विषयक माहितीचा प्रसार–** जिल्हा स्तरावर कृषी महोत्सव/ फळे फुले प्रदर्शनी–याबाबतचे आयोजन करणेसाठी रु. ४ लाख इतकी तरतूद आहे.
  - तसेच सोशल मेडिया, छापिल घडी पत्रीका व स्थानिक जाहिराती इ. द्वारे माहितीचा प्रसार करणे या साठी प्रति जिल्हा रु. ४ लाख इतकी तरतूद असते.

- **कमी खर्चाची प्रकाशने**–एका प्रकाशनाची कमाल किंमत रु.१२ असावी.एका प्रकाशनाच्या १० प्रति.अशी ६ प्रकारची प्रकाशने एका गावात वितरित करणे. तालुक्यात अशा प्रकारे १०० गावात वितरित करण्या साठी रु. ७२००० इतकी तरतूद असते.

तंत्रज्ञान डिजिटल माध्यमातून तयार करणे जे माहिती तंत्रज्ञान जाळया मध्ये पाठवता येइल. यासाठी एका तंत्रज्ञान प्रति साठी रु. २०००० याप्रमाणे जिल्ह्यास रु.२ लाख तरतुद असते.

## संशोधन-विस्तार कार्य-शेतकरी यांना जोडणारे घटक

**• शेतकरी- शास्त्रज्ञ सुसंवाद**

शेतकरी व शास्त्रज्ञ यांचे मध्ये पिकांचे तंत्रज्ञान तसेच शेतकरी यांना येणाऱ्या अडचणी याबाबत सुसंवाद घडावयासाठी जिल्ह्यातील २५ शेतकरी यांचे साठी २ दिवसांचे हे चर्चा सत्र जिल्हा स्तरावर घेण्यात येते. यासाठी रु. २०००० इतकी तरतूद आहे. प्रति जिल्हा दोन सुसंवाद कार्यक्रम घेण्यात येतात.

**• जिल्हा स्तरावर तज्ञ नेमणूक-**

कृषी विद्यापीठ/ कृषी विज्ञान केंद्र/कृषी संशोधन केंद्र येथील एका तज्ञ शास्त्रज्ञाची नेमणूक आत्मा अंतर्गत अधिकारी कर्मचारी यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे/ सल्ला देणे यासाठी केली जाते. त्यांना दरमहा २००० रु. इतके मानधन देण्यात येते. त्यांची नियमित कामे सांभाळून हे काम त्यांनी करणे अपेक्षीत आहे.

**• शास्त्रज्ञ व विस्तार अधिकारी/कर्मचारी यांच्या जिल्ह्यातील संयुक्त भेटी-**

जिल्ह्यातील पिकांची परिस्थिती पाहणे तसेच कृषी विषयक उपक्रमांना भेटी देणे यासाठी शास्त्रज्ञ व विस्तार अधिकारी/कर्मचारी यांच्या जिल्ह्यात संयुक्त भेटी आयोजित करण्यात येतात. यासाठी वाहन भाड्याने घेणे किंवा इंधन खर्चा साठी प्रति क्षेत्र भेट रु.१४०० इतकी तरतूद आहे. जिल्ह्यात एका वर्षात २६ भेटी आयोजित करण्यासाठी रु.३६४०० इतकी तरतूद असते. एका आठवड्यात किमान एक क्षेत्रीय भेट होणे अपेक्षीत आहे.

**• किसान गोष्टी चे आयोजन करणे-**

संशोधन- विस्तार- शेतकरी ही साखळी बळकट करण्यासाठी, शेतकरी व शास्त्रज्ञ यांचे मध्ये चर्चा घडवुन आणणे, येत असलेल्या अडीअडचणी सोडवणे यासाठी किसान गोष्टीचे आयोजन तालुका स्तरावर खरिप हंगामात एक व रबी हंगामात एक अशा दोन किसान गोष्टी आयोजित करण्यात येतात. प्रति किसान गोष्टी साठी रु.१५०००/- इतकी तरतूद आहे.

• कृषी विज्ञान केंद्र/स्थानिक संशोधन केंद्र यांचे मार्फत पथदर्शी तंत्रज्ञानाचे आकलन, सुधारणा, प्रमाणीकरण, स्विकार तसेच यथार्थदर्शी संशोधन व विस्तार आराखडा या मधुन निदर्शनास आलेल्या इतर कमी कालावधीचे संशोधनात्मक बाबी- यासाठी प्रति जिल्हा रु. ५ लाख इतकी तरतूद असते.

## जिल्हा व तालुका स्तरावरील प्रशासकीय/भांडवली खर्च

आवर्ती खर्च

- जिल्हा स्तरावरील प्रवास भत्ता/दैनिक भत्ता व दैनंदिन खर्च यासाठी प्रति जिल्हा ७.८० लाख तरतूद
- वाहने भाड्याने घेणे व इंधन खर्च (यामध्ये प्रवास भत्ता/दैनिक भत्ता समावेश आहे.) यासाठी प्रति जिल्हा रु.१.८० लाख इतकी तरतूद असते.
- फक्त तालुका स्तरावरील दैनंदिन खर्च (यामध्ये वाहने भाड्याने घेणे व इंधन खर्चाचा समावेश आहे) - यासाठी प्रति तालुका रु. ३००००/- इतकी तरतूद असते.
- जिल्हा शेतकरी सल्लागार समिती सभेसाठी दैनंदिन खर्च- जिल्हास्तरीय शेतकरी सल्लागार समितीच्या वर्षातून ४ बैठका घेणे अपेक्षीत आहे. प्रति शेतकरी रु. २०० इतक्या खर्चाची तरतूद आहे. एका बैठकीत कमाल २५ शेतकरी असतात. एका बैठकी साठी रु.५००० खर्च या प्रमाणे ४ बैठकांसाठी रु.२०००० इतकी तरतूद प्रति जिल्हा असते.

- तालुका शेतकरी सल्लागार समिती बैठकीसाठी दैनंदिन खर्च– तालुका स्तरीय शेतकरी सल्लागार समितीच्या वर्षातून ६ बैठका घेणे अपेक्षीत आहे. प्रति शेतकरी रु.१०० इतक्या खर्चाची तरतूद आहे. एका बैठकीत कमाल २५ शेतकरी असतात. एका बैठकी साठी रु. २५०० खर्च या प्रमाणे ६ बैठकांसाठी रु. १५००० इतकी तरतूद प्रति तालुका असते. अनावर्ती खर्च– साधने उदा. संगणक इ .साठी प्रति जिल्हा रु.४ लाख इतकी तरतूद असते. मात्र ही साधने निरुपयोगी झाल्यानंतरच दुसरी खरेदी करावीत.

**• शेतीशाळा**

शेतकरी जे पिक घेतात त्या पिकामध्ये तज्ञ बनवण्याचं एक प्रभावी माध्यम म्हणजे शेतीशाळा आहे.शेतीशाळा ही प्रत्यक्ष शेतावर घेतली जाते. यासाठी प्रगतीशील शेतकरी यांचे जास्तीत जास्त २.५ एकर चे क्षेत्र निवडले जाते. या क्षेत्रावरच गावातील जवळपासचे त्या पिकाचे किमान २५ शेतकरी त्या हंगामात त्या पिकाच्या पेरणी पासून ते मळणी पर्यंत किमान ६ वेळा एकत्र येतात. या प्रकारे ६ वर्ग शेतावरच आयोजित होतात. या शेतीशाळेत कमीत कमी व्याख्याने आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून अनुभवातून शिक्षण अभिप्रेत आहे. या निवडलेल्या क्षेत्रावर सुधारीत तंत्रज्ञानाचे पथदर्शी प्रात्यक्षिक आयोजित केले जाते. यामध्ये एकात्मिक पिक व्यवस्थापन, एकात्मिक किड व्यवस्थापन, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन इ .बाबींचा अवलंब केला जातो. शेतकरी या क्षेत्रावर एकत्र येउन आपापले या सुधारित तंत्रज्ञाना बाबातचे तसेच पिकाबाबतचे अनुभव, चांगले/वाईट दृश्य परिणाम एकमेकांना सांगतात. आपापसात चर्चा करतात व प्रात्यक्षिक प्लॉट ची निरीक्षणे घेतात. किडीची चित्रे काढतात. थोडक्यात हा प्रात्यक्षिक प्लॉट म्हणजेच पाटी, पुस्तक, पेन, इमारत सर्व काही असते. या शेतीशाळेसाठी प्रशिक्षक म्हणून विस्तार कार्यकर्ता, प्रगतशील शेतकरी किंवा शासकीय/अशासकिय तज्ञ ही असू शकतो. आत्मा तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक हा समन्वयक म्हणून काम पाहतो. ज्या शेतकरी यांचे शेतातही शेतीशाळा घेतली जाते तो शेतकरी म्हणजे होस्ट फार्मर. या शेति शाळेसाठी एकुण खर्च मापदंड २६७४०/– इतका आहे. तसेच या व्यतिरीक्त होस्ट फार्मरला या खर्चाच्या १० टक्के रक्कम ही शेतीशाळा चालवण्यासाठी सेवा अधिभार म्हणून दिली जाते. शेतीशाळा या कृषी संलग्न विभागाच्या ही घेण्यात येतात. दृष्य परिणाम दिसण्यासाठी शेतीशाळा या तालुक्यात समूह स्वरुपात घेणे अपेक्षीत आहे.

**शेति शाळेसाठी बाब निहाय खर्चाचे मापदंड–**

१) पथदर्शी प्रात्यक्षिक शेतीशाळा प्लॉट (जास्तीत जास्त २.५ एकर) साठी खर्च– रु.७५००/–

२) शेतीशाळा प्लॉट पर्यंत वाहतुकीचा खर्च– रु.१०००/–

३) आकस्मिक खर्च– रु.२०००/–

४) २५ प्रशिक्षणार्थी साठी आय.पी.एम. कीट (रु.२०० प्रती कीट)– रु.५०००/–

५) बाहेरुन बोलावलेले २ प्रशिक्षक यांच्या ६ भेटीं साठी मानधन (प्रती भेट रु.२५०)– रु.३०००/–

६) बाहेरुन बोलावलेले २ प्रशिक्षक यांच्या ६ भेटीं साठी प्रवास खर्च (प्रति भेट रु.१५०)– रु.१८००/–

७) एकुण २८ व्यक्तिंसाठी चहा नाश्ता खर्च– रु.३० प्रति व्यक्ती याप्रमाणे ६ भेटी साठी– रु. ५०४०/–

८) एकुण २८ व्यक्तिंसाठी छापील साहित्य– रु.५० प्रति व्यक्ती याप्रमाणे एकुण रु.१४००/–

९) होस्ट फार्मर ला मानधन– वरिल एकुण खर्चाच्या १० टक्के – रु.२६७४/– असा एकुण शेतीशाळेचा खर्च मापदंड– रु. २९४१४/–

D. जिल्हा स्तरावरील नाविन्य पूर्ण बाबी–

D1. जिल्हा स्तरावरील प्रशिक्षण संस्थेला आवती व अनावर्ती खर्चासाठी सहाय्य करणे– यासाठी रु. ५ लाख इतकी तरतूद प्रति प्रशिक्षण संस्था प्रति जिल्हा असते.

D2. सामूहिक रेडिओ केंद्र–

i) सामूहिक रेडिओ केंद्र स्थापनेसाठी भांडवली खर्च यासाठी रु.१४.५० लाख इतकी जिल्ह्याला तरतूद असते.

ii) कंटेंट तयार करणे– प्रथम वर्षी प्रति दिन दोन तासांचा कार्यक्रम i.e. ७३० तास
प्रति वर्ष– यासाठी रु.३५०० प्रति तास याप्रमाणे ७३० तासांसाठी रु. २५.५० लाख इतकी तरतूद असते.

iii) दुसरे वर्षी प्रति दिन दिड तासांचा कार्यक्रम i.e. ५४० तास प्रति वर्ष– यासाठी रु.३५०० प्रति तास याप्रमाणे ५४० तासांसाठी रु. १८.०० लाख इतकी तरतूद असते.

iv) तिसरे वर्षी प्रति दिन दिड तासांचा कार्यक्रम i.e. २०० तास प्रति वर्ष– यासाठी रु.३५०० प्रति तास याप्रमाणे २०० तासांसाठी रु. ७.०० लाख इतकी तरतूद असते.

वरील प्रमाणे सामुहिक रेडिओ केंद्र स्थापन करणेसाठी भांडवली व आवर्ती खर्च धरुन कमाल रु. ६५ लाख इतकी तरतूद असते. या बाबीचा लाभ संस्था नोंदणी अधिनियम १८६० तसेच अशा प्रकारचा इतर केंद्र/राज्य शासनाने मान्य केलेला कायदा या अन्वये नोंदणी झालेले आणि कृषी व संलग्न क्षेत्रात काम करणारी संस्था घेऊ शकते. तसेच कृषी विद्यापीठ/कृषी विज्ञान केंद्र ही याचा लाभ घेऊ शकतात. त्यांचे कडे पायाभूत सुविधा असलेली किमान ४०० चौ फूटरुम असावी. प्रस्ताव मान्यतेसाठी कृषी मंत्रालय केन्द्र शासन यांना सादर करावा लागतो.

D3. शेतकरी मित्र–

१ दोन गावांसाठी एक कृषी मित्र या प्रमाणे नेमणूक केली जाते. कृषी मित्राला प्रति महिना १००० रु याप्रमाणे मानधन देण्यात येते. या खर्चा साठी केंद्र हिसा ५० टक्के व राज्य हिस्सा ५० टक्के या प्रमाणे तरतूद उपलब्ध होत असते.

E. इतर नाविन्य पुर्ण बाबी– यासाठी प्रति तालुका रु.५०००० इतकी तरतूद असते.

### नाविन्य पुर्ण तंत्रज्ञान प्रसार घटक–

१. पिको प्रोजेक्टर– शेतकरी यांना गावातच नविन कृषी विषयक सुधारीत तंत्रज्ञाना बाबत, तसेच प्रगतीशील शेतकरी यांनी स्थानिक रित्या शेतीत उत्पन्न वाढी साठी केलेले कृषी विषयक काम छोट्या फिल्म द्वारे दाखवण्यासाठी पिको प्रोजेक्टर एक प्रभावी माध्यम आहे. या पिको प्रोजेक्टर साठी प्रति तालुका रु.४०००० इतकी तरतूद असते. पिको प्रोजेक्टर चे आयुर्मांन ५ वर्ष कालावधी आहे.

२. कमी खर्चाच्या फिल्म तयार करणे– पिको प्रोजेक्टर वर दाखवण्यासाठी छोट्या कमी खर्चाच्या फिल्म तयार करणेसाठी प्रती फिल्म रु.५०००० इतकी प्रति तालुका तरतूद असते.

३. स्मार्ट फोन – आत्मा अंतर्गत कार्यरत बि.टि.एम. व ए.टी.एम. यांना वापरण्यासाठी स्मार्ट फोन साठी रु.२०००० प्रति स्मार्ट फोन तरतूद असते. याचे आयुर्मान ५ वर्षे गृहित धरण्यात आलेले आहे. प्रति जिल्हा कमाल १० लाख रु. तरतूद यासाठी असते. तसेच या स्मार्ट फोन वर जि.पि.आर.एस. (इंटरनेट)

वापरासाठी रु.५००० प्रति स्मार्ट फोन या प्रमाणे तरतूद असते.

४. कला जत्था आणि प्रमाणित पिक सल्लागार किंवा इतर नाविन्य पूर्ण बाबी– कृषी विषयक तंत्रज्ञान नाविन्य पुर्ण पद्धतीने/ त्यांच्या भाषेत शेतकरी यांचे पर्यंत पोचवले तर त्या तंत्रज्ञानाचा स्वीकार प्रभावी पणे होतो. यासाठी कला जत्था, रोड शो, भिंती वरील पोस्टर्स तसेच इतर ही प्रभावी माध्यमे आहेत. यासाठी प्रति कला कत्था रु.१०००० इतकी तरतूद असते. प्रति जिल्हा ५ लाख इतकी मर्यादा यासाठी आहे.

# १०.५ सध्या व्यवस्थित कार्यरत असलेले शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, सहकारी उद्योगांची संपर्क माहिती.

## * कोल्हापूर जिल्हा *

### ♦ आजरा तालुका

● आजरा ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लिमिटेड
पोस्ट गल्ली, तालुका आजरा,
कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६५०५
संभाजी हरी सावंत (९४२०१३३७६२)

● एच नं- २९३ ए / पी- मॅडिलेज
४१६५०५, कोल्हापूर, महाराष्ट्र,
महेश सुप्रीकर (९०८२३१११५९)

● जिव्हाळा फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेड
मु.पो. उत्तूर, ता.आजरा, कोल्हापूर,
महाराष्ट्र ४१६५०५
शिवशंकर जकनवाड (९०२८८९२९७२)

● अंभिजारा फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेड,
पोस्ट दाभिळ येथे, ता. आजरा,
कोल्हापूर ४१६५०५
जनार्दन महादेव पाटकर (९४०३८७५७९७)

### ♦ भुदरगड तालुका

● श्री बाळूमामा ॲग्रो प्रोड्युसर कंपनी
लिमिटेड, H.NO. १७४ मेन रोड
आदमपूर कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०९
विजय गुरव (९४०३७८१३०१)

● अटल ऍग्रो प्रोड्युसर कंपनी
लिमिटेड, H.NO-३५ अढ पोस्ट
पिंपळगाव कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०९
डॉ. विनायक परुळेकर
९८२३४९३०६६ / ९५०३९०९९७१

● रंगना ऍग्रो प्रोड्युसर कंपनी
लिमिटेड, रब्बेवाडी पोस्ट नवले ता.
भुदरगड कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२१०
संजय तळकर- ९४२२७८९५८

● आपुलकी ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लिमिटेड,
बेगावडे बागवडे कोल्हापूर MH ४१६२०९
अशोक येलकर- ९७३००९९०७८

### ♦ शाहुवाडी तालुका

● पश्चिमघाट कृषी-वन उत्पादक कंपनी लि.
गेट क्रमांक- ४९, ई, विशाळगड रोड
ए/टी पोस्ट- अंबा,
ता. शाहूवाडी कोल्हापूर ४१५१०१
सलील ओमप्रकाश कलमे /
डॉ. योगेश फोंडे- ९८९०८९४५३६ /
९४०५२६०९८९

● भूमिनंदन फार्मर प्रोड्युसर कंपनी
सीएस क्रमांक ८२९, शिव उमा
अपार्टमेंट, गोडाऊन क्र.१,
एस करवीर कोल्हापूर (एम. कॉर्प) ४१६००१.
bhoominandanfpc@gmail.com
csmhuparikar@gmail.com
७५०४०४३२३२

● कडवी खोरे फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि.
C/O शिव विठ्ठल बेंडकळे येथे
कडवे, ता. शाहूवाडी, कडवे,
कोल्हापूर - ४१५१०१. ९८९०५९००८३
/kadavikhore@gmail.com

### ♦ पन्हाळा तालुका

● संपुर्णा फूड इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रोड्युसर कंपनी लि.
पोस्ट बहेरीवाडी, तालुका पन्हाळा,
जिल्हा- कोल्हापूर ४१६११३

● कुंभी कासारी ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लिमिटेड
H.NO ९१२ मोटाईवाडी, ता. पन्हाळा,
जि. कोल्हापूर, - ४१६२०५.
८६९८१६०५००.

## ♦ राधानगरी तालुका

- इंटरनॅशनल कृषी पर्यटन सन्मान कृषी उत्पादक कंपनी लिमिटेड
C/o. रवींद्र रामचंद्र भावके, घर क्रमांक १८११८,
किल्लेदार गल्ली, A/p-तुरंबे
तालुका–राधानगरी कोल्हापूर ४१६२०८
सागर भावके ८३२९७९७१८३/९५९४९०७५५२

- ग्रीन गुडलक फार्मर्स प्रोड्युसर कंपनी
घर क्रमांक ५४, मेन रोड, तालुका राधानगरी, कोल्हापूर, महाराष्ट्र, – ४१६२१२.
greengoodluckfpc@gmail.com/
९८५०३०७५७६

- राधानगरी तालुका ॲग्रो प्रोड्युसर कंपनी
C/O शिवाजी भिका पाटील, घर क्रमांक १५९, पोस्ट–गुडाल, ता. राधानगरी,
कोल्हापूर, महाराष्ट्र– ४१६२११.
radhagrofpc@gmail.com
८७८८५९९०९९

- खोडवे फार्मर्स प्रोड्युसर कंपनी
पोस्ट चंद्रे, राधानगरी, कोल्हापूर, महाराष्ट्र– ४१६२२१.
khodavefarmers@gmail.com,
९८६००२५५५९.

## ♦ चंदगड तालुका

- चंदगड ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लिमिटेड
घर क्रमांक १४८५, अडकूर, ता. चंदगड, कोल्हापूर महाराष्ट्र ४१६५०९
दादू हसन मुल्ला/ ९४२०२९३०३३

- चंदगड फार्म फ्रेश फार्मर्स प्रोड्युसर कंपनी
घर क्र. ४०८, सातवणे, ता. चंदगड, कोल्हापूर, महाराष्ट्र, ४१६५०९.
chndgadfarm2020@gmail.com
७२५९१२०७४४

- ऑर्गाग्रो फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड
CS.NO.246 (M.NO.4/1), मेन रॉड, गावठाण क्रमांक ४/१,
कुदनूर, ता–चंदगड, कोल्हापूर, महाराष्ट्र– ४१६५०८.
orgagrofpg@mail.com /९४८०००५१३५

- ताम्रपर्णी ॲग्रो फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि.
उ/ज मारुती लक्ष्मण टाकेकर, घर क्रमांक ८४, ढोलगरवाडी ता. चंदगड, जिल्हा– कोल्हापूर, ४१६५०७
८३७८८१३२२

- शिवसंग्राम ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लिमिटेड
घर क्रमांक १३१, लक्ष्मी गल्ली, सुंदी ताल– चंदगड, जिल्हा – कोल्हापूर– ४१६५०७.
८६०५५७३०१३

- सुजे ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लिमिटेड
सी/ओ दत्तात्रय नाईक, ता. चंदगड जि. कोल्हापूर डुक्करवाडी ४१६५०७, कोल्हापूर– ४१६५०७.
sujeyagro@gmail.com / ८८३०४५८३२३

- सोन पांढर सुंडी कृषी उत्पादक कंपनी
घर क्रमांक २/१, मेन रोड, पोस्ट सुंडी ता चंदीगड, कोल्हापूर, महाराष्ट्र– ४१६५०७.
Sompandarsaundiagrogmail.com
डॉ संजय पाटील (७५८८९४६६८९)

## ♦ गगनबावडा तालुका

- श्री रासाईदेवी ॲग्रो प्रोड्युसर कंपनी
घर क्रमांक २४७, पोस्ट असंदोली ता. गगनबावडा, कोल्हापूर, महाराष्ट्र– ४१६२०६.
desaionkar948@gmail.com
९४०५५५९७५७.

# * सातारा जिल्हा *

## • महाबळेश्वर तालुका

● तापोळा ॲग्रो टुरिझम प्रोड्युसर कंपनी लि.
वनावली उतेकर, पोस्ट तापोळा
तालुका महाबळेश्वर सातारा
महाराष्ट्र ४१२८०६
गणेश नामदेव उत्तेकर–९४२१२०९३६१

● महा फ्रेश प्रोड्युसर कंपनी लिमिटेड
देवळी येथे, पोस्ट झांजवड तालुका
महाबळेश्वर, सातारा महाराष्ट्र ४१२८०६
शैलेश भगवान जाधव– ९४२१२०८६८६

● महाबळेश्वर स्ट्रॉबेरी आणि सेंद्रिय
शेतकरी उत्पादक कंपनी
C/O श्री विजय मारुती शिंदे
M.NO. ५१९, पोस्ट खिंगार, ता. महाबळेश्वर,
सातारा, महाराष्ट्र, ४१२८०५. ७२१९८०६३६०.
mahableshwarstrawbery2020@gmail.com

● मेगाफार्म ॲग्रो प्रोड्युसर कं. लि.
अवकाली, मॅप्रो गार्डन जवळ
पाचगणी, महाबळेश्वर रोड,
महाबळेश्वर महाराष्ट्र – ४१२८०६
श्री निलेश – ०८०३७३०५६९५/
८९७५४२३६५८.

## ♦ जावळी तालुका

● आर के धनवडे जावळी ॲग्रो
प्रोड्युसर कंपनी लिमिटेड
घर क्रमांक – ३०७ अढ– साईघर
सातारा महाराष्ट्र ४१५५१५
अंकुश धनवडे– ९७६४४९०२५३

● वेन्ना व्हॅली ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लिमिटेड
पोस्ट केदंबे ता. जावळी सातारा
महाराष्ट्र ४१५०१२
राघव बिरमाणे/ प्रकाश ओंबळे –
९९७५०८३९९०

● ऑक्सिग्रीन इंटरनॅशनल ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि.
वाळूथ तालुका जावळी सातारा–४१५५१४
सुनील काळे– ९८२००२४४६७.

## ♦ वाई तालुका

● लक्ष्मणराव यादव ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि.
घर क्रमांक ५११, वेळे, ता. वाई,
जि. सातारा ४१५५१७
विजय लक्ष्मण यादव– ९८२२०५२८९६

● किकली ग्लोबल ॲग्रो फार्मर्स प्रोड्युसर कंपनी
C/O रवींद्र धर्माजी जाधव, मि नं ९३,
ता–वाई, जिल्हा–सातारा– ४१५५३०.
pdanayjadhav33gmail.com /
९६६५५१४९८८

● कवठे कृषिक्रांती शेतकरी उत्पादक कंपनी
C/O मधुकर बाबुराव डेरे, कवठे,
ता– वाई, सातारा, ४१५५१६.
dahuldedeyashgmail.com/
८३२९४२९३००.

## १०.६ कोल्हापूर आणि सातारा येथील काही एन.जी. ओ

**● आरती चॅरिटेबल ट्रस्ट**

MU.PO. राजापुरी सातारा शहर
सातारा, ९५६११३३३४५/
araticharitable345@gmail.com

**● सोसायटी फॉर एम्पॉवरमेंट ऑफ व्हिलेज अँड ॲग्रिकल्चर- सेवा,**

सातारा तिसरा मजला, श्रीजय अपार्टमेंट, जुन्या आरटीओ ऑफिस चौकाजवळ, कदमबाग, सातारा, महाराष्ट्र
८९९९३०४५६५ /
sevašsatara@rediffmail.com

**● अन्नपूर्णा सेवाभावी संस्था चिखली**

अन्नपूर्णा सेवाभावी संस्था, चिखली,
तेल- कराड, जि. सातारा पिन ४१५१०६
http://Annapurnango.org

**● निंबकर कृषी संशोधन संस्था**

F-73, फलटण, महाराष्ट्र
P.O. Box 44, Lonand Road

**● कल्याणी गोरक्षण ट्रस्ट कराड**

तालुका - कराड, जिल्हा- सातारा
(एमएस) पिन - ४१५५१०
http://www.kvkkarad.org.in

**● उत्कर्ष शैक्षणिक वा सामाजिक संस्था चिखली,**

A/P चिखली. ता. कराड जि.सातारा.
पिन-४१५१०६

**● ग्रामपरिवर्तन प्रबोधिनी कटगुण**

आट-पोस्ट-कटगुण ता-खटाव,
जिल्हा-सातारा-४१५५०२ महाराष्ट्र

**● आरोग्य शिक्षण आणि ग्रामीण विकास संस्था**

1132D, अक्षय रेसिडेन्सी, दुसरा मजला,
शुक्रवार पेठ, कोल्हापूर ४१६००२
विजय चोरमारे ९५९४९९९४५६

**● आनंद शैक्षणिक सामाजिक सेवाभावी संस्था**

काळजवडे काजवडी ता. पन्हाळा जि.कोल्हापूर
८६९८१६०५००/
jyotiradityasch@gmail.com

**● शिवतेज प्रतिष्ठान मानपाडळे**

ए.टी. पोस्ट मानपाडळे, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर – ४१६११२

**● श्री महालक्ष्मी शैक्षणिक- सामाजिक ग्रामीण, विकास संस्था कराडवाडी**

ए.पी. कराडवाडी ता. भुदरगड जि. कोल्हापूर

**●अस्मिता महिला विकास मंडळ,**

रुईकर कॉलनी, मेन रोड,
कोल्हापूर- ४१६००३.
मोबाईल: +(९१) ९८२३१५८५८२.

### १०.७ नाविन्यपूर्ण योजना अतंर्गत कृषि पर्यटन केंद्र प्रशिक्षण.

सातारा जिल्हा हा पर्यटनाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. परंतू शेती क्षेत्र ही पर्यटनाचे स्थळ होऊ शकेल. यातुन ''कृषी पर्यटन' संकल्पनेचा उदय झाला.

**या योजनेची वैशिष्टये**

- कृषी विज्ञान केंद्राद्वारे प्रशिक्षणाचे आयोजन
- महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ येथे कृषी संलग्न विभागासोबत कार्यशाळेचे आयोजन.

  जिल्हा परिषद स्वनिधी मधून कृषी पर्यटनास चालना देणेची योजना.

### १०.८ नाविन्यपुर्ण योजना अंतर्गत सातारा ऑरगॅनिक उपक्रमास चालना देणे

देशात हरित क्रांतीनंतर अन्नधान्य व कृषी उत्पादन वाढीसाठी सुधारित, संकरीत जातीच्या बियाणांचा वापर वाढला तसेच अधिक उत्पादन काढण्यासाठी सिंचन सुविधा, रासायनिक खतांचा वापर, पिकांवरील किड/रोगांचे नियंत्रणासाठी किटकनाशके/बुरशी नाशके यांचा वापर शेतकरी मोठया प्रमाणावर करु लागले, सुरवातीच्या काळात रासायनिक खताला प्रतिसाद मिळाल्याने कृषी उत्पादनात देखील मोठया प्रमाणावर वाढ झाली. परंतु मर्यादित क्षेत्रातुन अधिकाअधिक कृषी उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांमध्ये स्पर्धा होऊन रासायनिक खते, किटकनाशके व सिंचनाचा अतिरिक्त वापर होऊन लागला आहे. त्याचे दुष्परिणाम गेल्या काही वर्षापासून दिसून येत आहे. जमिनीचे आरोग्य बिघडून शेती उत्पादनामध्ये रासायनिक खतांचे, किटकनाशकांचे अंश राहिल्याने विषयुक्त अन्नाचे सेवन होऊन लोकांच्या आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. या दुष्परिणामांवर उपाययोजना म्हणून सेंद्रीय शेती पध्दतीचा अंगीकार करणे ही काळाजी गरज निर्माण झालेली आहे.

#### योजनेचा उद्देश

शालेय विद्यार्थ्यांना सेंद्रीय शेतीचे महत्व पटवून देऊन सेंद्रीय कृषी उत्पादन घेण्याबाबतच्या संकल्पनेचा विस्तार घरोघरी पोहचविणे हा प्रमुख उद्देश प्रस्तावित योजनेमधून साध्य करावयाचा आहे. सेंद्रीय शेतीच्या विविध संकल्पना शालेय विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शेतकऱ्यांचे शेतावर पाहण्यास व अनुभवन्यास मिळणेसाठी विद्यार्थ्याच्या सहलींचे आयोजन तालुक्यासाठी नेमलेल्या तज्ञ मार्गदर्शक शेतकऱ्यांचे शेतावर करणेत आले आहे.जेणेकरुन विद्यार्थी सेंद्रीय शेतीची संकल्पना आत्मसात करतील तसेच सेंद्रीय शेतीचे महत्व वाढीस लागेल व त्याचा प्रचार व प्रसार करतील.

### जिल्हा परिषद सेस निधी मधून शेतकऱ्यांना व्यक्तीगत लाभाच्या खालील प्रमुख योजनांचा लाभ देण्यात येतो.

१) शेतकऱ्यांना अनुदानावर कडबाकुट्टी यंत्र वाटप योजना :- जनावरांना वापरण्यात येणाऱ्या चाऱ्याची उपयुक्तता वाढविणेसाठी जिल्हा परिषदेच्या सेस निधीमधून शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर कडबाकुट्टी यंत्राचे वाटप करण्यात येते. यामध्ये अल्प,अत्यल्प भूधारक शेतकरी, महीला शेतकरी, अपंग शेतकरी व मागासवर्गीय शेतकऱ्यांना प्राधान्य दिले जाते.

२) शेतकऱ्यांना अनुदानावर सिंचन साहीत्याचे वाटप करणेची योजना :- ज्या शेतकऱ्यांकडे पिकांना पाणी देण्यासाठी सिंचन सुविधा उपलब्ध आहे अशा गरजू शेतकऱ्यांना विद्यूतपंप संच,डीझेल इंजिन अथवा पेट्रोडीझेल इंजिन तसेच एचडीपीई पाईप सारख्या सिंचन साहीत्याचे ५० टक्के अनुदानावर वाटप केले जाते. यामध्ये अल्प, अत्यल्प भूधारक शेतकरी, महीला शेतकरी, अपंग शेतकरी व मागासवर्गीय शेतकऱ्यांना प्राधान्य दिले जाते.

३) शेतकऱ्यांना अनुदानावर ताडपत्री वाटप योजना :- धान्याचे पावसापासून संरक्षण करणे, मळणी वेळी धान्याची साठवणूक करणे इत्यादी साठी शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर ताडपत्रींचे वाटप जिल्हा परिषद सेस योजनेमधून केले जाते. यामध्ये अल्प, अत्यल्प भूधारक शेतकरी, महीला शेतकरी, अपंग शेतकरी व मागासवर्गीय शेतकऱ्यांना प्राधान्य दिले जाते.

४) शेतकऱ्यांना अनुदानावर सुधारीत/संकरीत बियाणे वाटप योजना: – बियाणे बदलाचा दर वाढवून पिकांचे प्रति हेक्टरी उत्पादकता वाढविणेसाठी शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर भात, ज्वारी, बाजरी, मका, सोयाबीन, भुईमुग, वाटाणा, घेवडा इत्यादी पिकांचे संकरीत/सुधारीत वाणाचे बियाणेचे वाटप केले जाते. यामध्ये अल्प, अत्यल्प भूधारक शेतकरी, महीला शेतकरी, अपंग शेतकरी व मागासवर्गीय शेतकऱ्यांना प्राधान्य दिले जाते.

५) शेतकऱ्यांना अनुदानावर पिक संरक्षण आयुधांचे वाटप करणेची योजना: – पिकांचे किड व रोगा पासून संरक्षण करणेसाठी शेतकऱ्यांना बॅटरी ऑपरेटेड स्प्रेपंप, इंपोर्टेड स्प्रेपंप, एचटीपी स्प्रेपंप इत्यादी पिक संरक्षण आयुधांचे वाटप ५० अनुदानावर वाटप केले जाते. यामध्ये अल्प,अत्यल्प भूधारक शेतकरी, महीला शेतकरी,अपंग शेतकरी व मागासवर्गीय शेतकऱ्यांना प्राधान्य दिले जाते.

६) शेतकऱ्यांना अनुदानावर सायकल कोळप्यांचे वाटप योजना: – पिकातील आंतर मशागतीचे काम करणे, तण नियंत्रण करणे यासाठी शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर सायकल कोळप्यांचे वाटप केले जाते. यामध्ये अल्प, अत्यल्प भूधारक शेतकरी, महीला शेतकरी, अपंग शेतकरी व मागासवर्गीय शेतकऱ्यांना प्राधान्य दिले जाते.

७) शेतकऱ्यांना कृषी पर्यटनासाठी प्रोत्साहन देणेची योजना

१. सातारा जिल्हा वैशिष्ठयपुर्ण जिल्हा असून जिल्हयास ऐतिहासिक व भौगोलिक वारसा लाभलेला आहे. जिल्हयाच्या पश्चिमेकडील भागात सहयाद्रीच्या डोंगररांगा, जंगल, नदयांचे उगमस्थान असून अनेक देवस्थान जिल्हयात आहेत. तसेच पुर्व भागामध्ये विस्तृत पठारी प्रदेश आहे.

२. जिल्हयात बाजरी पासून स्ट्रॉबेरी, भात, ऊस या सारख्या विविध पिक पध्दतींचा समावेश आहे. जिल्हयाची वैशिष्ठयपुर्ण भौगोलिक परिस्थिती कृषी पर्यटनास पुरक असल्याने व शेतीस उत्तम पुरक व्यवसाय असल्याने कृषी पर्यटन व्यवसायासाठी मोठया प्रमाणावर संधी जिल्हयातील शेतकऱ्यांना उपलब्ध आहे.मात्र हा व्यवसाय शास्त्रोक्त पध्दतीने केल्यासच किफायतशीर होऊ शकतो हि बाब लक्षात घेऊन सातारा जिल्हा परिषदेम ार्फत सन २०१४–१५ पासून कृषी पर्यटनास चालना देणेची नाविन्यपुर्ण योजना सुरू केली. त्यासाठी जिल्हा परिषदेच्या स्वनिधीचे अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आली.

३. सदरचा व्यवसाय करण्यास इच्छूक असणाऱ्या शेतकऱ्यांना जिल्हा परिषदेमार्फत एकत्रित केले व त्यांना जिल्हा परिषदेकडून कोणकोणत्या बाबीसाठी मदत/सहकार्य अपेक्षित आहे याची माहीती घेण्यात आली. त्यामध्ये इच्छूक शेतकऱ्यांना कृषी पर्यटनाचे तांत्रिक व सखोल प्रशिक्षणाची आवश्यक आहे हे लक्षात आले. कृषी पर्यटन व्यवसाय यशस्वीपणे राबविणेसाठी केंद्र चालकांना सखोल प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी सातारा जिल्हा परिषदेने सन २०१४–१५ पासून कृषी पर्यटन केंद्र सुरू करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना कृषी विज्ञान केंद्र,बारामती येथे निवासी प्रशिक्षण देणेची योजना सुरू केली. व त्यामध्ये सहभागी शेतकऱ्यांना जिल्हा परिषदेच्या निधीमधून प्रशिक्षण देणेची सोय निर्माण केली. शेतकऱ्यांना बारामती येथे निवासी प्रशिक्षण देण्यात आले. तसेच तालुका स्तरावरील क्षेत्रीय कृषी अधिकाऱ्यांना देखील या प्रशिक्षणामध्ये सहभागी करून घेण्यात आले, जेणेकरून तालुका स्तरावर कृषी पर्यटनाबाबची माहीती शेतकऱ्यांना उपलब्ध होईल. या प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींना कृषीपर्यटनाशी निगडीत अनेक विषयांचे सखोल मार्गदर्शन तज्ञांमार्फत करण्यात आले.

५. कृषी पर्यटन व्यवसाय करीत असताना त्यामध्ये आलेल्या अनुभवांची देवाण घेवाण करण्यासाठी जिल्हयातील कृषी पर्यटन केंद्र चालकांचे मासिक चर्चासत्र जिल्हा परिषदेमार्फत आयोजित करण्यात येत आहे. सदरचे चर्चा सत्रामध्ये या व्यवसायातील अडीअडचणी व त्यावरील उपाययोजनां बाबत सखोल चर्चा करण्यात येते. जिल्हयात तसेच पर जिल्हयात ज्या ठिकाणी यशस्वीपणे कृषी पर्यटन सुरू आहे तसेच ज्या ठिकाणी नाविन्यपुर्ण उपक्रम राबविला जात आहे अशा कृषी पर्यटन केंद्रांना इच्छूक केंद्र चालकांची क्षेत्रीय भेट देणेची योजना सन २०१६-१७ मध्ये सुरू करण्यात येत आहे.

६. कृषी पर्यटनास शासनाची कोणतीही योजना सद्यास्थितीत सुरू नाही. परंतू कृषी पर्यटनामध्ये अंर्तभूत असलेल्या फळबाग, गांडुळ प्रकल्प, रेशीम उद्योग, शेत तळे, रोपवाटीका यासारख्या बाबींच्या शासकीय योजनांचा लाभ प्राधान्याने कृषी पर्यटनधारकांना करण्यास जिल्हा परिषद पुढाकार घेत आहे.

७. कृषी पर्यटनास चालना देण्याच्या उद्येशाने शेतकऱ्यांना प्रोत्साहीत करणे देखील आवश्यक असून जिल्हा परिषदेने सन २०१५-१६ पासून उत्कृष्ट कृषी पर्यटन केंद्रचालकास कृषी पर्यटन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत आहे. जिल्हयात सन २०१३-१४ मध्ये केवळ ५-६ कृषी पर्यटन केंद्र सुरू झाली होती, मात्र जिल्हा परिषदेने या संकल्पनेमध्ये पुढाकार घेतल्याने महाराष्ट्र कृषी पर्यटन विकास महामंडळाकडे ८६ कृषी पर्यटन केंद्रांची नोंदणी झाली असून त्यापैकी ५० ते ६० इतकी कृषी पर्यटन केंद्र सुरू झाली आहे.

८. कृषी पर्यटनाच्या शेती पुरक व्यवसायामुळे जिल्हयातील शेतकऱ्यांच्या मासिक उत्पन्नात मोठया प्रमाणावर वाढ झालेचे दिसून येते. सदरची वाढ हि रू. ५०,०००/- पासून रू. २,५०,०००/- प्रति महिना इतकी झालेली आहे. यावरून सदरचा व्यवसाय यशस्वीपणे राबविला जात असल्याचे दिसून येते.

## शेतकऱ्यांना सेंद्रीय शेतीस प्रोत्साहन देणेच्या योजना

१. रासायनिक खतांचा व किटक नाशकांचा वापर दिवसेंदिवस वाढत चालला असून त्यामुळे सामान्य लोकांचे आरोग्याचे प्रश्न गंभिर स्वरूप धारण करू लागले आहेत. लोकांना विषमुक्त अन्न खायला मिळावे यासाठी उत्पादक शेतकरी तसेच उपभोक्ता सामान्य नागरीक यांचे मध्ये रासायनिक खतांचे व किटकनाशकांचे दुष्परीणामा बाबत व्यापक जागृती निर्माण करणे ही काळाची गरज आहे किंबहुना आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. सदरच्या समस्येवर मात करण्यासाठी सेंद्रीय शेतीस व सेंद्रीय उत्पादन खरेदीसाठी प्रोत्साहन देणे शिवाय पर्याय नाही. या सामाजिक हिताच्या समस्येवर उपाय योजना करण्यासाठी सातारा जिल्हयातील शेतकऱ्यांच्या सहभागातून सातारा ऑरगॅनिक हा उपक्रम सातारा जिल्हा परिषदेमार्फत राबविला जात आहे.

२. सातारा ऑरगॅनिक उपक्रमाचा शुभारंभ दिनांक १५ ऑगस्ट २०१५ रोजी करण्यात आला. या उपक्रमांतर्गत जिल्हयातील सेंद्रीय शेती उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना एकत्रित करणे, सेंद्रीय शेती उत्पादक शेतकऱ्यांची ओळख निर्माण करून देणे, त्यांचे मार्फत उत्पादीत होणाऱ्या सेंद्रीय शेतमालाची माहिती संकलित करणे, सेंद्रीय शेत मालाच्या विक्रीसाठी जि.प.च्या अखत्यारीतील जागा उपलब्ध करून देणे, सेंद्रीय शेतीचे उत्पादन खरेदी करणाऱ्या ग्राहकांची माहिती संकलित करणे, सेंद्रीय शेती उत्पादक शेतकरी व ग्राहक यांचेमध्ये समन्वय साधून उत्पादक-ग्राहक साखळी निर्माण करून देणे यासारख्या विविध प्रक्रीया जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत आहेत.

३. सेंद्रीय शेतीचा प्रचार व प्रसार करणेसाठी जिल्हयात तालुका निहाय सेंद्रीय शेती तज्ञ समन्वयक यांची नेमणूक जिल्हा परिषदेने करून दिली असून या समन्वयांका कडे जिल्हयातील इतर शेतकऱ्यांसाठी एक दिवसाची कार्यशाळा व शिवार फेरी आयोजित करण्यात येते व या कार्यशाळेमध्ये सेंद्रीय शेती विषयक मार्गदर्शन शेतकऱ्यांना करण्यात येते. कार्यशाळा ज्या समन्वयकाच्या शेतात आयोजित केली जाते त्यास जिल्हा परिषद निधीमधून प्रति कार्यशाळा रूपये ७५००/- मानधन व उपस्थितांना चहा-पाणी व भोजन इत्यादीचे खर्चासाठी देण्यात येते.


४. शालेय विद्यार्थ्यांना देखील सेंद्रीय शेतीचे महत्व व प्रत्यक्ष सेंद्रीय शेती विषयक संकल्पना पटवून दिल्यास त्याचा संदेश विद्यार्थ्याच्या कुटुंबापर्यत पोहचविला जाणार आहे, ही बाब लक्षात घेऊन जिल्हा परिषदांकडील प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सहलींचे आयोजन सेंद्रीय शेती समन्वयक शेतकऱ्याच्या शेतावर केले जाते व त्यापोटी समन्वयकास जिल्हा परिषद निधीमधून रू.१०००/- मानधन देण्यात येते.

५. शालेय विद्यार्थी व सेंद्रीय शेती समन्वयकांना सेंद्रीय शेती मधील विविध संकल्पनांची शास्त्रोक्त माहिती उपलब्ध करून देणेसाठी जिल्हा परिषदेने पुस्तिका तयार करून दिली आहे. यामध्ये सेंद्रीय शेतीच्या सर्व संकल्पना मोजक्या शब्दात रंगित सचित्र स्वरूपात दिली आहे.जिल्हा परिषदेने या पुस्तिकेच्या ३००० प्रती वाटप केल्या आहेत.

६. तसेच सेंद्रीय शेती मध्ये उल्लेखनिय काम करणाऱ्या शेतकऱ्यांचा जिल्हा परिषदेमार्फत दर वर्षी १ जुलै या कृषी दिनी डॉ.जे.के. बसू सेंद्रीय व आधुनिक शेती पुरस्कार या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यामध्ये रोख रक्कम, प्रशिस्तीपत्र, सन्मानचिन्ह, पुष्प गुच्छ इ. चे वितरण मान्यवरांचे हस्ते करण्यात येते.

७. रासायनिक खतांचा व किटकनाशकांचा वापर दिवसेंदिवस वाढत चालला असून त्यामुळे सामान्य लोकांचे आरोग्याचे प्रश्न गंभिर स्वरूप धारण करू लागले आहेत. लोकांना विषमुक्त अन्न खायला मिळावे यासाठी उत्पादक शेतकरी तसेच उपभोक्ता सामान्य नागरीक यांचे मध्ये रासायनिक खतांचे व किटकनाशकांचे दुष्परीणामा बाबत व्यापक जागृती निर्माण करणे हि काळाची गरज आहे किंबहुना आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. सदरच्या समस्येवर मात करण्यासाठी सेंद्रीय शेतीस व सेंद्रीय उत्पादन खरेदीसाठी प्रोत्साहन देणे शिवाय पर्याय नाही. या सामाजिक हिताच्या समस्येवर उपाय योजना करण्यासाठी सातारा जिल्हयातील शेतकऱ्यांच्या सहभागातून सातारा ऑरगॅनिक हा उपक्रम सातारा जिल्हा परिषदे मार्फत राबविला जात आहे.

८. या उपक्रमांतर्गत जिल्हयातील सेंद्रीय शेती उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना एकत्रित करणे, सेंद्रीय शेती उत्पादक शेतकऱ्यांची ओळख निर्माण करून देणे, त्यांचे मार्फत उत्पादीत होणाऱ्या सेंद्रीय शेतमालाची माहिती संकलित करणे, सेंद्रीय शेत मालाच्या विक्रीसाठी जि.प.च्या अखत्यारीतील जागा उपलब्ध करून देणे, सेंद्रीय शेतीचे उत्पादन खरेदी करणाऱ्या ग्राहकांची माहिती संकलित करणे, सेंद्रीय शेती उत्पादक शेतकरी व ग्राहक यांचेमध्ये समन्वय साधून उत्पादक-ग्राहक साखळी निर्माण करून देणे यासारख्या विविध प्रक्रीया जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत आहेत.






# शाश्वत विकास केंद्र
# गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था, पुणे

गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था, पुणे या संस्थेची स्थापना १९३० साली झाली. भारतातील एक अग्रगण्य संशोधन संस्था म्हणून आज त्याची ओळख आहे. भारताच्या शाश्वत विकासात संशोधन आणि धोरणात्मक सूचना करण्यासाठी इथे २०२३ साली शाश्वत विकास केंद्राची स्थापना झाली.

ग्रामविकास, पर्यावरण संवर्धन, जल संवर्धन, घन कचरा व्यवस्थापन, पर्यावरणीय सेवांचे मूल्यमापन आणि संवर्धन, अक्षयऊर्जा, कार्बन मूल्यांकन, सागरी परिसंस्था संवर्धन अशा विषयात आमचे कार्य चालू आहे.

**शाश्वत विकास केंद्राची उद्दिष्ट**

१.सामाजिक आणि पर्यावरणीय समस्या समजून घेणे आणि त्यावरील उपाय योजनेत योगदान.

२.पर्यावरणीय सेवा आणि नैसर्गिक संसाधनांच्या मूल्यांकनाचे मार्ग विकसित करणे.

३. हवामान बदलाच्या दुष्परिणामांना सामोरे जाण्यासाठी स्थानिक संदर्भ आणि विविधते वर आधारित कृती आराखडे तयार करणे.

४.शासनाच्या हवामान बदल कृती आराखड्याचा वेळोवेळी आढावा घेणे.

५.संस्थे मार्फत विविध स्तरांवर पर्यावरण आणि पर्यावरणीय अर्थशास्त्राचे अभ्यासक्रम कार्यान्वित करणे.



Mission Sahyadri | Prosperity through Conservation

# संवर्धनातून समृद्धी

संघटन, संवर्धन आणि मूल्यवर्धन या त्रीसूत्री मार्गाने युवकांना उपजीविकेची वेगवेगळी साधने कशी मिळवावी याची ही सुलभ मार्गदर्शिका आहे. यात उत्पन्नाचे विविध पर्याय दिले आहेत, त्यासंबंधी अधिक माहिती कुठे मिळेल यांची यादी आहे, एफ.पी.ओ म्हणजे संघटन करून कशी प्रगती होईल याची सर्व माहिती दिली आहे.

## शाश्वत विकास केंद्र
## गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था, पुणे

शाश्वत विकास केंद्र, गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था, पुणे, या संस्थेत शाश्वत विकासातील समस्यांवर संशोधन आणि काम चालू असते. जैवविविधता आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन शाश्वत विकासात अनिवार्य आहे असे आम्ही मानतो. अर्थव्यवस्थेत वित्तीय वाढ होते पण त्यात निसर्गसंपत्ती खर्ची पडते. त्यामुळे आर्थिक वृद्धीचा पाठपुरावा करताना नैसर्गिक संसाधनांचे भान ठेवणे गरजेचे आहे.

Centre for Sustainable Development

Education : An Ennobling Influence

Gopal Krishna Gokhale

GOKHALE INSTITUTE OF POLITICS AND ECONOMICS

